म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. २३९

REFBK-0004918

# ंच्या उत्तरेंतील मोहिमा

(१७२०-१७४०)

वि. गो. दिघे,
एम्. ए.

ग्रंथ संग्रहालय

भारत इतिहास संशोधक मंडळ-पुरस्कृत ग्रंथमाला

क्रमांक ३१ वा

# मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा

भाग १ ला

(१७२०-१७४०)

लेखक

विश्वनाथ गोविंद दिघे, एम्. ए.

REFBK-0004918

ग्रंथ संग्रहालय

स्थळ प्रत

नं.

ता.

दा. क्र 8570

पुणें

१९३३

किंमत १ रुपया ]

प्रकाशक
विश्वनाथ गोविंद दिघे,
सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक
स. रा. सरदेसाई, बी. ए., एल्‌एल्. बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ
भारत' छापखाना, पुणें २

# पुरस्कार

मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा (१६४२ शके ते १६६२ शके) हा विषय घेऊन रा विश्वनाथ गोविंद दिघे, एम् ए, यांनीं लिहिलेला सोबतचा प्रबंध भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंतलें ३१ वें पुष्प म्हणून या एकविसाव्या समेलनाच्या शुभ प्रसंगीं प्रसिद्ध होत आहे याबद्दल आम्हास विशेष आनंद वाटतो. त्याचें एक कारण असें कीं, आजवर पुरस्कृत ग्रंथमालेंत अशा ऐतिहासिक प्रबंधाचा समावेश झाला नव्हता. दुसरें कारण असें कीं, सदर प्रबंधाचे लेखक रा. दिघे हे आमचे जुने विद्यार्थी आहेत आणि विद्यार्थिदशेंत त्यांचे ठिकाणीं अंकुरित झालेली इतिहासाभ्यासप्रीति प्रबंधलेखनप्रकाशनाच्या रूपानें पल्लवित झालेली पाहून जसा त्यास तसाच आम्हास व आमच्या मंडळास आनंद व अभिमान वाटणें साहजिक आहे. तिसरेंहि एक कारण या ग्रंथाच्या पुरस्कारास हेतुभूत आहे, तें असें.

पेशवेदप्तरांत अफाट असा कागदपत्राचा संग्रह आहे. तो अभ्यासकांस उपलब्ध व्हावा म्हणून अनेक खटपटी आज कैंक वर्षें चालू आहेत. त्याला थोडें फार यश येतहि आहे सरकारासहि आपल्या कर्तव्याची जाणीव अधिकाधिक उत्पन्न होत असून साम्प्रतच्या आर्थिक हलाखीच्या परिस्थितींतहि सरकारानें पेशवेदप्तरातील निवडक सामग्री प्रकाशित करण्याचें सत्कार्य जोरानें चालविलें आहे ही संतोषाची गोष्ट आहे आणि याबद्दल सरकार खरोखर स्तुतीस पात्र आहे. कागदांची निवड, छपाईची पद्धति, मूळांत नसलेलीं विराम-चिन्हें घालणें, इंग्रजी सारांशाची जोड, वर दिलेल्या इंग्रजी मिथा इत्यादि अनेक बाबीं-विषयीं सर्वांचेंच समाधान होणें अशक्य आहे. तथापि आजच्यापेक्षा अधिक सर्वमान्य होण्याजोगी व्यवस्था सरकारास खर्च मुळींच न वाढवताहि किंबहुना थोडा कमीच करून, सहज करतां आली असती असें आमचें स्पष्ट मत आहे आणि तें सरकारास माहीत आहे. सरकारास तें तितकें मान्य झालें नाही आणि ज्यांना मोडी वाचनाचा परिचय नाहीं अशा एका परस्थ इतिहासज्ञ विद्वानांचा सल्लाच सरकारास अधिक ग्राह्य वाटला '

आतांपर्यंत पेशवेदप्तरांतील निवडक कागदांचे २८ भाग प्रसिद्ध झाले आहेत, आणि आणखी सुमारें १७ भागांची निवड होऊन तयार आहे असें कळतें. या सर्व भागातून प्रसिद्ध होणाऱ्या सामग्रीचा निरनिराळ्या तऱ्हेनें परामर्ष घेतला जाणें अवश्य आहे. प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांची सत्यता, शुद्धता, विश्वसनीयता वगैरे दृष्टींनी परीक्षा करणें, त्यांची काल, प्रसंग, व्यक्ति वगैरेंच्या दृष्टीनें झालेली निश्चिति व मांडणी तपासणें, त्यांत अगदीं नवीन माहिती काय मिळाली, जुन्या माहितीस दुजोरा कसा व कोठें मिळाला, जुनीं अनुमानें कोणतीं ग्राह्याग्राह्य ठरू लागली, वगैरे प्रश्नांची चर्चा करून इतिहासरचनेस त्यांचा उपयोग करून घेणें हे सर्व उद्योग करणें क्रमप्राप्तच आहे.

अद्यापि पेशवेदप्तराचे निवडलेले भागहि संपूर्ण प्रसिद्ध झालेले नाहीत आणि जेथें शंकास्थानें उत्पन्न होतील त्या त्या स्थळीं अभ्यासकांस मूळ दप्तर तपासण्याची संधि व सवलतहि पाहिजे तेवढी उपलब्ध नाहीं. अर्थात् वर दर्शविलेल्या प्रकारें दप्तराचा परामर्ष आस्तेआस्तेच घ्यावा लागेल.

जसें पेशवेदप्तर तसेंच निजामदप्तरहि फार विस्तृत असून त्यातील कागदपत्र अद्यापि प्रसिद्ध झालेले नाहीत. पण त्याचीहि व्यवस्था लागण्याची आशा हल्लीं वाटू लागली आहे. ( भा. इ. सं. मं. त्रै., वर्ष १२, अंक १ पहा.)

केवळ राजकीय स्वरूपाच्या कागदपत्रांचें अवलोकन आणि तेंहि केवळ व्यावहारिक दृष्टि असणाऱ्यांनीं केलें तर त्यांत अपूर्णतेचा दोष राहणें साहाजिकच आहे. कागदपत्रांचें लष्करी, नाविक, आर्थिक, वार्षिक वगैरे सर्वांगीण निरीक्षण व परीक्षण झालें पाहिजे, कारण राष्ट्राच्या जीवनाच्या शाखा, पोट आणि त्याचे अवयवांप्रमाणें, अगदीं निकटसंबद्ध असतात.

असा सर्व अभ्यास होणें हें काही स्वाधीनचें नाहीं आणि म्हणून साधनसंशोधन व सिद्धान्तविरचन हीं दोन्ही कार्यें सजोड चालवावीं लागतात आधीं साधनसंशोधन हें तर खरेंच; तरी तें कधींहि पूर्ण व जीर्ण होत नाहीं, आणि म्हणून जीपासून थोडीशी तरी सिद्धान्तरचना करता येईल एवढी साधनसंपत्ति हातीं असली म्हणजे सिद्धान्तरचनेचे कार्यास सावधपणें हात घालण्यास हरकत नाहीं. वरील दृष्टीनेंच रा. दिघे याच्या प्रयत्नाकडे पाहिलें पाहिजे. अलीकडे सुमारें तीन वर्षें रा. दिघे हे पेशवेदप्तरात काम करीत होते आणि म्हणून त्यांस कागदाची निवड व अभ्यास करण्यास चांगली संधि व अवधि हीं लाभली. तिचा त्यांनीं सदुपयोग करून आजचा प्रबंध रचिला हें त्यांस खरोखर भूषणावह होय.

पेशवेदप्तरातील सरकारी खंडास आतील मजकुराचा विस्तृत परामर्ष घेणाऱ्या प्रस्तावना किंवा विवेचनें जोडलेलीं नाहीत, आणि हें योग्यच केलें असें म्हटलें पाहिजे. परंतु असा परामर्ष घेणें मात्र अवश्य आहे. यास्तव पेशवेदप्तरात काम करीत असलेल्या मित्रांस आम्हीं सूचना केली कीं, असा एक किंवा अनेक प्रबंधात्मक ग्रंथ त्यांनीच हौसेनें प्रसिद्ध करावा. आमचें म्हणणें कित्येक मित्रांस रुचून ते कामास लागले आणि त्यांपैकीं रा. दिघे यांनीं आघाडी मारून आपला प्रबंध प्रसिद्ध केला आहे.

रा. दिघे यांचा हा प्रबंध प्रस्तावनावजा नसून विवेचनवजा आहे आणि यांत विशेषेंकरून पेशवेदप्तर भाग १३।१४।१५ याचे आधारें मराठ्याच्या उत्तरेकडील मोहिमांचें विवेचन केलेलें आहे. त्यामुळें भाग १३।१४।१५ यात जे निवडक कागद छापले आहेत त्याचे महत्त्व, कालनिर्णय, लेखक, नवीन भर, जुन्यास पुष्टि, व्यक्तिस्वभाव इत्यादि प्रकारची चर्चा या प्रबंधांत आलेली नाहीं. विशेषतः या तीन खंडातील अनेक कागदपत्रांचे आधारें मराठ्याच्या उत्तरेकडील हालचालींचें सटीक विवेचनच यांत आलेलें आहे.

रा. दिघे याच्या सदरील विवेचनांत मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश कसा झाला, राजकारणाला उत्तराभिमुखी रोख कोणीं उत्पन्न केला, त्या धोरणाची सयुक्तिकता वा अयुक्तिकता, निजाम 'खळी' दक्षिणेंत नेस्तनाबूद न करण्यामुळें पुढें ओढवलेली विपत्ति, भोपाळच्या विजयांत पानिपतच्या पराजयाचें मूळ कसें शोधतां येईल, बाजीराव पेशव्याचें अप्रतिम सेनानीत्व व अतुल कर्तबगारी आणि स्वराज्याची साम्राज्यांत वाढ इत्यादि अनेक मुद्यांचा खल रा. दिघे यानी केला आहे. आपलें म्हणणें त्यानीं बहुधा अस्सल कागदपत्रांचे आधारें ( उतारे समाविष्ट करूनच ) सजविलें आहे. स्वतःचे शब्दांत घातलेल्या मजकुरांत जसें त्यानी जुने गोड शब्दप्रयोग मुद्दाम उचलून घेऊन योजिले आहेत, तसे बऱ्याच स्थळीं मुळांतीलच मजकूर व भाषा जराशी अर्वाचीन करून वापरली आहे.

रा. दिघे यानी आपलें म्हणणें मांडताना कोणतीहि संकुचित वृत्ति ठेविली नाहीं तर खऱ्या इतिहासविवेचकाचे ठायीं जी उदार पण निस्पृह वृत्ति असावी लागते तिचाच अवलंब केला आहे. मतप्रदर्शन करणें हें तर रा. दिघे यांचें या प्रबंधांत एक मुख्य प्रयोजन आहे. तीं त्याचीं मतें किंवा अभिप्राय मान्य होवोत वा न होवोत, त्यांनीं आपल्या बाजूनें केलेलें मतप्रदर्शन साधार व सभ्य असें करावयाची खबरदारी घेतली आहे किंवा नाही हें आपणास प्रथम पाहिलें पाहिजे तसें त्यांनीं केलें आहे असें हा प्रबध वाचणाऱ्या कोणासहि कबूल करावें लागेल आधार, आवृत्तिनिर्देश व पानें हीं तपशिलवार जेथें नाहींत तेथें मात्र जरा न्यून भासेल हें खरें

रा. दिघे यांच्या विवेचनांत पुष्कळ ठिकाणीं विचार करण्यासारखे मुद्दे आलेले आहेत. दक्षिणेंतून उत्तर जिंकण्याचा मराठ्यांचा प्रयत्न हा कसा अपूर्व ठरतो, याचें विवेचन ( पृ. ७० ) मननीय आहे. पूर्वी सत्याश्रय पुलकेशी वगैरे दक्षिण्यानीं उत्तरेंत घुसण्याचा प्रयत्न केला, पण दक्षिण्यांनीं उत्तरेवर दीर्घकालीन कब्जा केला असा हिंदुस्थानच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासांत फक्त मराठ्यानींच ! दुसऱ्या कोणासहि हा अद्वितीय गौरव प्राप्त झाला नाहीं.

भोपाल व पानिपत या युद्धांच्या साम्याचें विवेचनहि ( पृ. ६३ ) मार्मिक उतरलें आहे. भोपाळास निजामास अजी गाडून टाकावयाचा होता म्हणजे 'सारी दक्षिण मोकळी' झाली असती असें रा. दिघे म्हणतात. पण अबदालीनें तरी एवढे जीव खर्ची घालून काय मिळविलें ? लूट घेऊनच गेला, याहून काय ? कसेंहि असलें तरी निजामासारखा प्रबळ प्रतिस्पर्धी अगदीं पुण्यापासून पंचवीस कोसावर लागून राहिल्यामुळें एक प्रकारें 'अस्तनींतच अभ' राखल्याप्रमाणें झालें आणि ही अगदी मराठी साम्राज्याच्या हृदयाजवळची जहरी जखम सदा वहातच राहिली आणि त्यांतच हैदराचा शूळ उपटल्यामुळें माधवरावाचा व त्याबरोबरच मराठी सत्तेचा 'क्षय' झाला ! दिल्लीच्या टोंकाकडून ताण लावून निजामास उलथण्याचा बाजीरावाचा प्रयत्न जरी पाहिजे तेवढा यशस्वी झाला

अद्यापि पेशवेदप्तराचे निवडलेले भागहि संपूर्ण प्रसिद्ध झालेले नाहीत आणि जेथे शंकास्थानें उत्पन्न होतील त्या त्या स्थळीं अभ्यासकांस मूळ दप्तर तपासण्याची संधि व सवलतहि पाहिजे तेवढी उपलब्ध नाहीं. अर्थात् वर दर्शविलेल्या प्रकारें दप्तराचा परामर्ष आस्तेआस्तेच घ्यावा लागेल.

जसें पेशवेदप्तर तसेंच निजामदप्तरहि फार विस्तृत असून त्यांतील कागदपत्र अद्यापि प्रसिद्ध झालेले नाहींत. पण त्यांचीहि व्यवस्था लागण्याची आशा हल्लीं वाटू लागली आहे. ( भा इ. सं. मं. त्रै., वर्ष १२, अंक १ पहा.)

केवळ राजकीय स्वरूपांच्या कागदपत्रांचें अवलोकन आणि तेंहि केवळ व्यावहारिक दृष्टि असणाऱ्यानीं केलें तर त्यात अपूर्णतेचा दोष राहणें साहजिकच आहे. कागदपत्रांचें लष्करी, नाविक, आर्थिक, वार्षिक वगैरे सर्वांगीण निरीक्षण व परीक्षण झालें पाहिजे, कारण राष्ट्राच्या जीवनाच्या शाखा, पोट आणि त्याचे अवयवाप्रमाणे, अगदीं निकटसंबद्ध असतात.

असा सर्व अभ्यास होणें हें काहीं स्वाधीनचें नाहीं आणि म्हणून साधनसंशोधन व सिद्धान्तविरचन हीं दोन्ही कार्यें सजोड चालवावीं लागतात आधीं साधनसंशोधन हें तर खरेंच; तरी तें कधींहि पूर्ण व जीर्ण होत नाहीं, आणि म्हणून जीपासून थोडीशी तरी सिद्धान्तरचना करता येईल एवढी साधनसंपत्ति हातीं असली म्हणजे सिद्धान्तरचनेचे कार्यास सावधपणें हात घालण्यास हरकत नाहीं. वरील दृष्टीनेंच रा दिघे यांच्या प्रयत्नाकडे पाहिलें पाहिजे. अलीकडे सुमारें तीन वर्षें रा. दिघे हे पेशवेदप्तरात काम करीत होते आणि म्हणून त्यांस कागदांची निवड व अभ्यास करण्यास चांगली संधि व अवधि हीं लाभली. तिचा त्यानीं सदुपयोग करून आजचा प्रबंध रचिला हें त्यांस खरोखर भूषणावह होय.

पेशवेदप्तरांतील सरकारी खंडास आतील मजकुराचा विस्तृत परामर्ष घेणाऱ्या प्रस्तावना किंवा विवेचनें जोडलेलीं नाहींत, आणि हें योग्यच केलें असें म्हटलें पाहिजे. परतु असा परामर्ष घेणें मात्र अवश्य आहे. यास्तव पेशवेदप्तरांत काम करीत असलेल्या मित्रांस आम्ही सूचना केली कीं, असा एक किंवा अनेक प्रबंधात्मक ग्रंथ त्यानीच हौसेनें प्रसिद्ध करावा. आमचे म्हणणें कित्येक मित्रास रुचून ते कामास लागले आणि त्यापैकीं रा. दिघे यानीं आघाडी मारून आपला प्रबंध प्रसिद्ध केला आहे.

रा. दिघे यांचा हा प्रबंध प्रस्तावनावजा नसून विवेचनवजा आहे आणि यांत विशेषेंकरून पेशवेदप्तर भाग १३।१४।१५ याचे आधारें मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमांचें विवेचन केलेले आहे. त्यामुळे भाग १३।१४।१५ यांत जे निवडक कागद छापले आहेत त्यांचे महत्त्व, कालनिर्णय, लेखक, नवीन भर, जुन्यास पुष्टि, व्यक्तिस्वभाव इत्यादि प्रकारची चर्चा या प्रबंधात आलेली नाहीं. विशेषतः या तीन खंडांतील अनेक कागदपत्रांचे आधारें मराठ्याच्या उत्तरेकडील हालचालींचें सटीक विवेचनच यांत आलेलें आहे.

रा. दिघे याच्या सदरील विवेचनांत मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश कसा झाला, राजकारणाला उत्तराभिमुखी रोख कोणीं उत्पन्न केला, त्या धोरणाची सयुक्तिकता वा अयुक्तिकता, निजाम ' खळी ' दक्षिणेंत नेस्तनाबूद न करण्यामुळें पुढें ओढवलेली विपत्ति, भोपाळच्या विजयांत पानिपतच्या पराजयाचें मूळ कसें शोधतां येईल, बाजीराव पेशव्याचें अप्रतिम सेनानीत्व व अतुल कर्तबगारी आणि स्वराज्याची साम्राज्यांत वाढ इत्यादि अनेक मुद्यांचा खल रा. दिघे यांनीं केला आहे. आपलें म्हणणें त्यानीं बहुधा अस्सल कागदपत्राचे आधारें ( उतारे समाविष्ट करूनच ) सजविलें आहे. स्वतःचे शब्दात घातलेल्या मजकुरांत जसें त्यानी जुने गोड शब्दप्रयोग मुद्दाम उचलून घेऊन योजिले आहेत, तसे बऱ्याच स्थळीं मुळांतीलच मजकूर व भाषा जराशी अर्वाचीन करून वापरली आहे.

रा दिघे यांनीं आपलें म्हणणें माडतांना कोणतीहि सकुचित वृत्ति ठेविली नाहीं तर खऱ्या इतिहासविवेचकाचे ठायीं जी उदार पण निस्पृह वृत्ति असावी लागते तिचाच अवलंब केला आहे. मतप्रदर्शन करणें हें तर रा. दिघे यांचें या प्रबंधात एक मुख्य प्रयोजन आहे. तीं त्यांचीं मतें किंवा अभिप्राय मान्य होवोत वा न होवोत, त्यांनीं आपल्या बाजूनें केलेलें मतप्रदर्शन साधार व सभ्य असें करावयाची खबरदारी घेतली आहे किंवा नाही हें आपणास प्रथम पाहिलें पाहिजे तसें त्यांनीं केलें आहे असें हा प्रबंध वाचणाऱ्या कोणासहि कबूल करावें लागेल आधार, आवृत्तिनिर्देश व पानें हीं तपशिलवार जेथे नाहींत तेथें मात्र जरा न्यून भासेल हें खरें

रा. दिघे याच्या विवेचनात पुष्कळ ठिकाणीं विचार करण्यासारखे मुद्दे आलेले आहेत. दक्षिणेंतून उत्तर जिंकण्याचा मराठयाचा प्रयत्न हा कसा अपूर्व ठरतो, याचें विवेचन ( पृ. ७० ) मननीय आहे. पूर्वी सत्याश्रय पुलकेशी वगैरे दक्षिण्यानीं उत्तरेंत घुसण्याचा प्रयत्न केला, पण दक्षिण्यांनीं उत्तरेवर दीर्घकालीन कब्जा केला असा हिंदुस्थानच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासांत फक्त मराठ्यांनींच ! दुसऱ्या कोणासहि हा अद्वितीय गौरव प्राप्त झाला नाहीं.

भोपाळ व पानिपत या युद्धांच्या साम्याचें विवेचनहि ( पृ. ६२ ) मार्मिक उतरलें आहे. भोपाळास निजामास अजी गाडून टाकावयाचा होता म्हणजे ' सारी दक्षिण मोकळी ' झाली असती असें रा. दिघे म्हणतात. पण अबदालीनें तरी एवढे जीव खर्ची घालून काय मिळविलें ? लूट घेऊनच गेला, याहून काय? कसेंहि असलें तरी निजामासारखा प्रबळ प्रतिस्पर्धी अगदीं पुण्यापासून पंचवीस कोसावर लागून राहिल्यामुळें एक प्रकारें ' अस्तनींतच अग्न ' राखल्याप्रमाणें झाले आणि ही अगदीं मराठी साम्राज्याच्या हृदयाजवळची जहरी जखम सदा वहातच राहिली आणि त्यातच हैदराचा शूळ उपटल्यामुळे माधवरावाचा व त्याबरोबरच मराठी सत्तेचा ' क्षय ' झाला ! दिल्लीच्या टोंकाकडून ताण लावून निजामास उलथण्याचा बाजीरावाचा प्रयत्न जरी पाहिजे तेवढा यशस्वी झाला

नाहीं तरी रघूजी भोसल्याखेरीज त्याच्या बरोबरीच्या प्रतिपक्षीयांत खणखणीत पराक्रमी असे कोणी दुसरे आढळत नाहीत. किंबहुना बाजीराव हिंदुस्थानात त्या वेळीं सेनानीत्वात अद्वितीयच होता आणि त्यास त्याचा समगुणी बंधु चिमाजी अप्पा याचें साहाय्य मिळाल्यामुळें रामलक्ष्मणांप्रमाणें बाजीचिमाजींची जोडी भरतखंडभर गाजली व मराठ्यांच्या इतिहासात एका अत्यंत प्रभावशाली व उज्ज्वल अशा प्रकरणाची त्यांनीं भर टाकली यात शंका नाहीं. हाच त्यांचा पराक्रम रा. दिघे यानीं निर्मळ मनानें व निर्भय चित्तानें परंतु आधार न सोडतां या प्रबंधांत वर्णन केला आहे. रा दिघे यांची भाषा विषयानुरूप आहे. ' भोपाळचा विजय हा मराठी साम्राज्याचा पहिला जाहीरनामा होय ' असे चटकदार व भरदार वाक्यप्रयोग या लहानशा प्रबंधात बरेच आहेत; त्यावरून जसा रा. दिघे याचा विचार व सराव वाढेल तसा त्याचा अधिकार व प्रभावहि वाढेल असा भरंवसा वाटतो.

रा दिघे याच्या मताची चर्चा करण्यास येथें अवकाश नाही, आणि या पुरस्काराचें तें प्रयोजनहि नाहीं. तरुण पिढींत रा. दिघे यांच्यासारखे पदवीधर इतिहासाभ्यासी जर असे प्रबंध रचण्यासाठीं श्रमतील तर जी साधनसंपत्ति मोठ्या प्रयाससायासानें आज पन्नास वर्षे जमा करण्यात आली आहे, तिचें योग्य चीज होऊन मराठ्यांचा विस्तृत, सांगोपांग व साधार इतिहास लिहिला जाण्याची वेळ जवळ येईल.

ज्येष्ठ शु. ७ मी.
पुणें शके १८५५

दत्तो वामन पोतदार
चिटणीस भा. इ. स म., मंडळातर्फे

# प्रास्ताविक

अठराव्या शतकाचा हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे मराठ्यांचाच इतिहास होय. शिवरायानें लाविलेल्या रोपट्याचा घनदाट वृक्ष वाढून त्याच्या फांद्या चोहोंकडे फैलावल्या. स्वराज्यसस्थापनेचा इतिहास जितका उद्बोधक तितकाच उद्बोधक मराठी साम्राज्य-संस्थापनेचा आहे. मराठ्याचा उत्तरेंत प्रथम प्रवेश झाल्यापासून १७४०पर्यंत मराठी सत्तेचा विस्तार कसकसा होत गेला याची या छोट्या प्रबंधात शास्त्रीय पद्धतीनें चिकित्सा केली आहे.

पेशवे-दप्तरांतील स्वयंप्रमाण असे पुष्कळ कागदपत्र प्रसिद्ध झाल्यामुळें या विषयास चालना मिळणें साहजिक आहे. यापूर्वी मराठी साम्राज्यसंस्थापनेच्या काळासंबधीं उल्लेख अगदी त्रोटक असल्यामुळें कोणाहि लेखकास या काळांतील मराठ्याच्या उत्तरेकडील हालचालीचीं अस्पष्ट रूपरेषा काढण्यापलीकडे जाता येणें शक्य नव्हतें. ग्रँट डफ्, पेशवे-शकावली व इतर तुटपुजीं साधनें यांच्या साहाय्यानें या विषयाचें विवेचन करण्याचा प्रयत्न रा सा. रियासतकार सरदेसाई यांनीं आपल्या परीनें केला. तेव्हा उपलब्ध असलेल्या साधनावरून रियासतकारांनीं आपलें काम कसोशीनें बजावलें असल्यामुळें नागपूरचे प्रो. सिंहप्रभृति लेखकांनीं याच सामग्रीवर आपले ग्रंथ सजविले. आता मात्र पेशवे-दप्तरांतील निवडक पत्रसग्रह प्रसिद्ध झाल्यामुळें या विषयाचा फेरविचार करणें अपरिहार्य आहे.

पेशव्याच्या सरकारी दप्तरखान्यातील अव्वल दर्जाचीं हीं पत्रें असल्यामुळें आता पूर्वीप्रमाणें चांचपडण्याचें कारण नाहीं. निःशंकपणें या प्रातात वावरण्याची सोय झाली आहे. या साधनांच्या आधारानें विषयाची माडणी केली असल्यामुळें या ग्रंथातील विवेचनाला एक तऱ्हेचा निश्चितपणा आला आहे जयपूर, जोधपूर, हैद्राबाद येथील सरकारी दप्तरखान्यातील साधनें केव्हां प्रसिद्ध होतील तीं होवोत; तीं उपलब्ध झाल्यास मूळ वृत्तातास पोषक अशीच म्हणजे तपशिलाचीच भर पडेल. पेशवे-दप्तराच्या आधारावर केलेल्या माडणीची उलथापालथ होईल असल्या क्रांतिकारक शोधाची कोणीं अपेक्षा करू नये.

अशी एक समजूत प्रचलित आहे कीं, मराठ्याच्या उत्तराभिमुखी राजकारणाचा प्रणेता बाळाजी विश्वनाथ होय. शाहू, बाळाजी विश्वनाथ, शंकराजी मल्हार यांनीं परिस्थितीचें आकलन करून मराठी राज्याचा प्रसार कोणत्या धोरणानें व्हावा हें निश्चित केलें व बाजीरावानें हें धोरण फक्त अंमलात आणलें. या समजुतीला आधार एकच व तो म्हणजे असा विचित्र कीं, 'या काळासंबधीं व्हावा तितका पत्रव्यवहार उपलब्ध होत नाहीं.' ही विचारसरणी व्यवहाराला व तर्कशास्त्राला खरोखर सोडून नव्हे काय? १७०८त मराठी राज्याला लागलेलें ग्रहण दूर झालें तरी महाराष्ट्राची अव्यत दैन्यावस्था उडाली होती.

पुणें-सातारा टापूत आपला अंमल जारी करणें शाहूस मोठ्या मुष्किलीची गोष्ट होऊन बसली होती. अशा वेळीं साम्राज्यविस्ताराची सुखस्वप्नें त्यास पडत होतीं हें पटत नाहीं. दमाजी थोरात, कृष्णराव खटावकर, उदाजी चव्हाण अशा प्रबळ बंडखोरांशी समेट करून शाहूचें आसन स्थिर करण्याच्या प्रयत्नांत असलेला बाळाजी विश्वनाथ मोगल साम्राज्यावर आक्रमण करून मराठी राज्यविस्तार व्हावा असें धोरण ठरवितो, हें म्हणणें अवास्तव भासतें. पेशवेबखरींत बाळाजी विश्वनाथाच्या कामगिरीचें जें रसभरित वर्णन केलें आहे त्याचें कारण म्हणजे तो पेशवे घराण्याचा संस्थापक होता हें होय बाजीराव व नानासाहेब यांनीं पेशवे घराण्याचें वैभव थोर पदवीला पोंहोंचविल्यामुळें साहजिकच बाळाजी विश्वनाथाच्या कामगिरीला महत्त्व प्राप्त होतें. मुलगा थोर व कर्तृत्ववान् निघाला कीं, त्याच्या कर्तबगारीचा अंशभाक् त्याचा जनक असला पाहिजे अशी कांहींशी भ्रामक कल्पना या समजुतीच्या मुळाशीं आहे. कित्येक वेळां अशी कल्पना केल्यास ती साजरी होण्याजोगा बाप असतो म्हणून तशी वस्तुस्थिति असते किंवा असली पाहिजे असें नाहीं

पेशवेदप्तरांत काम करतांना स्वतःच्या उपयोगाकरितां जीं टिपणें केलीं तींच थोड्याशा विस्तारानें येथें मांडलीं आहेत शास्त्रीय ऐतिहासिक लेखनांत आधाराशिवाय एक वाक्य लिहिण्याची सोय नाहीं ठिकठिकाणीं पत्रांतील उतारे दिल्याशिवाय एक पाऊल पुढें टाकता येत नाहीं भाषाही बदलत असल्यामुळें जुन्या भाषेंतील प्रयोग सामान्य वाचकांस दुर्बोध होतात. पण पत्रांतील उतारे देणें आवश्यक असल्यामुळें ही दुर्बोधता टाळणें अशक्यप्राय होतें त्याचप्रमाणें गतकालीन पत्रव्यवहारांत मन सारखें वावरत असल्यामुळें कांहीं कांहीं शब्दांची पकड मनावर न कळत बसते तसेंच कित्येक प्रसंगांच्या तारखा व वर्षें निश्चित्.,करण्याकरितां गणिती पद्धतीनें लिहिल्याशिवाय गत्यंतरच नसतें या प्रबंधांत या तऱ्हेचे कित्येक दोष—म्हटले तर!—आहेत, याची मला जाणीव आहे. पुढील भागांत (१७४०–१७६१) ते टाळण्याची शक्य तितकी खबरदारी घेतली आहे.

सरतेशेवटीं मला माझ्या कार्यांत ज्यांचें साहाय्य झालें त्यांचे मनःपूर्वक आभार मानून ही प्रस्तावना संपवितों. रियासतकार सरदेसाई व रा. कृष्णाजीपंत पुरंदरे यांच्याच जवळ इतिहाससंशोधनाचे पहिले धडे मीं गिरविले. या दोघा महाभागांचे मानावे तितके उपकार थोडेच आहेत. प्रो. पोतदार यांचा व माझा अनेक वर्षांचा गुरुशिष्यांचा संबंध असून त्यांच्याच प्रोत्साहनानें हा छोटा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें धाडस मी करीत आहें मजकूर तपासून व वेळोवेळीं सूचना करून मला मदत केल्याबद्दल माझे स्नेही श्री. शंकरराव जोशी यांचाहि मी आभारी आहें.

१ जून १९३३ }
पुणें. }

विश्वनाथ गोविंद दिघे.

# अनुक्रमणिका


प्रकरण १ लें—मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश व दयाबहादूरचा पाडाव

,, २ रें—बुंदेलखंड माळव्यांतून बंगषची पीछेहाट

,, ३ रें—शिंदेहोळकरांच्या स्वाऱ्या

,, ४ थें—समेटाचा प्रयत्न

,, ५ वें—दिल्लीवर चढाई

,, ६ वें—भोपाळचें युद्ध व निजामाचा पाडाव

,, ७ वें—नादिरशाहाची स्वारी व तिचे मराठी राजकारणावर परिणाम

,, ८ वें—बाजीरावाच्या कार्याचें समालोचन

# साधनग्रंथांची यादी


१ मराठी

१–६ पेशवेदप्तरातून निवडलेले कागदपत्र–भाग १०,१३,१४,१५,१७,२२, रा. सा. सरदेसाई यांनीं संपादिलेले

७–९ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें–खंड २, ३, ६–राजवाडे

१० ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र यांतील पत्रें } रा. ब. पारसनीस
११ इतिहाससंग्रह

१२ कैफियत यादी वगैरे
१३ शाहू रोजनिशी } रा. ब. वाड
१४ बाळाजी बाजीराव रोजनिशी

१५ भारत-इतिहास-संशोधक-मंडळ त्रैमासिक

२ हिंदी

१६ रजपुताना का इतिहास–गौरीशंकर ओझा

३ फारसी

१७ तारीख–इ–हिंदी रुस्तुमअली
१८ तझकिरा–आनदराम मुखलिस } Translated by Elliot and Dowson
१९ तारीख–इ–इब्राहीमखान

४ इंग्रजी

२० *A Memoir of Central India*—Sir John Malcolm
२१ *Later Mughals*, Vol. II—Irvine
२२ *Army of the Indian Mughals*—Irvine
२३ *Fall of the Mughal Empire*—Sir Jadunath Sarkar.

# मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा

## प्रकरण पहिलें

# मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश

## दयाबहादरचा पाडाव

(इ. स. १७२[illegible]–१७[illegible])

उत्तरेंतील विजय हा बाजीरावाच्या कारकीर्दीचा अत्यंत यशस्वी भाग होय; किंबहुना या पेशव्यास जें महत्पद प्राप्त झालें, त्याचें कारण त्याच्या उत्तराभिमुखी राजकारणांत सांठविलें आहे असें म्हटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. दक्षिण जिंकावयाचा निर्धार बांधून १६८१च्या सुरुवातीस औरंगजेब बादशहानें अलोट सैन्यानिशीं नर्मदा ओलांडली व एकामागून एक दक्षिणेंतील लहानमोठीं राज्यें भरडून काढण्यास सुरुवात केली. विजापूर, गोवळकोंडा व कर्नाटक या राज्यांचा थोडक्याच दिवसांत चक्काचूर उडाला, पण मराठे मात्र अजिंक्य ठरले. बादशहाच्या सैन्याशीं सतत पचवीस वर्षें जें युद्ध चाललें तें एका व्यक्तीनें किंवा राजानें चालविलें नसून लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीं या समयीं कष्ट मेहनत केली. सर्वस्व गमावून बसण्याची वेळ आली असतां, मराठ्यांनीं जो निकराचा झगडा चालविला तो अनुपमेय आहे. या युद्धाचा एक परिणाम म्हणजे सर्व देश एक लष्करी छावणी होऊन बसला. औरंगजेब शांत झाल्यावर शाहजादा दक्षिणची मोहिम अर्धवट टाकून दिल्लीच्या तख्ताकरितां युद्धाच्या तयारीनें सर्व सैन्यानिशीं उत्तरेकडे निघून गेला आणि मराठी राज्यास लागलेलें ग्रहण कायमचें सुटलें. मराठ्यांचें पारिपत्य आपल्या हातून होत नाहीं, तर फूट पाडून त्यांचें सामर्थ्य कमी करावें या हेतूनें शाहूची मुक्तता करण्यांत आली व अपेक्षेप्रमाणें मराठ्यांत पक्ष उत्पन्न होऊन एकमेकाच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्याचे उद्योग सुरू झाले. अंतस्थ कलहानें खर्ची होणाऱ्या सामर्थ्याचा राष्ट्रसंवर्धनाकडे उपयोग करून घेणाऱ्या व्यक्तीची मराठी राज्याला अत्यंत जरूर होती आणि ती उणीव बाजीरावानें उत्कृष्ट रीतीनें भरून काढली. देशांत अराजक माजलें आहे, यावर रामबाण इलाज राज्याचा विस्तार साम्राज्यांत करावा या धाडसी कल्पनेचा उद्भव बाजीरावाच्या डोक्यात झाला, आणि कल्पकतेला शौर्याची जोड देऊन मराठ्यांची दृष्टि त्यानें उत्तराभिमुखी केली. मोगल झनान्यात आयुष्यांतील उत्तम काळ निघून गेल्यामुळें शाहू या कामास नालायक झाला आणि कारकुनींतून वाढलेल्या बाळाजीपंत नानास या भव्य कार्यव्यापाची कल्पना आली असेल असें वाटत नाहीं.

बाजीरावानें ही जी कामगिरी बजावली ती क्रांतिकारकच समजली पाहिजे. कारण तिच्याच अनुरोधानें मराठशाहीचें धोरण अर्धशतक चाललें. महानदीला पूर येऊन सर्व प्रदेश जलमय होऊन जातो, शेंकडों शेतांची, घरादारांची नासाडी होऊन हजारों कुटुंबें निराश्रित होतात, पण कुशल एंजिनियर बांध बांधून, कालवे खणून, पुराचें पाणी दूरवर खेळवून, वाळवंटाचें नंदनवन बनवितो; तद्वतच बाजीरावानें आपसांतील यादवीनें क्षीण होत जाणाऱ्या सामर्थ्याला नवीन मार्ग दाखवून दिला आणि महाराष्ट्राचें वैभव वाढविलें.

मराठशाहीच्या हिताच्या दृष्टीनें हें धोरण इष्ट होतें किंवा नव्हतें, स्वराज्याची निरवानिरव करून दक्षिणेकडे बाजीरावानें लक्ष पुरविणें रास्त ठरलें असतें वा नसतें इत्यादि प्रश्न विचारार्ह आहेत, त्यांचें विवेचन योग्य स्थळीं होईल सुरुवातीस मराठ्यांचा फैलाव उत्तरेकडे कसा होत गेला, कोणत्या व्यक्तींचे पराक्रम मराठी साम्राज्य-स्थापनेला कारणीभूत झाले याचा विचार केला पाहिजे.

एकादे वेळेस नदीचें मूळ शोधून काढतां येईल व ऋषीकडून त्याचें कूळसुद्धां कळेल पण मराठ्यांचा माळव्यात प्रथम प्रवेश केव्हां झाला हें सांगणें अशक्यप्राय! १६९० मध्यें मराठ्यांची टोळधाड माळव्यांत एकदां उतरली असा मालकमनें उल्लेख केला आहे; १६९८ त पवारानें मांडव लुटलें. पण तेथून त्यास लवकरच परतावें लागलें, यानंतर १७०५ त मराठ्यांच्या लष्करानें माळव्यांत धामधूम मांडली. या स्वाऱ्या म्हणजे औरंगजेबाला उत्तरेकडून पायबंद देण्याकरितां केलेल्या, त्यांना तात्कालिक महत्त्वापेक्षां जास्त महत्त्व देतां येत नाहीं औरंगजेबासारखा कजाग शत्रु छातीवर पाय देऊन उभा असतां साम्राज्यविस्ताराचा विचार मराठ्यांना सुचला हें विचारशक्तीला पटत नाहीं. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मात्र ही परिस्थिति पालटली. १७०७ नतर दिल्ली येथील झालेल्या घडामोडी ज्यांनीं पाहिल्या त्यांना मोंगल साम्राज्याची मजबुती आंतून पोंखरलेल्या जुनाट वृक्षापेक्षां जास्त नाहीं हें दृष्टोत्पत्तीस आलें. १७०७ नंतर शाहाजाद्यांमध्यें झालेलीं युद्धें, शीख, बुंदेले यांचीं बंडें, स्वतंत्र होऊं पाहाणाऱ्या सुभेदारांच्या मसलती, बादशहाशीं फटकून वागण्याची रजपुतांची प्रवृत्ति या सर्व चिन्हांवरून मोगल राजवटीचे दिवस संपुष्टांत आले आहेत, हें सांगण्यास भविष्यवाद्याची जरूर नव्हती. सामान्य माणसालासुद्धां हा प्रवाह कोठें चालला आहे याची अटकळ आली, तर राजकारणाचे डावपेंच खेळणारे मुत्सद्दी यांनीं या परिस्थितीचें अवग्रहण करून आपल्याला त्याचा फायदा कसा करून घेतां येईल याची मनाशीं गांठ बांधली तर नवल नाहीं. इंग्रज येथें व्यापाराकरितां आले, मुलूख संपादण्याची मनीषा एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या दौर्बल्यामुळें उद्भवली हाच न्याय सर्वत्र लागू पडतो. बलिष्ठांनीं दुबळ्यांचें जीवन शोषून पुष्ट व्हावें, या सृष्टिक्रमातील न्यायाला राजनीतिशास्त्र अपवाद नाहीं सांगण्याचें तात्पर्य म्हणजे, दिल्लीतील भान-

गडींत हात घुसवून मोगल साम्राज्याचे लचके तोडण्याची वेळ आली आहे, याची कल्पना मराठ्यांना औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच आली. त्यांच्या सुदैवानें त्यांना या वेळीं चांगलाच हात दिला. शंकराजी मल्हार सचिव काशीवासास गेला असता संन्याशाच्या निष्क्रिय जीवितास कंटाळून हा राजकारणपटु सय्यदांकडे गेला आणि हुसेनअली दक्षिणेंत असता बादशहावर छाप ठेवण्याकरितां मराठ्यांची मदत घ्यावी असें त्यानें सय्यदांस सुचविलें. त्याचें म्हणणें मान्य होऊन १७१८ त मराठ्यांस अनुकूल असा तह घडून आला. या तहांत जरी गुजराथमाळव्यांचा उल्लेख नाहीं तरी शाहूच्या दरबारांतून जो तहाच्या वाटाघाटीचा मसुदा[1] तयार करण्यांत आला त्यांत गुजराथ-माळवा साधेल तितका साधावा, असें स्पष्ट कलम आहे. हा मुद्दा हुसेनअलीनें कबूल केला नाहीं, पण या वेळेपासून मराठ्यांचें लक्ष माळव्याकडे वेधलें गेलें. हुसेनअलीबरोबर मराठे सैन्य दिल्लीस गेलें व सनदा घेऊन आलें. जातां येतां मराठे अगदीं शिस्तीनें वागले हें त्यांच्या पूर्वचरित्रांवरून खरें वाटत नाहीं. कारण १७१९त माळव्यांत मराठ्यांनीं चालविलेल्या दांडगाईबद्दल बादशहाकडे तक्रारी झाल्या.[2]

बाळाजी विश्वनाथानें स्वराज्याच्या सनदा व दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या चौथसरदेशमुखींचीं फर्मानें मिळविलीं, पण १७२०च्या सुरुवातीस बाळाजी पेशवा दिवंगत झाल्यामुळें या सनदांची अंमलबजावणी बाजीरावावर पडली. खुद्द पेशव्याकडे खानदेश, बागलाण, वऱ्हाड इकडील मुलुखाची वसुली सोंपविण्यांत आली. बाजीरावाच्या सुरुवातीच्या हालचाली खानदेश, बीजागड, कैजापूर, गांडापूर या भागांत कां झाल्या याची उपपत्ति वरील कारणांमुळें सहज लावतां येते. या दोन वर्षांत पेशव्यानें प्रथमच आपल्या कक्षेंतील मुलुखांतून चौथ वसूल केला. खानदेश, नेमाड, माळवा हे प्रांत एकमेकांस जोडून आहेत. निकट सान्निध्य राजकारणांत वैरालाच जास्त कारणीभूत होतें. खानदेश, नेमाडांतून पेशव्याचें सैन्य फिरतांना त्यांतील कित्येक टोळ्यांनीं माळव्यांत शिरून लूटफाट करावी हा सराव रूम या दोन वर्षांत सुरू झाला. माळव्यांत प्रथमारंभीं प्रवेश करण्याचें श्रेय पवारबंधूंस दिलें पाहिजे. शाहू आपणांस मोंगलांचा अंकित समजत असल्यामुळें त्याच्याकडून माळव्यावर चढाई करण्यास अनुमति मिळणें शक्य नव्हतें, तेव्हां आपण नामानिराळे राहून प्रतिवर्षी आपल्या सैन्याच्या लहानमोठ्या तुकड्या माळव्यांत पाठविण्यास बाजीरावानें आरंभ केला. या प्रसंगास उद्देशून बाजीरावानें पवारास आज्ञापत्र काढिलें कीं, "प्रांत गुजराथ व प्रांत माळवा निमे मोकासा हुजरून आम्हांकडे आहे त्यांपैकीं निमे तुम्हांस मोकासा सरंजाम करून दिल्हा आहे. आमची इमारत सर्व तुम्हांवर[3] आहे" (३-१२-१७२२).

१ चिटणीस बखर. २ Irvine. ३ भा. इ. सं. म. ...

१७२२च्या नोव्हेंबरांत पेशव्यानें सातारा सोडलें आणि प्रांत पुणें गंगथडींतून तो बऱ्हाणपुरावर आला

ता. १ फेब्रुवारी १७२३ रोजीं हांडियाजवळ नर्मदा ओलांडून पेशवा नेमाडांत शिरला. या वेळीं पेशव्यांशीं बांडे गायकवाड यांचें सहकार्य आहे, याचा दाखला बांडे यांच्या पत्रांत मिळतो कंठाजी पेशव्यास लिहितो ( जानेवारी १७२३ ), "आपलीं आज्ञापत्रें आलीं कीं, नर्मदातीरीं गांगली घरसपूरचे रोखे भेटीस येणें त्याजवरून यावयास विलंब नाहीं. आम्हांस सनिध आहे पवार गायकवाड मोहनापलीकडे येका मजलीवर आहेत." याच वेळेला दिल्लीचा वजीर निजामन्मुलुक गुजराथचा सुभेदार हैदरकुलीखान यास नतीजा देण्याकरितां दिल्लीहून निघाला. त्यासंबंधीं बांडे लिहितो, "उजनीहून कासीद आला. नवाब निजामनमुलुक उजणीपलीकडे दो मजलीवरी आहे मागाहून नवाब हैदरकुलीखान याची फौज येत आहे. रोहिल्याची फौज नवलाई बडनुरावर आहे."[४] या रोहिल्याची म्हणजे भोपाळच्या यार महमदची बाजीरावाशीं मुलाखत होऊन पेशव्यास हत्ती नजर करण्यांत आला त्याचप्रमाणें बाजीरावाची निजामाशीं १३–२–१७२३ला बदकशा प्रांत झाबवा येथें मुलाखत झाली २३ फेब्रुवारीपर्यंत बाजीराव माळव्यात फिरत होता, त्याच्या मोगल सुभेदाराशीं भेटी झाल्या, यावरून पेशव्यानें माळव्यांतून थोडाफार चौथ वसूल केला असें अनुमान काढावयास काय हरकत आहे? नाहीतर या महिन्यांत जमापोता सदराखालीं जमा झालेल्या रकमांची संगति कशी लावावयाची? बाजीराव माळव्यातून उतरून तावडतोब दक्षिणेकडे फिरला नाहीं. त्यानें आपला मोर्चा नेमाडालगतच्या हंडिया प्रांताकडे फिरविला. खुद्द पेशव्यानें आपल्या सरदारांनीं चालविलेल्या प्रयत्नांचें पुढारीपण आपल्याकडे घेऊन आपल्या लोकांचा उत्साह द्विगुणित केला.

अशा रीतीनें १७२२–२३ पासून माळव्याच्या चौथाईची मागणी सुरू झाली. १७२४च्या जानेवारींत बाजीराव-साताऱ्याहून महाराजाचा निरोप घेऊन निघाला. माघी पौर्णिमेला तो जेजुरीस पोहोंचला तसाच खानदेशांत जाऊन त्यानें लांबकानी[५] ठाणें काबीज केलें. लांबकानीवरून नेमाडांत व नेमाडांतून अकबरपुराजवळ नर्मदा उतरून तो माळव्यांत शिरला या वर्षी माळव्यांत त्याचा मुक्काम दहाबारा दिवसांपेक्षां जास्त नव्हता माळव्याकडे वळण्याचा प्रथम त्याचा विचारच नव्हता. पण दिल्लीचा वजीर निजामन्मुलुक वजिरी सोडून दक्षिणचा सुभा हाताखालीं घालण्याकरिता दक्षिणेकडे चालला होता मराठे आपणांस मिळाले तर

---

४ पे द नि. का १३ ३ ५ शाहुरोजनिशी.

इतिहास ८६८
७-८-३३



नों. न ८६८

आपलें उद्दिष्ट सुलभतेनें साधतां येईल म्हणून निजामानें पेशव्यास भेटीस बोलाविलें. निजामपेशव्यांची भेट नालछा येथें १८ मे १७२४ला झाली.[६] या भेटींत निजामानें १७१९ च्या बादशाही सनदेप्रमाणें दक्षिणच्या चौथ-सरदेशमुखीचे हक्क कबूल करून शिवाय मराठे आपल्या मदतीस आले तर माळव्याची चौथाई व त्यांच्या सैन्याचा खर्च देण्याचें मान्य केलें असावें. याचा मोबदला म्हणून पेशव्यानें निजामास मुबारीजखानाविरुद्ध मदत करण्याचें कबूल केलें. पुढील चार महिने नगर, औरंगाबाद या भागांत पेशव्यानें धुमाकूळ माजविला, आणि फत्तेखर्ड्याच्या युद्धांत निजामाला साहाय्य करून मुबारीजखानाचा पाडाव केला. मराठ्यांच्या मागणीस बादशहाची मान्यता मिळण्याकरितां आणखी १०–१२ वर्षें जावयाचीं होतीं. या कालांत पेशव्याचें सामर्थ्य शुक्लेन्दुप्रमाणें वाढतच गेलें. १७२५ नोव्हेंबर ते १७२६ मे व १७२६ नोव्हेंबर ते १७२७ एप्रिल हीं दोन वर्षें कर्नाटकच्या स्वारींत निघून गेलीं. १७२७त चंद्रसेन जाधव व कोल्हापूरचा संभाजी यांस हातीं घेऊन निजामानें उठावणी केली आणि कांहीं काळ तरी शाहूच्या राज्याचें अस्तित्व संशयास्पद केलें. या सर्व संकटांचें निराकरण बाजीरावानें आपल्या सामर्थ्यानें केलें. स्वत: बाजीराव जरी या वर्षांत उत्तरेकडे फिरकला नाहीं तरी त्यानें गुजराथमाळव्याकडे अगदींच दुर्लक्ष केलें असें नाहीं. १७२४च्या डिसेंबरांत बाजीरावाचें सैन्य अंबाजीपंत पुरंदरे[७] यांच्या नेतृत्वाखालीं उत्तर दिग्विजयास निघालें. अंबाजीपंताबरोबर बाजी भिवराव रेठरेकर व राणोजी शिंदे यांचीं नांवें आढळतात. अंबाजीपंताची स्वारी या वेळीं खानदेशबऱ्हाणपूरच्या मार्गें माळव्यांत न शिरतां गुजराथेंतून शिरली. यापुढील माळव्यांतील स्वाऱ्या गुजराथच्या मार्गें झाल्या आहेत त्याची कारणमीमांसा लावणें जरूर होतें. एक तर खानदेश बऱ्हाणपूर हा मार्ग निजामाच्या मुलुखाजवळून किंबहुना त्याच्या मुलखांतून गेलेला. नुकतेच निजाम व पेशवे स्नेही झालेले आणि बादशहाच्या अधिकाऱ्याला दुखवूं नये अशी शाहूची इच्छा. यामुळें हा मार्ग सोडून मराठी सैन्य या वेळीं गुजराथेंत शिरलें. गुजराथेंत नवीन सुभेदार सरबुलंदखान याचा प्रतिनिधि व हमीदखान यांची चांगलीच जुंपली असून दोन्ही पक्ष मराठ्यास आपणाकडे ओढण्याचा प्रयत्न करीत होते मराठ्यांच्या साहाय्यानें हमीदखानानें आपल्या प्रतिपक्षाला चोपून काढलें. इतक्यांत १७२५ डिसेंबरांत स्वत: सरबुलंदखान मोठ्या तोफखान्यानिशीं अहमदाबादेस दाखल झाल्यामुळें मराठ्यांना काढतें पाऊल घ्यावें लागलें. अंबाजीपंत माळव्याकडे वळला आणि त्यानें चौथाई-सरदेशमुखी वसूल केली. चौथसरदेशमुखी प्रतिवर्षी मराठ्यांस देण्याचें सुभेदारानें अभिवचन दिल्यावरून माळव्यांत ठिकठिकाणीं[८] मराठे अधिकारी नेमण्यांत आले.

---

६ पेशवेरोजकीर्द. ७ पेशवेरोजकीर्द. ८ पेशवेरोजकीर्द.

वावटळ उठली म्हणजे सर्व प्रदेश उध्वस्त होऊन जातो, पुढे तिच्या अस्तित्वाची खूणसुद्धां राहत नाहीं. तद्वत् मराठे सैन्य पावसाळ्यानंतर मोहिमेस बाहेर पडे आणि ७–८ महिने दूरच्या प्रदेशावर पोट भरून मृगाच्या सुरुवातीस देशीं परत येई. बादशहा क्षीण व रोगट. त्याला दूरच्या प्रांतांचा बंदोबस्त ठेवण्याची कुवत नव्हती बादशहाच्या कारभाऱ्यांत दुफळी माजलेली. स्वतःचा जास्तींत जास्त स्वार्थ कसा साधतां येईल इकडे प्रत्येकाची दृष्टि. माळव्यांत मराठ्यांनीं धुंडाई चालविली तिचा प्रतिकार करण्याकरिता सुभेदारानें दिल्लीदरबाराकडे साहाय्याची याचना करून दांताच्या कण्या केल्या, दिल्लीकडून मदत येण्याचें चिन्ह दिसेना तेव्हां मराठ्यांशीं नमतें घेऊन त्यांना थोडेंफार देऊन वाटेस लावल्याशिवाय त्याला दुसरा मार्गच उरला नाहीं. मराठी सैन्याची वावटळ येऊन थडकली म्हणजे होता होईल तितकी टाळाटाळ करावी, करतां येईल तितका प्रतिकार करावा, आणि शेवटीं चौथसरदेशमुखी म्हणून कांहींतरी त्याच्या अंगावर फेंकावें हा क्रम सुरू झाला.

१७२५ पर्यंतच्या स्वाऱ्यांसंबंधीं माहिती मिळते ती जमाखर्चावरून. ती जरी निश्चित स्वरूपाची आहे तरी अगदी त्रोटक आहे. पण १७२५ नोव्हेंबरांत सुरू झालेल्या स्वारीसबंधीं मात्र पत्रांतून उल्लेख आढळतो. माळव्याचा सुभा राजा गिरधरबहादर चौथाईसरदेशमुखीचा अंमल चालूं देईना. त्यावरून शाहूनें आज्ञापत्र रवाना केलें कीं, "राजश्री केसो महादेव दि॥ रा॥ पंतप्रधान यांसी पत्र जें, तुम्हीं विनंतीपत्र पाठविलें प्रविष्ट जालें. रा॥ प्रधानपंतीं आपणांस माळवेयांत पाठविलें. परतु गिरधरबहादर सरदेशमुखीचौथाईचा अमल चालों देत नाहींत येविशीं त्यानीं स्वामीस लिहिलें आहे अमल चालो देणें म्हणून त्यास लिहिलें आहे. याउपर अमल चालवतील" १७२५च्या नोव्हेंबरांत जी स्वारी निघाली तिच्यासबधीं कृष्णाजी हरि रिसबूड लिहितो, "स्वामींचें आज्ञापत्र आलें त्याजवरून केसो महादेव यास वराडप्रांतीं सामील झालों केसो महादेव व त्र्यंबक गगाधर व जनाजी भोसले यांच्या भेटी झाल्या. केसो महादेव याचा अत्याग्रह देखोन रघूजी भोसले याच्या नांवें सिकारोखा केला, त्यांची नष्टाई देखोन राजश्री त्र्यंबक गंगाधर जनाजी भोसले आम्ही येकत्र होवोन राजश्री अंबाजीपतांकडे सामील व्हावयास चाललों तों आम्हा-वर केसो महादेव, रघूजी भोसले चालोन आले आम्हासी युद्धप्रसंग आरंभिला. आम्हीं मांडोगडचा घाट चढून वर आलो सवेंच हेहि आले. इंदुरात फितूर केला. दयाबहादरास सामील झाले दयाबहादर आमचेवर आला. निभाव न होय यास्तव त्याजकडे भला माणूस पाठवून सख्य संपादून आठ रोज सोबत ऐसे केलें. त्यास राजश्री अंबाजीपंत तात्याचें वर्तमान आलें कीं मंदसोरावर आले. दयाबहादरापासोन फुटोन लष्करास सामील व्हावें हा विचार करून निघालो त्यास त्यानीं बहादुराची बहीर लुटली व तात्याकडे न जातां बुदीकोट्याच्या रोखें गेले आम्हास कांहीं रुपया

मिळाला नाहीं." हें पत्र इतक्या विस्तारानें उद्धृत करण्याचें कारण कीं, मराठ्यांच्या माळव्यांतील हालचालींचा सविस्तर उल्लेख प्रथमच या पत्रांत मिळतो.

पुढील सालीं पेशवा स्वत. कर्नाटकच्या स्वारीस गेल्यामुळें त्यानें माळव्यांतील चौथाई व सरदेशमुखीचा सर्व येख्तियार उदाजी पवारास दिला. पवाराबरोबर पेशव्याच्या वतीनें बाजी भिवराव रेठरेकर हजर राहून "देणें वारून बाकी ऐवज राहील त्यापैकीं एक तक्षीम तुम्हास सरदारीस घेणें, दोन तक्षिमा आमचे सरदारीस द्यावेत"[९] असा करार पेशवेपवारांमध्यें ठरला 'उदाजी पवार यांची नेमणूक माळव्यांतील चौथ व सरदेशमुखीचे अधिकारावर केली आहे. त्यास सर्व तऱ्हेची मदत आपणाकडून देण्यात यावी'[१०] या मजकूराचीं पत्रें सुभेदार गिरधर बाहादुर, महमद उमरखान इत्यादिकांना पाठविण्यात आलीं पत्रांतील मजकुरावरून व अधिकारयुक्त वापरलेल्या भाषेच्या झोकावरून पेशव्याच्या चौथसरदेशमुखींच्या मागणीस सुभेदाराकडून नाखुशीनें कां होईना कबुली मिळत चालली होती हें स्पष्ट दिसतें. मराठ्यांनीं जोराचा उठाव केल्याबरोबर सुभेदाराचा उरलासुरला विरोध नाहींसा होईल अशी परिस्थिति निर्माण झाली.

१७२२चें बाजीरावाचें उदाजी पवारास आज्ञापत्र, १७२३ फेब्रुवारींतील बाजीरावाचा माळव्यांत प्रवेश व हालचाली, १७२४ मधील नालछा येथील निजामाची भेट, १७२४ नोव्हेंबर ते १७२५ एप्रिल व १७२६ जानेवारी ते १७२६ मे अंबाजीपंताचें गुजराथमाळव्यांत आगमन, १७२६तील केसो महादेव, कृष्णाजी हरि यांचे माळव्यांतील उद्योग, १७२७तील पवाराशी झालेला तह या सर्व गोष्टी म्हणजे, माळवा मराठी राज्यांत समाविष्ट करण्याकरितां आरंभिलेली पूर्वतयारी हें स्पष्ट निदर्शनास येतें माळव्यालगत असलेले बादशाही सुभे राजपुताना व गुजराथ, गुजराथेंत मराठ्यांनीं धुमाकूळ मांडून सरबुलंदखानास हारीस आणून त्याच्याकडून चौथसरदेशमुखींची कबुली मिळविली रजपूत राजे बादशहाबद्दल उदासीनच नव्हे तर सवाई जयसिंगाच्या मध्यस्थीनें मराठ्यांशी सर्व रीतीनें अनुकूल, अशा नामी परिस्थितींत माळवा मराठ्यांच्या हातीं इतक्या लवकर लागला याचें आश्चर्य वाटत नाहीं

चिमाजीअप्पाची १७२८तील माळव्याची स्वारी म्हणजे १७१९त सुरू झालेल्या राजकारणाचा शेवटचा दुवा होय. माळवा साधेल तितका साधावा एवढेंच पेशव्याचें उद्दिष्ट असतें तर पेशव्यानें इतक्या लवकर उठाव केला नसता पण पेशव्याची दृष्टि माळव्यापलीकडे आग्रा-दिल्ली या मुलखावर होती. शिवाय या वेळीं पेशव्यास माळवागुजराथेंत एक बडा प्रतिस्पर्धि निर्माण झाला होता. शाहूराजानें स्वराज्याची व्यवस्था लावून कर्नाटक फत्तेसिंग भोसले व प्रतिनिधि, कोंकणपट्टी

---

९ पे. द. नि. का. १३. ५.    १० धारच्या लेले यांच्या संग्रहांतील.

कान्होजी आंग्रे, गंगथडी सरलष्कर, खानदेश, बागलाण व प्रांत गुजराथ व प्रांत मालवा निमा पेशवा व निमा सेनापति, याप्रमाणें विस्तृत कार्यक्षेत्रें प्रत्येकास सोंपवून दिलीं. स्वतः महाराजांनीं आपल्याकडे राष्ट्राचें पुढारीपण घेऊन कारभार चालविला असता तर ही व्यवस्था फलदायक होऊन एकदोन शतकें तरी मराठी सत्तेस साम्राज्याचें वैभव भोगतां आलें असतें, पण शाहूमहाराजांच्या प्रकृतीस राज्यकारभाराचें वाळकड नसल्या-मुळें मध्यवर्ती सत्ता हळूहळू ढिली होऊन कारभारीमंडळात चुरस उत्पन्न झाली. या वेळीं या चुरसीनें भडका घेतला नव्हता, तरी ती धुमसत होती आणि याचें प्रत्यंतर म्हणजे पेशवे व सेनापति यांचीं एकमेकांविरुद्ध गुजराथमाळव्यांत चाललेलीं कारस्थानें. गुजराथेंत पेशव्याचा प्रवेश झालेला न साहून सेनापतीनें पेशव्यास शह देण्याकरितां माळव्यांत आपलें लष्कर रवाना केलें. पेशवा निजामाशीं लढण्यांत गुंतला असतां सेनापतीच्या सैन्यानें माळव्यांत शिरून डोंगरपूर, रतलाम, बांसवाडा या प्रांतांत धामधूम करून पांच लाख खंडणी वसूल केली. ' मांडवगड तलाटी वाटेनें जातां अगदीं लुटली ''[११] यापुढें माळव्यांत जुजबी स्वाऱ्या न करतां रगडून अंमल चालवावयाचा असेल तर स्वतः माळवा ताब्यांत घेऊन कारभार चालविला पाहिजे. सेनापतींचें साहाय्य प्रतिपक्षास मिळाल्यास माळव्याच्या सुभेदाराच्या प्रतिकारास तोंड देणें जड जाईल, हें ओळखून बाजीरावानें मोठ्या प्रमाणांत स्वारी करावयाचें ठरविलें. निजामन्मुलुकाचा पाडाव करून त्याला कांहीं काळ तरी जाग्यावर बसविण्यांत आलें. निजामावर संपादून केलेल्या जयामुळें दरबारांतील विरोधकांचा जोर कमी झाला. या अनुकूल परिस्थितीचा फायदा पेशव्यानें पूर्णपणें घेतला स्वतः बाजीराव या वेळीं सुमारें ३० वर्षांचा होता व चिमाजी त्याच्यापेक्षा पांचसात वर्षांनी लहान असावा. वयानें चिमाजी जरी लहान होता तरी त्याचा कामाचा उरक व शहाणपणाचें धोरण यांचा बाजीरावास गेल्या चारपांच वर्षांच्या कारभारांत चांगलाच अनुभव आल्याकारणानें त्यानें भावाची या कामगिरीवर निवड केली आणि या त्याच्या निवडीचें चिमाजीनें योग्य चीज करून दाखविलें. चिमाजीच्या बरोबर बाजीरावानें आपल्या खांद्यास खांदा लावून अनेक लढायांत लढलेले दाजी भिवराव रेटरेकर, राणोजी शिंदे, मल्हाराव होळकर, गणपतराव मेहेंदळे ही विश्वासाचीं माणसें दिलीं [१२] चितळकर, नणदीकर, घोरपडे, शिंदे, ढमढेरे, पवार, निकम इत्यादि निवडक शिलेदार आपल्या पथकानिशीं चिमाजीस दसरा झाल्याबरोबर येऊन मिळाले आणि या सैन्यानें ता. २४-१०-१७२८ ला कूच केलें. चिमाजीअप्पाच्या मदतीस उदाजी पवार असल्यानें बाजीरावास जयाची खात्रीच होती. या वेळचा पत्रव्यवहार पाहिला म्हणजे राष्ट्राच्या रोमरोमांत विजय कसा स्फुरत होता हें स्पष्ट

---

११ शाहूरोजनिशी २१४. १२ पेशवेरोजकीर्द.

दिसतें. एका पत्रांत चुकूनसुद्धां नैराश्याची काळी छटा उमटत नाहीं. स्वत बाजीराव सुमारें २५ हजार स्वारानिशीं गगथडींत सरलष्कराचा अंमल बसवून देण्यासाठीं निघाला व चिमाजीनें तितक्याच तोलदार सैन्यानिशीं हिंदुस्थानकडे मोर्चा वळविला. बाजीराव चिमाजीस लिहितो.–"राजश्री स्वामींची भेट नात्यापुत्याजवळ जाली. श्रीमहादेवाचें दर्शन जाहलियावर कूच करून नीरातीरास राजश्री आले. आम्ही छ ५ जा।।वली राजश्रींची आज्ञा घेऊन कडेवळींत प्रांतें आलों. सरलष्कर समागमें आहेत. गंगातीर प्रांतें बीडपाथरीकडे जात आहों. राजश्री सरलष्करच्या सरंजामांत त्याचा अमल बसवून द्यावयाचा आहे तो बैसऊन पुढें पोट भरावयास जिकडे जाणें तिकडे जाऊं. तुम्ही गेलियातागायत वर्तमान नाहीं. तरी वर्तमान वरचेवर पंधरवडियांत अगर महिन्याचे महिना लिहून पाठविणें."[१३] गगथडींतील कार्य उरकून बाजीराव वऱ्हाडांत शिरतो इतक्यांत भावानें संपादिलेल्या विजयाची वार्ता येऊन थडकली. "तुम्ही गेल्यादारभ्य पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं सांप्रत आजीच वर्तमान आलें कीं, तुमचे व गिरिधरबहादर यांचें युध जाहालें. गिरिधरबहादर याजकडील कित्येक सरदार व लोक मारून खासा दस्त जाहला म्हणून वर्तमान आलें आहे. येसियासी ये गोष्टीचें तत्वता वर्तमान काय आहे तें सविस्तर लिहून पाठविणें."[१४]

चिमाजीनें जें तपशील वर्तमान कळविलें त्यांत सुरवातीचे तपशील नसल्यामुळे ते रोजकीर्दीवरून घेणें जरूर आहे. कार्तिक महिन्यांत सैन्याची जमवाजमव करून चिमाजी झपाट्यानें निघाला. त्याच्या स्वभावाला ढिलाई ठाऊक नव्हती. चिमाजीचें वैशिष्ट्य म्हणजे त्याचा कामाचा उरक व तडफ. सैन्य जुळवून वेगानें कूच करून शत्रूवर कोसळून पडलें म्हणजे प्रतिपक्षाचें पेकाट मोडल्याप्रमाणें होतें, हें तत्त्व एकट्या नेपोलिअँला अवगत होतें असें नाहीं. कार्तिक वद्य चतुर्थीस चिमाजीचा मुक्काम चांदवडला झाला. नाशिकचे डोंगर चढून निंबाईत धुळें नंदुरबार मागें टाकून अवघ्या बारा दिवसांत तो सातपुड्यांतील करवंदबारीच्या तोंडाशीं पोहोंचला. मार्गशीर्ष प्रतिपदेला नर्मदेवर चिमाजीचा मुक्काम पडला. रेवातीरीं पूजाअर्चा करून मार्गशीर्ष अष्टमीस तो नालछास पोहोंचला दोन दिवसांनीं मार्गशीर्ष शु।। १०, (२९-११-१७२८) रोजीं* आमझरें येथें माळव्याचा सुभा दयाबहादर याशीं गांठ घालून त्याचा फन्ना उडविला. चिमाजीनें आपल्या भावास तातडतोब कळविलें कीं, "दयाबहादर वहमें करून युद्धास आला, त्याचें आपलें युद्ध बहुत जाहलें, निदान त्यास सेनासहवर्तमान बुडऊन येश प्राप्त जाहालें. बाहादर याचे युधीं राजश्री पवार व हुजूरच्या

१३ पे. द. नि. का. १४. १४ पे. द. नि. का. १३. १५. *टीप २३ पहा.

पथकांनीं कस्त मेहनत बहुत केली."[१५] पिलाजी जाधवाच्या पत्रांत चिमाजी लिहितो " दयाबहादुर आमझऱ्याचा घाट बंद करून आमझरियावर राहिला होता. तो घाट टाकून मांडवगडचे घाट चढून गेलियावर तो चालोन आला. याजकरितां जरूर जाणोन युध करणे लागलें. खासा वगैरे सरदार पडले, लष्कर लुटलें. अठरा हत्ती पाडाव आले."[१६] दावलजी सोमवशीस लिहिलेल्या पत्रांत एकदोन तपशील जास्त मिळतात. " दयाबहादुर दहमियानें चालोन आला, त्याचे व आपले फौजेचे दोन प्रहर युध जाहाले. दयाबहादूर ठार पडले व वरकड मातबर येकदोवे सरदार याजकडील पडले. हत्ती, निशाणे, नगारे व घोडी पाडाव करून लुटून फन्ना केला. धण्याचे व वडिलांचें पुण्यें फत्ते जाहाली."[१७]

चिमाजीचा प्रतिस्पर्धी दयाबहादर सामान्य वीर नव्हता. मोगल राजवटीत मोठाल्या लढाया मारल्यामुळें बादशहाच्या प्रमुख उमरावांत हें कुटुंब गणलें जाई. गिरिधरबहादर व दयाबहादर हे चुलतभाऊ. गिरधरचा बाप अलाहाबादचा सुभा असतां त्याचें व सय्यद बंधूचें वांकडें आल्यामुळें अलाहाबादवर बादशाही सैन्याची रवानगी झाली गिरिधरबहादरचा बाप एकाएकीं वारला पण त्याचा मुलगा गिरिधर व पुतण्या दयाबहादर यानें वर्षभर टक्कर देऊन बादशाही सैन्याला नासोहरम केलें. मराठ्यांना थोपवून धरण्याकरितां तशाच कणखर वृत्तीच्या माणसाची आवश्यकता जाणून माळव्याच्या सुभ्यावर गिरिधरची नेमणूक १७२५त करण्यांत आली. माळव्याच्या दक्षिण भागातून विंध्यसातपुड्याच्या रांगा गेलेल्या. सूर्यकिरणाचा कधीहि प्रवेश झाला नाहीं अशा दाट अरण्याच्या सांदीकोपऱ्यांत राहून वेळ सांपडली म्हणजे जाणारेयेणारे काफले, बादशहाचा खजिना, लहानसहान सैनिकांच्या टोळ्या यांजवर झडप घालून त्यांना लुटण्यास पादशाहीच्या चढत्या वैभवाच्या काळांत ज्यांनीं मागें-पुढें पाहिलें नाहीं, अशा भिल्ल लोकांचें हें वसतिस्थान आणि आतां तर ते मराठ्यांचे दोस्त बनलेले बादशहाकडून मदतीची अपेक्षा करणें फोल होतें इतकेंच नव्हे, तर बाजीरावानें माळव्यांत धामधूम मांडली तर बादशहास त्या प्रांताची चौथसरदेशमुखी मराठ्यांस देण्याचें आम्ही सांगूं असें दिल्लीचे उमराव बाजीरावास लिहीत होते[१८] सारांश, गिरिधरनें स्वीकारलेली कामगिरी कष्टाची व जिकीरीची होती

१७२८च्या सुरवातीस उदाजी पवार व चिमणाजी दामोदर याच्याशी झालेल्या एका लहानशा चकमकींत गिरिधरबहादर मारला गेला असावा कारण यापुढील पत्रव्यवहारांत गिरिधरबहादराचें नांव येत नाही. चिमाजीनें मुकाबला केला तो दयाबहादराशीं पेशवे दप्तर भाग १३तील बाजीरावाची दोन पत्रें सोडली तर गिरिधरबहा-

---

१५ पे. द. नि. का १३. २३.
१६ पे. द. नि. का १३. २७.
१७ पे. द नि. का १३. २६
१८ पे. द. नि. का. १३. १०

दृति. ७८८८
७-८-३३

नोंद नं ८८८८


दरचा नामनिर्देश नाहीं व खुद्द चिमाजीनें त्याचा उल्लेख केलेला नाहीं. दयाबहादरच्या ऐवजी गिरिधरबहादर असा उल्लेख बाजीरावानें गैरसमजुतीनें केला असावा. भावाच्या मृत्यूचा सूड उगवावा व मराठ्यांचा ससेमिरा कायमचा नाहींसा करावा या उद्देशानें दयाबहादर १७२८च्या नोव्हेंबरांत युद्धाच्या तयारीनें सर्व वाट बंद करून आमझरें येथें राहिला. आमझऱ्याच्या घाटांत मराठी फौजेस कोंडून निकाल लावावा या बेतानें आपल्या प्रचंड तोफखान्याची यानें रचना केली. पण मराठे दुधखुळे नव्हते. दयाबहादरच्या आमझरें येथील जय्यत तयारीची वातमी कळताच त्यांनीं मांडवगडच्या वाटाचा मार्ग धरला. दयाबहादराच्या तोफखान्यास गप्प बसवील इतका तोफखाना त्यांच्याजवळ नव्हता बहादरचा तोफखाना निरुपयोगी ठरला तरच मराठ्यांना जयाची आशा होती. चपळाईच्या दौडीत त्यानें कसब साळविलेलें होतें. मांडवगडाच्या[१९] वाटें मराठे वर चढले तेव्हां दयाबहादरचे युद्धाचे बेत ढांसळले. मराठ्यांस लढाई देण्याकरितां त्यानें तोंड फिरविलें, पण तोफांची हालचाल इतक्या तांतडीनें करतां येईना चिमाजीनें लढाईचा हुकूम दिला. दोन प्रहर झुंज कडाक्याचें झालें. मराठी शिलेदारांनी चालून घेऊन सीमेपरता मार दिला जगदेवराव[२०] पवार मारामार करीत दयाबहादरच्या हत्तीपर्यंत पोहोंचला, व वर चढून त्यानें खाशाचें डोकें कापलें. खासा दयाबहादर व त्याचे दोन पराक्रमी सरदार गुलाबराम व आनंदराम धारातीर्थीं पतन पावले. खासा सरदार मारला गेल्यावर सैन्यानें पळ काढला, मराठ्यांस अगणित लूट सांपडली पाडाव झालेले अठरा[२१] हत्ती चिमाजीनें परत आल्यावर शाहूस नजर केले

चिमाजीवर सोंपविलेली ही पहिली मोठी स्वारी. त्यानें संपादिलेल्या अपूर्व विजयाबद्दल त्याचें सर्वांनीं कौतुक केलें मल्हार दादाजी लिहितो, “प्रथम स्वारीस स्वामी गेले वडिलांचे आशीर्वाद व महाराज स्वामींचे प्रतापें थोर येश पदरीं पडलें. कीर्तिघोष दिगंतीं झाला.” दावलजी सोमवंशी सरलष्कर यास “संतोषाच्या कोटी” जाल्या. पिलाजी जाधवानें “श्रीनें थोर येश दिल्हें” म्हणून समाधान व्यक्त केलें. वृद्ध मुत्सद्दी चिमणाजी दामोदर यानें संतोष प्रगट केला. बाजीरावानें भावाची पाठ थोपटली, “श्री सदैव याच प्रकारें तुम्हांस यशस्वी करो. समस्तांची समाधानें करुन पुढेंहि स्वामीकार्य करून कीर्त संपादे तें केलें पाहिजे चित्तांत अहंता न आणणें. लोक बहुत विचारे राखणे, येकाचेच विचारें न राहणें.”

आमझऱ्याच्या युद्धांत उदाजी पवार, राणोजी शिंदे व होळकर यांनीं अप्रतिम शौर्य व धाडस दाखविलें. चिमाजीनें बाजीरावास कळविलें होतेंच की, “युधीं उदाजी पवार याणी कस्त मेहनत केली.” बाजीरावानें पवाराचा पत्रांत मोठा

---

१९ पेशवेदप्तर भाग १३ २० पवाराची कैफियत. २१ पेशवेदप्तर भाग २२

गौरवपर उल्लेख केला. "पहिल्यापासून येसीच असाधारण कर्मे करून येश संपादित आले, पुढेंहि सर्वविसी भरवसा त्यांचाच आहे. होळकरास व उदबास रजाबंद राखणें "[२२] होळकराच्या कामगिरीबद्दल त्यास स्वारींतच हत्ती देऊन गौरव करण्यांत आला. १७२४ पर्यंत बारगीर असलेल्या राणोजी शिंद्यास पुण्यास परत आल्यावर सरदारी प्राप्त झाली

सैन्यास विश्रांति देण्याकरतां आमझऱ्यावर चिमाजीचा दोन दिवस मुक्काम झाला. त्रयोदशीस निघून कूच दरकूच मार्गशीर्ष व॥ ९ ( १३ १२. १७२८ )[२३] स मराठे सैन्य उज्जननजीक पोहोंचलें. दयाबहादरचा पुतण्या भवानीराम यानें मोठ्या तांतडीनें सैन्याची जमवाजमव केली आणि उज्जनच्या भोंवतालीं कामचलाऊ तटबंदी घालून मराठ्यांना तोंड देण्याची तयारी चालविली. बादशहानेंहि भवानीरामास सांत्वनपर पत्र लिहून मराठ्यांशीं युद्ध चालू ठेवण्यास प्रोत्साहन दिलें आणि सय्यद नज्मुद्दीन अलीखान, कोट्याचा महाराणा दुर्जनसाल व महमद उमरखान यांस भवानीरामाच्या साहाय्यास जाण्याचे हुकूम सोडले

२० डिसेंबरला[२४] उज्जनच्या वेढ्यास सुरुवात झाली. दोन्ही सैन्यांच्या वारवार चकमकी होऊं लागल्या आधींच पैशाच्या टचाईनें भवानीराम हैराण झालेला आणि त्यांत नवीन उभारलेल्या सैन्यानें पैशाची मागणी केली भवानीरामच्या सैन्यांतील बंडाळीची बातमी मराठ्यांकडे पोहोंचल्यामुळें वेढा निकरानें चालू राहिला २२ जानेवारीस सोक्षमोक्ष करण्याच्या हेतूनें भवानीरामानें एकाएकीं बाहेर पडून निकरानें मराठ्यांवर हल्ला चढविला, पण कांहींच निकाल न लागतां संध्याकाळ झाल्यामुळें दोन्हीं सैन्यें आपापल्या मुक्कामास परत गेलीं. भवानीरामानें तहावर घालून कालहरण करण्यास सुरुवात केली.

उज्जनला पोहोंचून मराठ्यांना ३५ दिवस झाले. किफायतीच्या दृष्टीनें बाजीरावास हा काळ फुकट गेल्यासारखाच वाटला वेढा घालून एक ठिकाणीं गुंतून बसल्यास सैन्याचा खर्च कसा चालावयाचा? बाजीरावानें अप्पास विचारलें कीं, "उज्जनी शहरची बोली तुम्ही केली होती त्यास ओलीस त्यानी बदल खाऊन काम नासलें म्हणून वर्तमान आलें आहे. सत्यमिथ्या कळत नाही तें कळवावे " त्यानें

---

२२ पे. द नि का. १३. २३

२३ पे. रो. ही तारीख पेशवेरोजनिशीवरून घेतल्यामुळें तिच्या खरेपणाबद्दल तिळमात्र शंका नको १४ डिसेंबरला चिमाजीचा मुक्काम अमझऱ्यास नसून उज्जनीनजिक होता. सर जदुनाथ सरकार यानीं मात्र १४-१२-१७२८ला अमझऱ्यावर दयाबहादर मारला गेला, हें जें विधान *Fall of the Mughal Empire* मध्यें केलें आहे तें या नोंदीवरून निराधार ठरतें. २४ Irvine

सुचविलें, " बोली झाली होती त्याप्रमाणें बोला मातबर घेतल्या असिल्या आणि पैक्याचा निर्वाह होत असला तर उत्तमच आहे. कदाचित दिलीकडून कोणी सुभा येणार असला त्याची वार्ता ऐकून बल धरीत असले आणि पैका न देत तरी त्या पैक्रियासाठीं तेच स्थळीं गुंतून राहता येत नाहीं बरकदहि स्थळें व प्रांत पडला आहे. तेथील पैका वसूल जाहला पाहिजे. यास्तव तेथें न गुंतावें राजश्री बाजी भीवराव यास अगर दुसरा सरदार हजार स्वारानसी उजनीस ठेऊन माणूस आंत बाहेर फटकू न द्यावे. जे माणूस शहरचे सापडेल ते जिवे मारावे दरवाजेच बंद करावे आपण अवघ्या प्रांताचा व जीं महास्थळें असतील तेथील पैका कुल जप्त करून वसूल घ्यावा. जो मुलुक कबजी असेल त्यास पुढें कौल देऊन अमलदार राहतील तरी ठेवावे कदाचित दिलीकडून कोणी नवा सुभा रवाना होऊन येईल तरी त्याची बातमी आणवावी आणि जर तो आपल्या हकेटकेंत असला तरी पुढें चालून जाऊन बुडवावा. माळव्यांत फौजेचा पराश्रम ( प्रवेश ) न होई सारिखे करा।"[२५]

पेशव्याच्या आज्ञेनुरूप वेढा उठवून चिमाजीनें माळव्यांतील असुद्या मुलुखाकडे मोर्चा वळविला. कायेथ,[२६] सुंदरसी, शहाजापूर, सारंगपूर, या ठाणींयांतून खंडण्या चापून वसूल करीत मराठे चालले इकडे भवानीरामाच्या साहाय्यास निघालेल्या बादशहाच्या सैन्याचा पत्ता नाहीं आणि युद्ध चालू ठेवण्यास मजूर केलेली रक्कमहि त्याच्या हातांत पडण्याचा संभव दिसेना. सैन्याचें देणें पांच लाखांवर चढलें. नज्मुद्दीन अलीखानानें मदत करण्याचें दूरच राहोन उलट माळव्याच्या कारभारांत ढोहणा आरंभला आपणास बादशहानें सुभेदार नेमलें आहे, आपल्याकडे पैका जमा करावा अशा अर्थाचे हुकूम त्यानें ठिकठिकाणच्या जमीदारांस सोडले. शेवटीं भवानीराम युद्धाच्या निकरानें बाहेर पडला तेव्हां नज्मुद्दीन अलीखान सैन्यानिशीं दिलीकडे चालता झाला.[२७]

माळव्याचा सुभा शिपायांच्या कर्जाखालीं रजीस आलेला व बादशहाकडून साहाय्यास आलेल्या मदतनिसांनीं त्यास जास्तच पेंचांत घातलें. कसलाच अडथळा न येता स्वस्थपणानें रामपुरा, भानपुरा, जावदे, बुंदी कोट्यापर्यंत जाऊन ठिकठिकाणीं चौथसरदेशमुखी वसूल करीत चिमाजी गुजराथेंत उतरला सरबुलंदखानानें मराठी फौजेस विरोध करण्याचा प्रयत्नच केला नाहीं. शेवटीं १६ सवालीं ४ मे १७२९ रोजीं चिमाजी पुण्यास दाखल झाला.

२४-१०-१७२८ला मोहिमेची सुरुवात होऊन ४ मे १७२९ पर्यंत म्हणजे साडे सहा महिने मोहीम चालली. या सहा महिन्यांच्या मोहिमेंत एक मोठें युद्ध व अनेक चकमकी झाल्या. मराठ्यांस द्रव्यप्राप्ति तर झाली, पण त्याबरोबर २०० मैल लांब २०० मैल रुंद इतक्या विस्तृत प्रदेशावर मराठ्यांची हुकमत

२५ पे. द. नि. का. १३ २० २६ पे. द. नि. का. २२. २७ Irvine.

( De facto rule ) चालूं लागली. यापुढें त्यांनीं चौथसरदेशमुखीची मागणी न करतां सुभेदारीची मागणी केली व बादशहाच्या संमतीची वाट न पाहतां आपला अमल जारी करण्याचे प्रयत्न सुरू केले १७३२त माळव्याच्या मोकाशाची वांटणी करून होळकरानें इंदुरात ठाणें दिलें, उज्जनला शिंद्यांचें ठाणें बसलें व धार येथें पवार कायम झाले. मराठशाहीची सरहद्द नर्मदेच्या दक्षिण तीरापासून दोनशें मैल वर सरकली

इकडे मराठ्यांनीं भवानीरामास स्वस्थता लाभूं दिली नाहीं १७२९च्या जून महिन्यात कंठाजीनें नर्मदा उतरून धारच्या आसपास लुटालूट आरंभिली तर उदाजी पवार व मल्हारराव होळकर यांनीं पावसाळ्यांत माळव्यांतच छावणी केली. प्रतांत एकच दंगल माजून राहिल्यामुळें खजिना रिकामा पडला सुभेदारास आपल्या लोकांना वेळच्या वेळीं पैका पुरवणें अशक्य होऊन बसलें सवाई जयसिंगास माळव्यांत फौज पाठविण्यासंबंधीं बादशहाकडून फर्मानें आलीं, तरी ७०० स्वारांची तुकडी पाठविण्यापलीकडे त्यानें कांहींच हालचाल केली नाहीं. १७२९च्या डिसेंबरांत तर उदाजी पवार व होळकर यांनीं मांडवगडचें सुप्रसिद्ध ठाणें काबीज केलें.[२८] बंधारा फुटून पुराचें पाणी घुसावें त्याप्रमाणें चोहों बाजूंनीं मराठे माळव्यावर चालून येत होते. त्यांनीं चौथसरदेशमुखीच्या नांवाखालीं सर्व प्रांत व्यापला. भवानीरामाचा खजिना केव्हांच खलास होऊन गेला नवीन कर्ज देण्यास कोणी सावकार तयार होईना. अशा अडचणीत १७३०च्या सप्टेंबरांत महमदखान बंगषची माळव्यावर नेमणूक झाल्याचें ऐकून भवानीरामास घोर संकटांतून सुटल्याप्रमाणें वाटलें असेल डिसेंबरांत माळव्यांत दाखल होऊन बंगषनें अधिकारसूत्रें आपल्या हातांत घेतलीं.

२८ शाहूरोजनिशी.

## प्रकरण दुसरें

# बुंदेलखंड-माळव्यांतून बंगषची पिछेहाट

एकामागून एक माळव्यांतील ठाणीं सर करीत चिमाजीअप्पा चालला असतां स्वतः पेशवा स्वस्थ बसून राहिला नाहीं. दरबारांत राहून महाराज खुष होतील असले वाद घालणें त्याच्या प्रकृतिविरुद्ध होतें व स्वतःपुढें विशिष्ट धोरण ठेवल्यामुळें स्वस्थ राहून निभावण्यासारखी त्या वेळची त्याची स्थिति नव्हती. गुजराथ, माळवा, खानदेश या भागांत सुरू केलेल्या मोहिमा चालविण्यासाठीं मोठमोठीं सैन्यें उभारावीं लागलीं. या सैन्यांचा खर्च परस्पर शत्रुमुलुखांतून भागविल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. पालखेडची निजामवरील मोहीम सहा महिने रेंगाळली. पेशवा विजयी होऊन मुंगीशेवगांवच्या तहानें शांतता प्रस्थापित झाली तरी पेशव्यास द्रव्याच्या दृष्टीनें हा विजय विशेष लाभदायक झाला नाहीं. निजामाच्या उठावणीनें दक्षिणच्या सहा सुभ्यांतील चौथसरदेशमुखींचा वसूल अगदीं बंद पडला. पेशव्यास सैन्याच्या खर्चाकरतां कर्ज काढण्याची पाळी आली यांत नवल नाहीं, पण खुद्द महाराजास दरबार-खर्चाकरतां सावकार शोधावे लागले. या सर्व कर्जाचा परिहार वाटेल त्या मार्गानें करण्याचें ठरवून भावास माळव्यांत रवाना करून स्वतः पेशवा नात्यापुत्याजवळ महाराजास भेटला. शंभु महादेवाचें दर्शन घेऊन २७ नोव्हेंबर १७२८ ला पेशव्यानें मोहिमेवर निघण्यासाठीं महाराजांचा निरोप घेतला.[१] नुकतीच निजामाविरुद्ध जी मोहीम झाली ती गंगातीर प्रांताच्या टापूंत, हा प्रांत सरलष्करच्या सरंजामाकडे दिला असून गेल्या वर्ष दोन वर्षांत येथील मराठ्यांचा अंमल पार उठला होता. मुंगीशेवगांवच्या तहांत पूर्वीप्रमाणें चौथसरदेशमुखींच्या हक्कास निजामानें कबुली दिल्या-वरून पुन. अमल बसविण्याच्या इरादानें सरलष्कर दहा हजार फौज घेऊन निघाला. त्यानें आपल्या मदतीस बरोबर पेशव्यास घेतलें. "राजश्री सरलष्करच्या प्रांतांत अमल बसवून पुढें पोट भरावयास जिकडे जाणें तिकडे जाऊं,"[२] अशी स्वतःच्या कामगिरीची रूपरेषा पेशव्यानें चिमाजीस लिहून कळविली. कर्जाचा पेंच वारून पोक्त मनसबा कसा साधावा याचा त्याला ध्यास लागला स्वतः पेशव्याची फौज चार हजार असून सरलष्कर व इतर पथकें मिळून वीसपंचवीस हजारापर्यंत[३] स्वार जमा झाले, शिवाय वऱ्हाडांत गेल्यावर राणोजी भोसल्यास सामील करून घेण्याचें त्यानें योजिलें.

---

१ पे. द. नि. का. १३ १४. २ पे. द. नि. का. १३. १४. ३ पे. द. नि. का. १३. २७.

सरलष्करच्या सरजामांत अंमल बसवून देण्यास वेळ लागला नाहीं बीड[४] पाथरी औरंगाबाद या मार्गें आवंढ्यावरून डिसेंबर सरतां कासिमनजीक पेशवा पोहोंचतो तों त्याच्या भावाच्या माळव्यांतील विजयाचें वर्तमान मिळालें. माळव्यांत पुढें बंदोबस्त कसा करावयाचा, जास्तींत जास्त पैका कसा मिळवावयाचा, व तो कोणत्या मार्गानें रवाना केल्यास साताऱ्यास सुरक्षित पोहोंचेल या सर्व गोष्टींची पेशव्यानें निरवानिरव केली आणि छत्रसालाकडून कुमकेकरिता निकडीचीं बोलावणीं आल्यावरून बुंदेलखंडचा मार्ग धरला. बुंदेलखंडाच्या अगदीं मार्गावर नसलें तरी लगत असलेल्या देवगडपासून पैका प्राप्त होण्याचा संभव दिसल्यामुळें पेशव्याचा मोर्चा देवगडाकडे फिरला वास्तविक पाहिलें असतां हा[५] जिल्हा प्रतिनिधीचा, या प्रांतीं न जाणें म्हणून पेशव्यास महाराजांची सक्त आज्ञा होती. पण सावकारांचें देणें वारण्याची अहर्निश चिंता लागल्यामुळें पेशव्यानें काहीं काळ छत्रपतींचे हुकूम धाब्यावर बसविले. चांदा देवगडचा जिल्हा प्रतिनिधीच्या सरंजामास नेमून दिला होता, तरी फौजा पाठविल्याशिवाय पैचीहि प्राप्ति होण्याचा संभव नव्हता देवगडासारख्या जंगली मुलुखांत फौजा फिरवून आणण्याची खटपट प्रतिनिधीच्या हातून कितपत होणार हें दिसतच होतें. वऱ्हाडचा सुभेदार ऐवजखान यास विषाद वाटूं नये, सलोखा कायम राखावा, म्हणून खानाच्या विनतीस मान देऊन वऱ्हाडातून न जातां माहोरप्रांतांतून पेशव्यानें कूच[६] केलें. १३ जानेवारी १७२९ ला पेशव्यानें देवगडच्या सरहद्दीवरील पहिल्या, बोरीच्या ठाण्यावर हल्ला चढविला.[७] देवगडचा मार्ग खांचखळगे, डोंगर, दाट जंगलें यांतून गेलेला हे सर्व अडथळे न जुमानतां फेब्रुवारीच्या सुरवातीस मराठी फौजा देवगडानजीक येऊन ठेपल्या. तेव्हां देवगडचा दाटगा गोंड राजा चांद[८] सुलतान याच्यानें धीर धरवेना ६५००० रु. खंडणीदाखल कबूल करून त्यानें आपला बचाव करून घेतला राजाच्या सन्मानार्थ पेशव्यानें त्यास एक हत्ती, एक घोडा बोर व एक घोडा निळा नजर करून छत्रसालच्या मुलखाचा मार्ग धरला.

बुंदेल्यांनीं स्वातंत्र्याप्रीत्यर्थ मराठ्यांप्रमाणें मोंगलांविरुद्ध जोराचा उठाव केला होता आणि औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिल्ली येथें जी झोटिंगपादशाही माजली, त्या अवधीचा त्यानें भरपूर फायदा घेतला देशोधडीस लागलेल्या छत्रसालानें बापाचें राज्य तर परत मिळविलेंच पण त्याशिवाय पूर्वेकडे, उत्तरेकडे आपल्या राज्याच्या मर्यादा वाढवून काल्पीपलीकडील अलाहाबादच्या सुभ्यावर स्वाऱ्या सुरू केल्या.

---

४ पे द. नि. का १३ २७. ५ पे द. नि. का. ३०. ६६ ६ पे. द. नि का. १३. ३४. ७ पेशवेरोजकीर्द. ८ पेशवेरोजकीर्द

१७२०त महमदखान बंगषची नेमणूक अलाहाबादच्या सुभेदारीवर झाल्यापासून बुंदेल्यांची सद्दी संपली व त्यांनीं मागें पाय घेण्यास सुरुवात केली. निजामानें दक्षिणेंत एकच दंगल उडवून दिल्यामुळें बंगषनें सुरू केलेली १७२४ची मोहीम अर्धवट राहिली. १७२७च्या सुरुवातीपासून मात्र निकरानें लढाया करून बंगषनें भिंड, मौडा, पैलानी आग्वासी, सिमानी हे बुंदेल्यांचे परगणे काबीज केले व त्यांना तसेंच रेटत पुढें चाल केली. महोबा परगण्यांत इजोली येथें घोर युद्ध होऊन दोन्ही पक्षांचा अतोनात संहार झाला. छत्रसालनें माघार घेतली व आश्रयाकरितां तो जैतपूरच्या दक्षिणेस जंगलांत शिरला. तेथेंहि शत्रुनें त्याचा पाठलाग केला. बारीगड, लौरीझुमार, कुलपहार हीं बुंदेल्यांचीं अभेद्य समजलीं जाणारीं ठाणीं सर करून बंगषनें १७२८ च्या जूनच्या सुमारास जैतपुरास वेढा दिला. पराक्रमाची शर्थ करून सहा महिन्यांवर छत्रसालनें जैतपूर लढविलें, पण बंगषच्या वाढत्या बळापुढें बुंदेल्यांचे सर्व उपाय थकले. १७२८ च्या डिसेंबरांत किल्ला खालीं करून छत्रसाल बंगषला शरण गेला.[९]

बुंदेल्यांचा रेच मोडला, छत्रसाल व छत्रसालाचे पुत्र शरण येऊन बंगषच्या छावणींत येऊन राहिले, तेव्हां अर्थातच बंगषला मोठें सैन्य ठेवण्याची जरूर राहिली नाहीं पाच हजारपर्यंत लोक ठेवून इतरांस बंगषानें रजा दिली व जैतपूरच्या छावणींत राहून त्यानें मुलखाचा बंदोबस्त चालविला. माळव्यांतील मराठी फौजांच्या हालचालीवर बंगषाची नजर होती, पण दक्षिणेंतून चांदा, देवगड, गढा या मार्गें मराठे वर येत आहेत इकडे त्याचें दुर्लक्षच झालें. हा जंगलचा आडमार्ग यापूर्वीं उत्तरेकडील स्वाऱ्यांस क्वचितच उपयोगांत आणला गेला होता, आणि या मार्गानें मोठें सैन्य बुंदेलखंडांत प्रवेश करील याचा अंदाज बंगषला आला नाहीं. होळीचा सण साजरा करण्याच्या मिषानें छत्रसाल आपली मोडलेली फौज घेऊन महोब्यास येऊन मराठी फौजाची वाट पहात राहिला व आपल्या साह्यास धांवून येणाऱ्या पेशव्याच्या सन्मानार्थ त्यानें आपल्या मुलांस पुढें रवाना केलें. १२-३-१७२९ ला महोब्यानजीक भारतसिंग-पेशव्यांची भेट झाली [१०] दुसरे दिवशीं धामोरा मुक्कामीं राजा छत्रसाल स्वतः पेशव्यास येऊन भेटला. मेजवान्या मानसन्मान होऊन मराठे व बुंदेले यांच्या संयुक्त सैन्यानें १९-३-१७२९ रोजीं महोबा सोडलें बरोबर आठ दिवसानीं[११] जैतपुरनजीक दोन्ही सैन्यांची नजरानजर होऊन युद्धास प्रारंभ झाला. सभोंवताली खंदक खणून बंदोबस्तानें बसलेल्या बंगषवर तोफांच्या अभावानें मराठ्यांस चालून जातां येईना, तेव्हां चोहीं बाजूंनीं वेढून सर्व मार्ग रोखून मराठे बसले. बंगषनें दिल्लीस जासूद पाठवून मदतीची निकडीची मागणी केली. त्याप्रमाणें आपला मुलगा कायमखान यास तातडीनें बोलाविलें. बाप पेचांत सांपडला आहे हें कळतांच आपली दहा

---

९ Adopted from Irvine. १० पे रो ११ पे. रो.

हजार फौज व धान्याचा साठा घेऊन कायमखान जैतपुराकडे निघाला. ही कुमक बंगषला मिळाली असती तर त्यानें बळ धरिलें असतें. कायमखान २८–४–२९ जैतपुरानजीक १२ मैलांवर सुपे येथें पोहोंचतो तोंच मराठी फौजेनें त्याला घेरलें.[१२] अचानक हल्ला आल्यामुळें कायमखानाच्यानें फार वेळ टिकाव धरवला नाहीं स्वतः खान शंभर स्वारांनिशीं पळून गेला व मराठ्यांनीं खानाचें लष्कर लुटलें. तीन हजार घोडे व तेरा हत्ती मराठ्यांकडे पाडाव आले.[१३]

मराठी फौजा कायमखानावर चालून गेल्याची संधी साधून महमदखानानें छावणी सोडून किल्ल्याचा आश्रय केला; पण त्यास तादृश कांहींच फायदा झाला नाहीं. दिल्लीहून मदत येईपर्यंत किल्ला निकरानें झुंजवावयाचा असा महमदखानानें निर्धार केला. किल्ल्यात तर धान्याचा कण उरला नव्हता. बाहेरील सर्व मार्ग मराठे व बुंदेल्यांनीं आडविलेले. धान्य रुपयास शेर व तेंहि मिळेनासें झालें पठाणांनीं तोफांचे बैल मारून खाल्ले. शरण येण्यावांचून गत्यतर नाहीं इतकी हलाखीची स्थिति पेशव्यानें बंगषची करून सोडली व पावसाळ्याआधीं दक्षिण गाठावयाची निकड असल्यामुळें उरलेली कामगिरी छत्रसालावर सोंपवून पेशव्यानें दक्षिणेंत प्रयाण केलें. गढा, केतुघण, बऱ्हाणपूर, मकडाई, वैजापूर, पिंपळगांव गर्भा, घोडनदी या मार्गें १६ जुलस पेशवा पुण्यास पोहोंचला[१४] जैतपूरचा वेढा पुढें निकरानें चालवून छत्रसालानें बंगषास बुंदेलखंडांतून घालवून दिलें.

१७२८–२९ हें साल मराठी राज्याच्या फैलावाच्या दृष्टीनें अत्यंत संस्मरणीय ठरतें. दयाबहादुरावर संपादिलेल्या जयानें चिमाजीनें मराठ्यांची सत्ता माळव्यांत कायम केली तर ऐन संकटाच्या वेळीं छत्रसालाच्या साहाय्यास धावून जाऊन बुंदेल्यांना उपकृत करून पेशव्यानें बुंदेलखंडांत शिरकाव करून घेतला. उपकाराची फेड म्हणून छत्रसालानें पेशव्यास पुत्रवत् लेखून त्यास झांशीची जहागीर बहाल केली आणि आपल्या पाठीमागें राज्याचा तिसरा विभाग पेशव्यास मिळावा अशी व्यवस्था केली. शत्रूनें चढाई केल्यास परस्परांस साहाय्य करावें असेंहि ठरलें. पुढील दहा वर्षांत युद्धाचा पाया बुंदेलखंडांत ठेवून पेशव्यानें दिल्लीपर्यंत मजल मारली हें ध्यानांत आलें म्हणजे त्याच्या कामगिरीचें महत्त्व समजून येतें.

जैतपुरावर मार खाऊन महमदखान बंगष दिल्लीस परतला. तेथें बुंदेलखंडांत पराभव पावल्यामुळें अलाहाबादच्या सुभ्यावरून आपली उचलबांगडी झाल्याचें त्यास कळलें. मोठ्या मिनतवारीनें त्यानें माळव्याची मागणी केली. माळवा मराठ्यांनीं व्यापिलेला, कोणीहि उमराव माळव्यावर जाण्यास उत्सुक नव्हता. बंगषकडून माळव्यासंबधीं बोलणें निघतांच आढेवेढे न घेतां त्याची तत्काळ माळव्यावर नेमणूक झाली.

---

१२ पे. रो. व ब्र. च. १३ पे. रो. १४ पे. रो.

१७३० च्या नोव्हेंबरांत पैशाची तरतूद करून, फौज जमवून, बंगषनें आग्रा सोडलें. माळव्यांत शिरतांच त्यानें मराठ्यांविरुद्ध मोहीम सुरू केली. २७ जानेवारी १७३१ ला मल्हारराव होळकराशीं शहाजहानपुरनजीक गांठ पडून जुंबी लढाई झाली व मल्हारराव होळकर खालीं सरकला. २५ फेब्रुवारीस धारनजीक मराठ्यांची पुन: बंगषच्या सैन्याशीं चकमक उडून मराठ्यांना मागें हटावें लागलें. याप्रमाणें १७३१ च्या उन्हाळ्यांत मराठ्यांची पीछेहाटच होत गेली. त्यानीं आतांपर्यंत माळव्यांतील काबीज केलेल्या ठाण्यांपैकीं उज्जन, धार, मंडलेश्वर, इत्यादि ठाणीं त्यांना सोडून द्यावीं लागलीं, इतकेंच नव्हे तर नर्मदेच्या उत्तरतीरीं त्यानीं बांधलेले बहुतेक किल्लेसुद्धां बंगषनें काबीज केले [१५]

मराठ्यांच्या माळव्यांतील यशस्वी कारकीर्दीस खंड पडण्यास या वेळीं एक बलवत्तर कारण उद्भवलें होतें. पेशवे व सेनापति यांच्यामधील कलहास तीव्र स्वरूप प्राप्त होऊन दोन्हा पक्षांना युद्धाची तयारी चालविली. आपला पक्ष सबळ करण्याकरितां सेनापतीनें शाहुदरबारांत, निजामाकडे, संधानें बांधलीं व पेशव्याचे सरदार फोडण्यासहि कसूर केली नाहीं. माळव्याच्या वाटणीमुळें नाखूष झालेल्या उदाजी पवारास आपले बाजूस वळविण्यास सेनापतीस वेळ लागला नाहीं. पेशव्याच्या वाढत्या सामर्थ्याच्या असूयेमुळें प्रतिनिधि तर पेशव्याचा प्रच्छन्न शत्रु बनलेला. राहतां राहिला निजाम, तोहि पालखेडच्या पराभवाचें उट्टें काढण्याची वाटच पहात होता. सेनापतीची आपल्या विरुद्ध चाललेली तयारी पाहून पेशव्यास सर्व सैन्य जवळ बोलवावें लागलें. जिवावर बेतल्यामुळें साहजिकच नवीन जिंकलेल्या मुलखांतून पेशव्यानें निरुपायानें सैन्य काढून घेतलें आणि बंगषची पहिल्या वर्षाची कारकीर्द यशस्वी झाल्याचा भास झाला.

या वेळीं बंगषच्या हातून न कळत चूक झाली ती मराठ्यांच्या चांगलीच पथ्यावर पडली बंगषची माळव्यावर नेमणूक झाली त्या वेळीं त्यानें निजामाच्या हालचालीवर नजर ठेवावी अशी त्याला अंतस्थ रीतीनें सूचना देण्यांत आली होती. दिल्लींत राहून डावपेंच खेळणाऱ्या उमरावांना मराठ्यांच्या सामर्थ्याची अद्याप तितकीशी जाणीव आली नव्हती. बुंदेलखंडांत मराठ्यांच्या पराक्रमाचा अनुभव आल्यामुळें आपल्या एकट्यास मराठे आटोपतील अशी बंगषला खात्री वाटेना; मराठ्यांविरुद्ध करतां येईल तितकी जूट करणें त्याला आवश्यक वाटलें. अशा स्थितींत निजामानें गुप्त पत्रें लिहून बंगषला नर्मदेवर भेटावयास बोलविलें तेव्हां तो अकबरपुरावर निजामास भेटला दोघांनीं एक मतानें चालून पेशव्याविरुद्ध सेनापतीस कुमक करावी ही निजामाची सूचना बंगषनें ताबडतोब मान्य केली. पण निजाम व बंगषचीं सैन्यें दाभाड्याच्या मदतीस जाण्यापूर्वींच पेशव्यानें दाभाड्याची वाताहात

१५ Adopted from Irvine

केल्यामुळें दोघांचें बेत जागच्याजागीं जिरले निजामाकडे दिल्लीदरबार संशयाच्या दृष्टीनें पहात होता आणि आतां तर बंगष व निजाम यांचें मेतकूट बनत चाललें. हे दोघे एकत्र होऊन दिल्लीवर चाल करून बादशहास आपल्या हातांत घेण्याचा प्रयत्न करतील अशी धास्ती दरबारांतील उमरावास उत्पन्न झाली. बंगषला माळव्याच्या सुभेदारीवरून दूर करण्यास ते संधि शोधूं लागले. ही संधि त्यांना लवकरच मिळाली. १७३१ च्या हिमकालाच्या सुरुवातीस मराठ्यांनी नर्मदा ओलांडली. सुभेदाराच्या मदतीस जाऊन स्वतःची खराबी करून घेण्यापेक्षां मराठ्यांना पैका देऊन आपला बचाव करणें माळव्यांतील जमीनदारांस जास्त सुरक्षितपणाचें वाटलें. माळव्यांत मराठ्यांचीं सैन्यें चौफेर वावरत असल्यामुळें खजिना रिकामा पडत चालला. सुभ्यांतील छोटे छोटे संस्थानिक, राजेरजवाडे, जमीनदार उघड उघड रीतीनें मराठ्यांस सामील झाले. दिल्लीहून कुमक आल्याशिवाय मराठ्यांचा प्रतिकार आपल्या हातून होणें शक्य नाहीं असें बंगषनें लिहून कळवितांच त्याला परत बोलावून जयसिंगाची माळव्याच्या सुभेदारीवर नेमणूक करण्यांत आली.

---

## प्रकरण तिसरें

# शिंदे-होळकरांच्या स्वाऱ्या

(इ. स. १७३३–१७३५)

मराठ्यांनीं माळवा आपल्या अमलाखालीं आणला, पण त्याला बादशहाकडून मान्यता मिळावयाची होती. आपल्या ताब्यांतील इतका मोठा सुपीक टापू हातपाय हलविल्याशिवाय नुसत्या दबकावणीवर मराठ्यांच्या स्वाधीन करील इतका दुबळा बादशाहा खास नव्हता. मराठ्यांनी दयाबहादराचा पाडाव केला, बंगष नामोहरम होऊन परतला, बुंदेलखंडांत मराठ्यांची पाचर भक्कम बसली, तशी या संकटाची खरी जाणीव बादशहास येत चालली. प्रांतिक अधिकाऱ्यांना मराठ्यांचा प्रतिकार करणें शक्य नसून सर्व साम्राज्याची शक्ति एकवटून मराठ्यांच्या वाढत्या सत्तेस पायबंद घालण्याचा प्रयत्न झाला पाहिजे हें बादशाही मुत्सद्यांस कळून चुकलें. मराठे लहान-सहान तुकड्यावर समाधान पावून परत जाणारे नाहींत, ते सर्व भक्षण करावयास पहात आहेत या जाणीवेची आंच लागून मराठ्यांचा प्रतिकार करण्याची चर्चा दिल्ली-दरबारांत सुरू झाली. यापुढें या लढ्याचें प्रांतिक स्वरूप पार बदलून मराठे विरुद्ध मोंगल साम्राज्य असें भारतीय स्वरूप प्राप्त झालें. एकट्यादुकट्या सुभेदाराशीं यापुढें मराठ्यास झुंज घ्यावयाची नसून सर्व बादशाहीच्या एकवटलेल्या सामर्थ्याशीं टक्कर

देण्याची वेळ आली. आग्रा, अलाहाबाद, बुंदेलखंड, रजपुतांनी या भागातून मराठ्यांविरुद्ध लष्करी हालचाली सुरू झाल्या.

१७२९ नंतर चार पाच वर्षे दरबारांतील इतर भानगडींमुळें स्वतः पेशव्यास उत्तरेकडे फिरकावयास सवड झाली नाहीं, तरी चिमाजीआप्पा, पिलाजी जाधव, शिंदे, होळकर यांपैकीं कोणीना कोणी हिंदुस्थानात रवाना करून उत्तरेकडील स्वाऱ्यांत त्यानें खंड पडू दिला नाहीं सारखे प्रहार करीत राहिलें तरच शत्रु क्षीण होत जाईल, दम खाण्यास संधि मिळतांच तो सावर धरील हें पेशवा जाणून होता. १७३०त गुजराथेंत स्वारी करून चिमाजीनें कंठाजी कदमाच्या ताब्यांत असलेला पावागडचा किल्ला काबीज करून पर्यायानें माळव्याचें नैऋत्येकडील प्रवेशद्वार हस्तगत करून घेतलें. १७३१ त सेनापतीचा मोड करून पेशव्यानें उत्तरेकडील संचारास स्वकीयांकडून होणारा विरोध हाणून पाडला. १७३२ च्या डिसेंबरात पेशव्यानें निजामाची भेट[1] घेऊन त्याच्या मुलखावर हल्ला न करण्याचें त्याला अभिवचन दिलें व आपल्या उत्तरेंतील चढाऊ धोरणाच्या आड तो न येईल अशी तजवीज केली

१४ डिसेंबर १७३१ ला छत्रसाल मरण पावला. आपल्या हांकेस धावून येऊन आपलें रक्षण पेशव्यानें केलें याचें स्मरण ठेवून मृत्युसमयीं आपल्या राज्याचा तिसरा भाग पेशव्यास मिळावा अशी छत्रसालानें व्यवस्था केली. वाटणीप्रमाणें पेशव्याच्या प्रदेशाचा कबजा घ्यावयाचा व बुंदेलखंडांतील इतर संस्थानिकांपासून चौथाईस मान्यता मिळवावयाची या दुहेरी हेतूनें चिमाजी १७३२च्या ऑक्टोबरांत हिंदुस्थानच्या स्वारीस निघाला[2] १७३३ च्या एप्रिलपर्यंत चिमाजीचा मुक्काम बुंदेलखंडांत झाला. आपल्या गोड भाषणानें व चातुर्यानें बुंदेल्यांचा स्नेह संपादून विशेष निकराचा प्रसंग न आणतां राज्यविभागणीचें काम चिमाजीनें उरकलें. हिरदेसाच्या मुलखापैकीं सव्वा लाख व जगतराजच्या जहागिरीपैकीं एक लाखाची जहागीर पेशव्यास प्राप्त होऊन पेशवा उत्तरेस आला असतां सैन्यासह मराठ्यांना मदत करण्याचें बुंदेल्यांनीं मान्य केलें. "पुढें स्वामी (पेशवा) ज्या मुलखावर चालतील त्या मुलखावर समागमे चलावे; दिल्लीवर चाल कराल तेव्हांहि समागमे चलावे, प्रयागास स्वामी चालतील तेव्हांहि समागमे चलावे, जो मुलुख जप्त करावा त्यांत अर्धो अर्ध प्रमाणें घ्यावे"[3]

छत्रसालच्या राज्यालगत असलेल्या दतिया, ओडछा, नरवर या संस्थानांकडे चिमाजीनें रीतसर चौथाईची मागणी केली. हीं संस्थानें बादशाहाचीं मांडलिक, त्यांनीं सार्वभौम सत्तेकडे संरक्षणाची मागणी केली. खंडणी देण्यास संस्थानचा अनमान दिसतांच हिरदेसाचा दिवाण हिमतराय व किसनसिंग यांच्या हाताखालील बुंदेले सैन्य

१ पे. दे.   २ पे. दे.   ३ पे. द. नि. का. १४.९.

घेऊन चिमाजी ओडशाच्या सरहद्दीवर येऊन ठेपला दिल्लीकडून येणाऱ्या सैन्याचा पत्ता नाहीं व मराठे तर दाराशीं धरणें धरून बसलेले; मराठ्यांस विरोध करणें आवाक्या-बाहेर असल्यामुळें चौथाई कबूल केल्याशिवाय या छोट्या संस्थानांना गत्यंतरच नव्हतें.

बुंदेलखंडांतून ग्वाल्हेरपर्यंत वर येऊन मराठ्यांनीं धुमाकूळ मांडला आहे ही बातमी दिल्लीदरबारांत पोहोंचून मोंगल सैन्य बाहेर पडतें तो चैत्र सरत आला होता व मराठे दक्षिणेकडे परत फिरले होते वजीर कमरुद्दीनखान यानें चाळीस हजार सैन्यानिशीं बुंदेलखंडच्या मार्गे सावकाशीनें कूच आरंभिलें गाजीपूरच्या जमीदारानें बंडाळी आरंभून तो बादशहाचा अधिकार जुमानीनासा झाला होता त्याचें बंड वाढतां वाढतां गेल्या वर्षी या दंगेखोरानें वजिराचा मेव्हणा जानिसारखान, अलाहाबादचा फौजदार, यास एका हल्ल्यात ठार मारलें. मराठ्यांच्या पारिपत्यास निघालेल्या वजिरानें गाजीपूरच्या बंडखोरांस नतीजा पोहोंचवून मग पुढें जाण्याचें ठरविलें बरेच दिवस मोंगल सैन्यास घुलवून शेवटीं भगवंतसिंग बुंदेलखंडच्या डोंगरांत पळाला. गाजीपूर वजिरानें हस्तगत केलें. ओडशाचा राजा व राव रामचंद्र व महमदखान बंगष वजिरास म्हणूं लागले कीं, "आतां बुंदेलखंडावर चलावें ऐशांत काबू आहे. नाहींतर बादजवरसात गनिमाच्या फौजा येतील. मग बुंदेलखडांत जाणें कठीण होईल" यावरून वजिरानें हिरदेसाकडें वकील पाठवून त्यास भेटीस बोलाविलें. भगवंतसिंग पळून आश्रयाकरतां बुंदेल्यांच्या मुलखांत शिरला होता त्यासहि स्वाधीन करणें अशी मागणी या वकिलामार्फत कर-ण्यांत आली. हिरदेसानें आपल्या तर्फेनें भला माणूस पाठवून स्नेह संपादिला आणि भगवंतसिंगाचा तलास करून हस्तगत झाला तरी घेऊन येतों अशा रसायनाच्या गोष्टी करून चित्रकूटावर जाऊन तो बंदोबस्तानें राहिला बरसात मोठी, अशात हे जुमस खाणार नाहींत असा विचार करून मोहीम आटपून वजीर २८ जुलैला दिल्लीस पोहोंचला [४]

बुंदेलखंडांत चिमाजी आपलें कार्य उरकीत असतां मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांच्या निशाणाखालीं दुसरी एक फौज जमा झाली "या फौजेनें कानसुलावरून कूच करून नर्मदा गाठली. रेवातीरीं येताच या सैन्याचे दोन विभाग करण्यांत येऊन आनंदराव पवार व बुळे यांच्याबरोबर एक तुकडी माळव्यांत रवाना झाली दुसरी तुकडी घेऊन होळकर व शिंदे मजल दरमजल पावागडास जाऊन त्यांनी चांपानेर सर केलें. उमरठ वगैरे दोन शहरें मोडून तेथील बंदोबस्त करून हेंहि सैन्य माळव्यांत शिरलें. कारण सवाई जयसिंग माळव्यांत आला असून त्याची व चिमाजीची खटखट होणार"[५] अशी वार्ता होती. "जयसिंगाचा मुक्काम मंदसोरावर आहे असें खात्रीलायक वर्तमान जासुदांनीं आणतांच शिंदेहोळकरांनीं बुणगे महीवर टाकून

---

४ पे द नि का १४९   ५ पे द नि का. १८.१.

सडे फौजेनिशीं सवाईस बहुत तंग केलें. दाणापाणी बंद केलें. इतक्यांत कृष्णाजी पवार व उदाजी पवार सवाईस सामील झाल्याची बातमी आली. थोडी जरब दाखवून भले लोक मध्यस्त पडून त्यास चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. पवार बंधूस आपली चूक कळल्यामुळें त्यांनीं सवाईचा पक्ष सोडला. यानंतर सवाईशीं युद्ध-प्रसंग बराच झाला "[6] "एक दिवस एकाएकी केशरी वागे करून रजपुतांनीं लढाईचा प्रसंग घातला. सवाईचा चंडोल कामास आला होळकराकडील शेंदोनशें घोडीं [illegible] व चाळीस बरी बरे माणसें कामास आले. होळकर साळा कोस अलीकडे आला मागून सवाईहि आठ कोस आला. "[7] शेवटीं सवाईनें सल्यावर घातलें. सहा लक्ष रुपये रोख व सुरत आठाविशीची खंडणी या अटींवर शिंदे होळकर तहास कबूल झाले. होळकर सवाईचा युद्धप्रसंग होत असतां चिमाजी पूर्वेकडून माळव्यांत उतरला दक्षिणेंत सिदीशीं युद्धप्रसंग सुरू झाल्याचें कळल्यावरून सवाईशीं तह आटपून चिमाजीनें दक्षिणेंत प्रयाण केलें

चिमाजी दक्षिणेंत पोहोंचला तों सिदीशीं युद्ध निकरांत आलें होतें. खुश्कीच्या मार्गानें केलेले मराठ्यांचे हल्ले यशस्वी होऊन सिदी जंजिऱ्यांत कोंडला गेला. एकट्या सिदीच्यानें मराठ्याविरुद्ध यापुढें टिकाव धरवणार नाहीं तेव्हां भावी संकटाच्या जाणिवेनें इंग्रजांनीं सिदीला दारूगोळा, तोफा इत्यादि युद्धसामग्री पाठवून युद्ध चालू ठेवण्यास प्रोत्साहन दिलें. परस्परांसंबंधीं मनें साफ नसल्यामुळें मराठ्यांच्या सेनापतींपैकीं कोणीहि झटून लढण्याचें काम चालू ठेवीना. प्रतिनिधीशीं असलेल्या वैमनस्यामुळें पेशव्यानें स्वतः मोहिमेंतून अंग काढून घेतलें व आंग्र्यास कानमंत्र सांगून त्याची कुमक प्रतिनिधीस मिळूं दिली नाहीं. याच सुमारास सेखोजी आंग्रे मृत्यु पावल्यामुळें सिदीची समुद्रावर सद्दी झाली. डोंगरकपारी धरून किनाऱ्यावर महिनेच्या महिने वेढा चालविणें बाजीरावासारख्या तल्लख स्वभावाच्या माणसाच्या स्वभावाविरुद्ध होतें. मोहीम अर्धवट टाकून बाजीराव डिसेंबर १७३३त पुण्यास परतला.

पेशवा नुकताच कोंकणची मोहीम सपवून परत आल्यामुळें फौजा हिंडवून आणण्यास त्यानें आपल्या सरदाराची योजना केली. गेल्या वर्षापासून बुंदेलखंडांतील नरवर, दतिया, ओरछा व जाटवाडा इत्यादि संस्थानांस चौथाई लागू करण्यांत आली होती फौजा गेल्याशिवाय हे संस्थानिक दाद देणार नाहींत हें पेशवा जाणून होता. त्यानें या कार्यावर पिलाजी जाधवाची योजना केली भिकाजी शिंदे, गोविंद हरि, तुबाजी अनंत, येद्याजी सतकर इत्यादिकांना सामील करून घेऊन १७३३च्या डिसेंबरांत जाधवराव उत्तरेकडील मार्गं चालूं[8] लागले. कासारबारीशीं[9] पोहोंचेपर्यंत पुरेशा

६ पे द नि. का. १४ २. ७ पे. द नि. का १५.६. ८ पे. द. नि. का. १४.१६, १७ १८. ९ चाळीसगावानजीक.

फौज जथली व बुऱ्हाणपुरानजीक तापी उतरून पिलाजीनें बुंदेलखंडाचा मार्ग धरला. शिंदेहोळकर कुरवंदबारीनें खानदेश उतरले. त्यानीं बडवाईस मोर्चे लावून त्यांस जेर करून खंडणी घेतली व माळव्याचा मार्ग धरिला.[१०] दतिया, नरवर, वोडसा येथील कारभार उरकून पिलाजीच्या फौजेनें आग्ऱ्याच्या पूर्वेस असलेल्या भदावराकडे मोर्चा फिरविला गांवेंच्या गांवें उध्वस्त करण्याचा मराठ्यांनीं सपाटा चालविला[११] तीन लाख खंडणी देऊन भदावरकरानें कसाबसा मुलखाचा बचाव केला. भोपाळच्या फौजेशीं उडालेली चकमक सोडली तर शिंदे-होळकरांस माळव्यात प्रतिकार असा कोणीं केला नाहीं. ग्वाल्हेरपासून अजमेरपर्यंत २००-२५० मैल टापत मराठ्यांची दौळधाड पसरून त्यांनी मुलखाचा फडा चालविला

मराठ्यांच्या बंडाळीच्या बातम्या दिल्लीस पोहोचत नव्हत्या असें नाहीं. पण दिल्लीच्या कारभारांत बहुनायकी झालेली; बादशहाच्या कानापर्यंत या दुष्ट बातम्या पोहचूं नयेत म्हणूनच कीं काय मराठ्यांचे हल्ले सुरू झाले कीं वजीर बादशहाला जलविहाराला किंवा मृगयेकरतां बाहेर पाठवी मराठ्यांना पायबंद घालावा म्हणून अजमीरच्या सुभ्याला जून१७३३ त हुकूम मिळाले त्यांची अंमलबजावणी १७३४ च्या फेब्रुवारींत झाली तवू राहुट्या पुढें पाठवून मुजफरखान दिल्ली सोडून एक मजल पुढें मारतो तों मराठे परत फिरणार अशी वार्ता आली. आपण आग्ऱ्यापर्यंत पोहोंचणार इतक्यांत शत्रू नर्मदेपार निघून जाईल, मग त्याचा पाठलाग करण्यात हशील काय, असा पोक्त विचार करून मुजफरखान दिल्लीस परत माघारा गेला. असा हा १७३४ च्या मोहिमेचा वृत्तांत आहे[१२]

१७३३ त माळव्याच्या सुभेदारीवर जयपूरच्या जयसिंगाची नेमणूक झाल्यापासून बाजीराव उत्तरेकडील कार्यभागासंबंधीं निर्धास्त होता. बादशहाच्या मर्जींतील उमराव खानडौरान मीरबक्षी याच्या सल्ल्यानें सवाई जयसिंगाकडे माळव्याची सुभेदारी बहाल करण्यांत आली. सवाई हा हिंदु होता व सवाईबद्दल मराठ्यांच्या अंत:करणांत आदर वसत असल्यामुळें दंडाचें धोरण स्वीकारून जें काम झालें नाहीं तें या साध्या युक्तीनें पार पाडूं अशी मोगल दरबारांतील मुत्सद्यांची कल्पना. अठराव्या शतकांत अराजकतेनें चोहोंकडे धुमाकूळ घातला होता, त्याला जयसिंग अपवाद नव्हता. बादशाही तक्ताबद्दल मराठे जितके अनुरक्त तितकाच सवाई जयसिंग अनुरक्त. जयपूरच्या रामपुरा परगण्याला माळवा जोडून आपल्या राज्याच्या मर्यादा वाढवाव्या अशीं सुखस्वप्नें कांहीं काळ जयसिंगास पडत होतीं. हीं स्वप्नें सत्यसृष्टींत आणण्याचा प्रयत्न त्यानें मोठ्या धूर्तपणानें करून पाहिला. १७३४ त सर्व रजपूत नरेशांना एकत्र जमवून सर्वांनीं एकजुटीनें राहून परकियांचे हल्ले वारावे

१० पे द नि. का १४. ११ पे. द नि. का. १४.१३. १२ Irvine.

म्हणून आणाशपथा झाल्या. या खटाटोपाच्या पाठीमागें असलेली आपली महत्वाकांक्षा दडविण्याचा वाटेल तितका प्रयत्न जयसिंगानें केला तरी मत्सरग्रस्त रजपूत राजांनीं तो जाणला व फुकटाफुकट जयपूरचें सामर्थ्य व वैभव याच्या वृद्धीकरितां लढण्याचें नाकारलें.[१३] रजपुतांचें साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरला तेव्हां मराठ्यांसंबधीं निश्चित धोरण ठरविणें जयसिंगास जरूर झालें. मराठ्यांना वाटेस लावण्याचा सवाई जयसिंगानें शोधून काढलेला मार्ग जितका अपूर्व तितकाच त्या बुजबुजलेल्या राजवटीस अनुरूपच होता. तो मार्ग म्हणजे मराठ्यांच्या फौजा माळव्याच्या सरहद्दीवर फिरकू लागल्या म्हणजे निमा वसूल त्यांच्या आगावर टाकून मोकळें व्हावयाचें. होमकुंडात आज्य ओतल्यानें अग्नि शांत होत नाहीं, तो जास्तच प्रज्वलित होतो, त्याप्रमाणें मराठ्यांची भूक दरवर्षी वाढत चालली.

१७३४च्या शरद्‌ऋतूचे दिवस आले. सालाबादप्रमाणें मराठ्यांच्या दोन फौजा नोव्हेंबरांत उत्तरेचा मार्ग चालू लागल्या. एकीचें आधिपत्य पिलाजी जाधवाकडे दिलें असून तिनें बुंदेले राजेरजवाड्याकडे मोर्चा फिरवला.[१४] दुसरी शिंदे होळकरांच्या नेतृत्वाखालीं माळवा रजपुताना भागाकडे चालूं लागली. प्रतिवर्षी मराठे पुढें पुढें सरकत आग्र्यापर्यंत येऊन ठेपले, यापुढें त्याची उपेक्षा करून चालणार नाहीं, म्हणून दिल्लीहून दोन प्रचंड फौजा तयार होऊन वजीर कमरुद्दीनखान व मीरबक्षी खानडौरान याच्या नेतृत्वाखालीं पूर्वेकडे व पश्चिमेकडे मराठ्यांच्या तोंडावर रवाना झाल्या. २० नोव्हेंबर १७३४ला वजिरानें दिल्ली सोडली व सुमारें अडीच महिन्यानीं नरवरनजीक मराठ्यांना गाठलें. मोंगल फौजेची भिस्त तोफखान्यावर तर मराठ्यांची चपळाईच्या दौडीवर. शत्रुसैन्याशीं समोरासमोर लढाई न घेतां मराठी राउतांनीं चोरटे हल्ले सुरू केले. मराठ्यांशीं झीटपीट होत कमरुद्दीनखान ओडशानजीक उदितसिंगांच्या तळ्यावर येऊन उतरला. मराठ्यांच्या वायुगतीपुढें मोगलांचा तोफखाना निरुपयोगी ठरला. १ सवाल, १४. २. १७३५ ला "ईद होती तरी नगारा न वाजवितां मोगलानें मुकाट्यानें कूच आरंभिलें. मराठ्यांनीं बातमीस राऊत ठेवले होते ते शत्रूच्या हालचालीची खबर घेऊन येताच कुल्ल फौजेनें चालून जाऊन मोंगलाभोंवतीं घिरट्या घेऊन, करोल पुढें घालून युद्ध केलें. हुजरात व सटवोजी जाधव, गोविंद हरि पटवर्धन, राणोजी व भिकाजी शिंदे, संताजी मोरे, शिवाजी घालवडे, येद्याजी सतकर, अर्जुन भोंसले यांनीं व सर्व लोकांनीं बरीचशी मेहनत करून कमरुद्दीनखान वजिरास खडा केला. मराठ्यांचा मारा चुकविण्याकरितां वजिरानें ओडशाचा आश्रा केला. ओडशास वेढा घालून न बसतां वेत्रवती उतरून जाटवाडा भदावर ग्वालेरीकडे मराठ्यांचें सैन्य वळलें. जो मोगल मराठ्यांचे पाठीवर आला त्याच्या पाठीमागें मराठ्यांची फौज

---

१३ रजपुताओंका इतिहास, ओझाकृत. १४ पे द. नि. का. १४

लागून त्यास ओडशांत घातला ही सलाबत कांहीं सामान्य झाली नाहीं."[१५] मराठे दूर जातांच ओडशांतून बाहेर पडून त्यांचा मार्ग अडविण्याच्या हेतूनें वजिरानें पुनः नरवरचा रोख धरला. वजिराचा नेट पाहून मराठे मागें सिप्री कोलारसेवर हटले. पिलाजी जाधव आपल्या २ मार्च १७३५च्या पत्रांत मोहिमेचें वृत्त लिहितो, "आम्हाकडील वर्तमान तरी कमरुदीखां वजीर वीसा पंचवीसा हजार फौजेनसीं दिलीहून आम्हावर रवाना होऊन आला. त्यांचीं आमचीं दोन तीन युद्धें झालीं. त्याचीं दोनतीनशें उंटें व घोडीं पाडाव आम्हांकडे आलीं. याउपरी आम्ही तिकडून निघोन सिवपुरी कोलारस या प्रांतें आलो मोगल नरवरावरी आहे. त्यासी व आम्हासी बारा कोसाची तफावत आहे पुढें आम्ही मजल दरमजल बुंदेलखंडांत बुणगे आहे त्यास सामील करून चांदे देवगडाच्या मुलकातून देशास येऊन "[१६] जूनच्या आरंभीं पिलाजी दक्षिणेंत पोहोंचला. एवंच कमरुद्दीनखानाच्या शहामुळें टक्यापक्यांचें काम चाललें नाहीं व १७३४-३५ ची बुंदेलखंडाची मोहीम व्हावी तितकी फलदायक झाली नाहीं.

पण बुंदेलखंडांतील अयशस्वी मोहिमेचा वचपा शिंदे होळकरांनीं चांगलाच भरून काढला. १७३२त माळव्याच्या मोकाशाची वाटणी करून शिंदे होळकर पवारांची माळव्यांत स्थापना करण्यांत आली. या विभागणीनें पेशव्याचे हेतु उत्तम रीतीनें सिद्धीस गेले. आपला सरंजाम वाढवावा या लालचीनें शिंदे होळकरांनीं चवताळून मोगलांच्या मुलखावर हल्ल्यामागें हल्ले चढवून बादशाहाच्या सुभेदारास एका क्षणाची स्वस्थता लाभूं दिली नाहीं. गेल्या वर्षीं माळवा, बुंदी कोटा, अहीरवाडा या मुलखांतून खंड जमा केल्याचे मागें लिहिलेंच आहे १७३४ चा पावसाळा संपताच त्यांनीं माळव्यांतील मोहीम चालू केली.

शिंदे होळकरांना जरब दाखविण्याकरितां दिल्ली येथील दुसऱ्या सैन्याचें नेतृत्व आपल्याकडे घेऊन मीरबक्षी खानडौरान दिल्लींतून बाहेर पडला मराठ्यांनीं सांबर लुटलें व ते अजमिराजवळ आहेत असें समजल्यावरून खानडौराननें "सवाई जयसिंग, मारवाडचा अभयसिंग, महाराव कोटेवाला वगैरे राजे यांस सामील करून घेतलें दोन लाख स्वार व तोफखाना व अराब्यासी तो संख्या नाहीं अशी प्रचंड मोंगल-सेना जमा झाली मुकुंदरा उतरून रामपुरा प्रांते मराठ्यांच्या रोखानें मोगलांचें कूच झालें. इकडून शिंदे होळकर जाऊन त्यांनी युद्धास सुरुवात केली. मोंगलास चौगीर्द वेढा देऊन बुडवावें हा मराठ्यांचा पहिला बेत त्याप्रमाणें आठ रोज लष्करचे चौगिर्दी कहीं काबाड दाणा घांस बंद केला. मोंगलांचीं उंटे घोडी आणली. "[१७] खानडौरान

---

१५ पे द नि. का १४ व जोशी संग्रहांतील रियासतींत उद्धृत केलेली दोन पत्रें.
१६ पे द नि का. १४ १७ पे द नि. का. १४.२३.

साम्राज्याचा मीरबक्षी, त्याच्या निशाणाखालीं बहुतेक रजपूत रजवाड्यांच्या फौजा जमा झालेल्या; अशा प्रचंड सैन्याशीं मुकाबिला करण्यापेक्षां जयपूर, बुंदी, कोटा येथील तुकड्या आघाडीवर गेल्यामुळें या उघड्या पडलेल्या प्रदेशांत आपल्याला अडथळा होणार नाहीं हें शिंदे होळकरांच्या ध्यानात येऊन त्यांनीं वेढा उठविला. शत्रूला कळूं न देतां गनिमी कावा करून मराठे मुकुंददरा उतरले. बुंदी कोट्यावरून त्यांनीं जयसिंगाचा मुलुख गाठला व तेथें लुटालूट आरंभिली. मराठे निसटून मुकुंद-दरा पार झाले आणि आपल्या पिछाडीकडील मुलुखाचा त्यांनीं नाश चालविला आहे ही बातमी येतांच मीरबक्षीच्या हाताखालील सैन्याचा धरबंद सुटला आपल्या मुलखाचा बंदोबस्त करण्यासाठीं जयसिंग जयनगरकडे वळला व तोच मार्ग इतर संस्थानिकांनीं स्वीकारला. तेव्हां मोहीम चालू ठेवण्याचा विचार खानडौरान यास रद्द करावा लागला. जयसिंगाच्या मध्यस्थीनें होळकर मीरबक्षीच्या २२ मार्च १७३५ ला भेटी होऊन तह ठरला[१८] मराठ्यांची ब्याद टळावी या अपेक्षेनें माळव्याच्या चौथाईदाखल दरसाल २२ लाख देण्याचें खानडौराननें कबूल केलें. खानडौरान मे सरतां सरतां राजधानीस पोहोंचला व शिंदे होळकर जुलैच्या पहिल्या आठवड्यांत (६-७-१७३५) पुण्यास दाखल झाले. तेव्हां आपल्या सरदारांनीं बादशहाच्या मीरबक्षीशीं सामना करून फत्ते केली तेव्हां त्यांच्या सन्मानार्थ पेशवा होळकरास संगमापावेतों व शिंद्यास घोरपडीपावेतों सामोरा गेला.[१९]

---

## प्रकरण चौथें

# समेटाचा प्रयत्न

### ( इ. स. १७३५-३६ )

गनिमाच्या फौजांस पैका देऊन लाजिरवाणा सलूख केला म्हणून पादशाहाची खानडौरानवर इतराजी झाली प्रचंड सैन्य उभारण्यांत पैशापरी पैसा वाया गेला व या सैन्यानें मराठ्यांचा समाचार न घेतां त्यांच्या मागण्या कबूल कराव्या यांत फदफितुरी असावी असा सल्ला बादशहास देण्यास कमरुद्दीनखान, सादतखान इत्यादि मुत्सद्यानीं सुरुवात केली. दिल्लीच्या राजकारणांत या वेळीं हिंदुस्थानी व तुराणी असे पक्ष पडले असून त्यांच्यांत मोठी चुरस माजून राहिली होती सादतखान वगैरे तुराणी मुत्सद्यांनीं खानडौरान, जयसिंग यांची पादशहाजवळ नालीश केली. " राजाधिराज यांनीं परिच्छिन्न दक्षिण्यांची हिमायेत करून माळवा खराब केला जयसिंगाच्या हातून मराठ्यांचा बदोबस्त होत नाहीं तरी मला माळवा द्या, मी

---

१८ पे. द. नि. का. १४. २४; २६, २७ १९ पे. द. नि का. २२. पृष्ठ १६३.

हरप्रयत्नानें गनिमांचा बंदोबस्त करतो. सैन्य उभारण्यास जयसिंगाप्रमाणें मी बाद-शहाजवळ द्रव्याची याचना करीत नाहीं मी खजानापूर आहें; निजामाचा माझा स्नेह आहे. आम्ही दोघे मिळून गनिमास नर्मदेअलीकडे उतरूं देत नाहीं,"[१] अशा मतालबाची अर्जी सादतखानानें गुदरली पादशहान यावर जयसिंग व खान-डौरान याचा जाब विचारला. त्यांनीं उत्तर केलें कीं, "माळव्यांत मवासी मुलुक रोहिल्यांचा वगैरे आहे तो पेशव्यास जहागीर द्यावा, पातशाही मुलकास हारगीज तोसीस लागूं न द्यावी व पेशव्यानें हाजरतीचे सेवेंत दाखल व्हावें या अटीवर सलुख झाला. युद्ध करून मराठे आटोपतीलसें दिसत नाहीं. त्यांचे मुद्दे मान्य केल्यास ते मुलकास उपद्रव देणार नाहींत म्हणून त्यांचें मागणें मान्य करणें आम्हांस योग्य वाटलें."[२] त्यानें बादशहास भय घातलें कीं, "सादतखानाचें बोलणें मानभावी-पणाचें आहे. तो व निजाम एक झाले तर हे तुराणी कदाचित् नवा बादशाहा उभा करतील."[३] यासंबंधीं कोणतें धोरण स्वीकारावें या विचारांत बादशाहा पडला माळवा, आग्रें आपल्या हातचें सुटूं नये म्हणून बादशहास भय उत्पन्न करून जयसिंग स्वस्थ बसला नाहीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या खटपटी हाणून पाडण्यासाठी मराठ्यांकडेहि त्यानें संधान लावलें. पेशव्याची आई काशीयात्रेस निघाली होती. उदेपूर, जयपूर येथील राजेरजवाड्यांचे सन्मान घेत ही बाई काशी प्रयागाकडे चालली असतां तिच्या-बरोबर असलेल्या वकिलामार्फत जयसिंगानें पत्रव्यवहार सुरू केला. त्याचें बोलणें पडलें कीं "आम्ही रायाचा उत्कर्ष रक्षिला, सबब कीं तुर्कांचा (बादशाहाचा) भरवसा नाहीं. जर दक्षिणी फौजावर शेर होते तर आम्हांसहि न मानते यामुळें सर्वस्वी रायाचा बोल उपर केला भरंवसा देणें म्हणजे दोन्ही सुभ्यांची बहाली करून घेऊं. नाहींतर दुसऱ्या (पेशव्यास विरोधी) माणसाची नेमणूक होऊन पेशव्यास जड जाईल. पिलाजी जाधवराव व शिंदे होळकर पवार या त्रिवर्गांनीं पांच हजार फौजे-निशीं मजला सामील व्हावें. मोबदलादाखल मी पेशव्यास वीस लाख नक्त देईन व फौजेस दररोज पांच हजार रोजमुरा देईन. पेशव्यानें मात्र आपले माळव्यांतील कमावीसदार उठवावे. याशिवाय पेशवा माळव्यांत आल्यास खानडौरानच्या मार्फत कदाचित् बादशहा त्यास भेटीस बोलावून नवी जहागीर बहाल करील."[४]

जयसिंगानें सुरू केलेलीं बोलणीं अर्धवट राहून गतवर्षीं ठरलेला तह दिल्ली दरबारनें धुडकाऊन लावला व युद्धाची तयारी चालविली. "अभयसिंग व कमरदीखान यांचा एक हात पातशहानीं करून दिला व सुभे अकबराबाद, गुजराथ, माळवा या सुभाचा तालुका कमरदीखान याजवर सोपविला. जयसिंग फौजसुधा

१ पे द. नि का. १४.४७ २ पे द. नि. का १४ ३९ ३ पे. द नि. का. १४ ४७ ४ पे द. नि. का. १४. ३१. ४७.

सामील जाहाले तर त्यांच्या तालुक्यांत तफावत न करावा, जर सामील न होत तरी याणी जे करणें तें करावें नद्याचे पाणी उतरतांच खानडौरान जयसिंग दक्षण प्रांते येतील व कमरदीखान अभयसिंग व सादतखान ग्वाल्हेरच्या मार्गानें निघतील, "[५] अशी खात्रीची बातमी दिल्ली येथील मराठ्याचा वकील मयाराम यानें पेशव्यास कळविली

स्वत: जाऊन जरब दाखविल्याशिवाय दिल्ली दरबार तडजोडीस तयार होत नाही हें ओळखून पेशव्यानें उत्तरेस जाण्याचें मुक्रर केलें आश्विन वद्य त्रयोदशी ३-१०-१७३५ रोजीं सुमुहूर्तानें पेशव्यानें प्रस्थान दिलें उत्तरेच्या कारभारांत अनुभवलेले शिंदे होळकर यांस त्यानें बरोबर घेतलें बुंदेलखंडांतील कामकाज पिलाजी जाधवाकडे सोंपविलें गेलें. आजारपणामुळें पिलाजीस स्वारीवर निघतां येईना तेव्हां या फौजेवर सटवोजी जाधवाबरोबर बाजी भिवराय रेठरेकर याची नेमणूक करण्यांत आली परस्परांस एकमेकांच्या हालचाली कळवून पेशव्याच्या सल्यानें दोन्ही सैन्यांनीं चालावयाचें ठरलें.

१७३४ व ३५ या दोन्ही वर्षांतील मोगलाच्या मोहिमा निष्फळ ठरल्या. ज्याच्या सरदारांनीं बादशाही सैन्याची वाताहात केली तो पेशवाच खुद्द उत्तरेस निघाला हें ऐकून उत्तरेकडील संस्थानिकांचा थरकाप उडाला. शेजारीं असलेल्या निजामाच्या दरबारांत वाटाघाटी सुरू झाल्या तयारींत असलेलें चांगलें म्हणून फौजेची व तोफखान्याची नवाबानें जलदी चालविली[६] बादशहानें सादतखानास फौज घेऊन तावडतोब दिल्लीस येण्याचे हुकूम सोडले. खान हिंदुस्थानी पक्षाचा पाडाव करण्याच्या संधीची वाटच पहात होता, बादशाहाकडून हुकूम येतांच त्यानें झपाट्यानें लखनौहून कूच आरंभिलें.

सादतखान आग्र्याच्या मार्गावर असतां " अडारूचा जमीदार याचा लेक जसवंतसिंग दहाबारा हजार स्वारांनिसीं सादतखानाच्या मुकाबिल्यास आला[६] सादतखानाजवळ चाळीस हजार फौज व तोफखाना मुबलक होता. जूज मोठें झालें. चार पांच हजार माणूस ठार झाले. राजा तो जिवेंच मारला गेला परतु सादतखानहि हतवीर्य झाला सवाईवर यावें या उमेदीनें खान निघाला होता त्या उमेदींत तफावत पडली."[७] खानडौराननें ठरविलेला तह फिरविण्यांत सादतखानानें पुढाकार घेतला होता. साहजिकच या वेळीं बादशाहाची सारी भिस्त खानावर होती व खानास तर आरंभीच बुंदेल्यानीं दमविलें.

३ ऑक्टोबर १७३५ ला पेशवा स्वारीवर निघाल्याचें मागें लिहिलेंच आहे. निष्कारण शक्तीचा अपव्यय न करतां जमल्यास नुसत्या दबावानें माळवा, रजपुताना, बुंदेलखड इत्यादि प्रांतांतून सरदेशमुखीचौथाईदाखल खंड वसूल करावयाचा व बादशहाकडून मान्यता मिळवून आपल्या दरसालच्या मागणीस कायदेशीरपणा आणावयाचा हा या

५ पे. द नि. का. १४ ३९ ६ पे द. नि. का. १४. ४१. ४२.
७ पे. द नि. का १४. ४२.

स्वारींतील पेशव्याचा दुहेरी हेतु होता. चांदवडच्या घाटानें जाऊन पेशवा नवापुरास पोहोंचला. तेथून नंदुरबार सुलतानपूरच्या रोखें तापी उतरून खानदेशांतून कुकशीच्या मार्गें माळवा गुजराथच्या सरहद्दीवर तो दाखल झाला. कुकसी फत्ते करून लुनावाडा, बासवाडा, डोंगरपूर प्रांतांतून राण्याच्या भेटीस चालला बासवाड्यास लागून असलेला बनेड परगणा आपल्यास प्राप्त व्हावा म्हणून पूर्वींपासून सदाशिव बल्लाळ याच्यातर्फे पेशव्याचा प्रयत्न चालू होता पेशवा आपल्या भेटीस येत आहे हें कळतांच राण्यानें पेशव्याच्या स्वागतार्थ बाबा तख्तसिंहास रवाना केलें तख्तसिंह आपल्या बड्या पाहुण्यास घेऊन उदेपुरास पोहोंचला व चम्पाबागेंत या बड्या पाहुण्याची उतरण्याची सोय करण्यात आली मुक्कामाच्या दुसऱ्या दिवशीं पेशव्याच्या सन्मानार्थ राण्यानें मोठा दरबार भरविला मध्यभागीं सुवर्णमंडित दोन सिंहासनें ठेवण्यांत येऊन एक राण्यानें व दुसरें पेशव्यानें सुशोभित करावें अशी योजना करण्यांत आली. पेशव्यास सामोरे जाऊन राण्यानें त्याचें स्वागत केलें व आसन स्वीकारण्याची विनंति केली "राणाजी, आपण चक्रवर्ति आहांत, आपल्या बरोबरीनें मी बसणें अयोग्य होईल," असें यजमानास खुश करणारें समर्पक उत्तर देऊन राण्याच्या जवळच पण थोडेंसें खालीं असलेल्या आसनावर पेशवा अधिष्ठित झाला व कामास सुरुवात झाली. दरसाल दीड लाख खंडणी व बनेड परगणा कायमचा आपणांस मिळावा अशी पेशव्यातर्फे मागणी करण्यांत आली द्रव्य द्यावयास राणा कबूल झाला, पण आपल्या राज्यापैकीं परगणा गमावून बसण्याची त्यानें नाखुशी दर्शविली.[९]

तहाचें बोलणें लांबल्यामुळें पेशव्याचा मुक्काम कांहीं दिवस उदेपुरावर राहिला. दरम्यानच्या काळांत ठिकठिकाणच्या राजेरजवाड्यांनीं मेजवानी दाखल पेशव्याकडे मौल्यवान चिजा रवाना केल्या.[१०] सवाई जयसिंगाचा दिवाण पेशव्याच्या भेटीस आला. त्याजबरोबर पेशव्यास नजराणा म्हणून दोन लाख नक्त शिवाय जवाहिर व वस्त्रें, पाच घोडे व हत्ती असा पांच लाखांचा ऐवज जयसिंगानें पाठविला व त्वरेनें जयपुरास भेटीस बोलाविलें. जयपुरास आल्यावर पेशव्यानें सवाईच्या मध्यस्थीनें बादशहास भेटावें, बादशहानें पेशव्याची भेट घेऊन वीस लाख नक्त व चाळीस लक्षांची जाहागीर माळव्यांत द्यावी, दोस्त महमदाचे मुलखांत तनखा द्यावा असा तहाचा कच्चा मसुदा महादेवभटामार्फत पेशव्यास लिहून[११] पाठविला.

पण जयसिंग, खानडौरान याजवर इतराजी होऊन सवाईच्या सुभ्यावर कमरदीखानाची किंवा सादतखानाची नेमणूक करण्याचा बादशाहा विचार चालला

---

८ पे. द. नि. का. १४ ३१. ४७ ९ *Fall of the Mughal Empire*.
१० पे. रो. ११ पे. द. नि. का. १४, ५०.

असतां तो जयसिंगास पुनः पेशव्याकडे मध्यस्थी करावयास सांगतो हा फेरबदल एकाएकी कसा झाला? सादतखान, अभयसिंग यांस बोलावून युद्धाची तयारी करून स्वतः मराठ्यांविरुद्ध चालून जाण्याची भाषा बादशाहा विसरला तरी कसा? याचें उत्तर शोधावयास दूर जावयास नको; तें बादशाहाच्या अस्थिर भित्र्या स्वभावात व पोरकट बुद्धींत तावडतोब मिळतें. फौज जमवून स्वतः मराठ्यांवर तो निघता तर मीरबक्षी, वजीर, यांचे खेळ जागच्याजागीं जिरले असते. पण त्या सुखासीन वेडप्याला आपल्या स्वास्थ्याचा भंग नको होता. दिवसांतून अठरा तास झनानखान्यांतील मृदुमृदुल झुणझुण संगीतानें मन रिझविणाऱ्या त्याच्या जीवाला तरवारीचा खणखणाट कसचा गोड लागतो? खानडौरान त्याच्या मर्जीतला, अहर्निश त्याच्या सनिध, तो समेटास उत्सुक. ज्या सादतखानाच्या सल्ल्यानें बादशाहानें समेट फिसकटवला त्याचें यश बुंदेल्यांनीं प्रथमच हिरावून नेलें. आपला राग आवरून बादशाहानें खानडौरान यास जवळ करून मराठ्यांशीं तह घडवून आणण्याचें काम त्यावर सोंपविलें.

उदेपूर येथील पिचोली सरोवरांतील विख्यात जलमंदिर पाहून[१२] राण्याकडून परगण्याऐवजीं जास्त रक्कम स्वीकारून पेशव्यानें ८–२–३६ ला उदेपूर सोडलें. जयसिंगाकडून आयामल व खानडौरानकडून निज्याबत अलीखान यापूर्वी उदेपुरास दाखल होऊन त्यांनीं तहाची वाटाघाट सुरू केली होती. जयसिंगाची भेट होऊन समक्ष भेटींत त्याच्याकडून आपले सर्व मुद्दे मान्य करून घेऊं याबद्दल पेशव्यास शंकाच नव्हती. जयनगरच्या वाटेवर असतां नाथद्वारचें पवित्र

---

१२ जलमंदिर पहावयास नेऊन तेथे पेशव्यास दगा करावयाचा असा रजपुताचा बेत होता, पण याचा सुगावा पेशव्यास लागून त्यानें जलमंदिर पहाण्याचें नाकारलें व दंडादाखल सात लाखांची रक्कम उदेपुरच्या राण्याकडून उपटली अशी हकीकत सर जदुनाथ सरकार आपल्या *Fall of the Mughal Empire* या ग्रंथात देतात. पण पेशवे रोज-कीर्दीत छ. २ सवाल सीत सलासीन या दिवसास खालीलप्रमाणें नोंद आहे.

“ खर्च रुपये ३९ राजश्री राऊ उदेपूरचें जलमंदिर पहावयास गेले तेव्हा

४ खैरात

३५ इनाम

३० नावाडे

५ भगरीवाले

———

३९ ”

या नोंदीवरून पेशव्यानें जलमंदिरास दिलेल्या भेटीसंबंधीं तिळमात्र शंका उरत नाहीं.

क्षेत्र लागलें. तेथें दोन दिवस मुक्काम करून पत्नीसमवेत यथासांग पूजाअर्चा पेशव्यानें आटोपली;[१३] ब्राह्मण, गोसावी, फकीर यांना उदार हस्तें दानधर्म करून पेशवा जयनगरची वाट चालूं लागला. खुद्द मोंगल दरबारनें पेशव्याशीं संधि करण्याचें धोरण स्वीकारलेलें, मग मार्गांतील छोट्या राजेरजवाड्यांनी पेशव्यास संतुष्ट राखण्याकरितां नजराणे पाठविले तर नवल काय? मेजवान्या घेत घेत, लहान लहान मुक्कामांनीं पेशवा ३ मार्चला जयनगरनजीक पोहोंचला. दुसऱ्या दिवशीं ४ मार्च रोजीं मोठ्या समारंभानें जयसिंग व बाजीराव यांची भेट झाली. पेशव्यास मेजवानी दाखल ५००० रु, मूल्यवान अलंकारांनीं सजविलेला आपल्या संग्रहांतील एक नामांकित हत्ती, २५ उंट, शृंगारलेल्या दोन पालख्या जयसिंगानें नजर केल्या. त्या वर्षाच्या चौथाईदाखल वीस लाख नक्त पेशव्यानें पदरांत पाडून घेतले[१४] व माळव्याच्या सुभेदारीचें फर्मान बादशहाकडून मिळवून देण्याचें कबूल करून जयसिंग परत गेला.

राणाजीनें व सवाईनें पेशव्याच्या अटी सर्वस्वीं कबूल केल्यामुळें त्यांच्या मुलखास उपद्रव देतां येईना. पेशव्याबरोबर लष्कर तर अनिवार होतें. तहाचें बोलणें बादशहाशीं सुरू झालें होतें, ही वाटाघाट संपेपर्यंत लष्करचा खर्च भागवावा कसा हा पेशव्यास मोठा पेंच पडला, मारवाडची मोहीम काढून पेशव्यानें हा पेंच वारावयाचें ठरविलें. गतवर्षापासून दिल्ली दरबारांत पेशव्याच्या विरुद्ध पक्षात मारवाडचा अभयसिंग सामील झाला होता त्याला तंबी पोहोंचविणें जरूर होतें. जयपूरचे कछवे व मारवाडचे राठोड यांचें कित्येक पिढ्यांचें वैर असल्यामुळें या वेळीं आपण मारवाडांत फौजा रवाना केल्या तर सैन्याचा खर्चहि परस्पर निभेल व जयसिंगास आपल्या मैत्रीचें प्रत्यंतर मिळेल अशा विचारानें पेशव्यानें शिंदेहोळकरांच्या हाताखालीं एक फौज मारवाडांत रवाना केली.[१५] अभयसिंगाचीं एकएक ठाणीं घेत ही फौज मेडत्यावर चालून गेली (१.४.३६) प्रतापसिंगास बोलीचाली करण्यास शहरांत पाठविलें पण थाक लागेना, तेव्हां हल्ला चढवून ठाणें घ्यावयाचें असें मराठ्यांनीं ठरविलें पहिल्याच हल्ल्याबरोबर शहर खालीं आलें शहरांतील लोक किल्ल्याच्या व सराईच्या आश्रयास गेले व तेथून बाहेर निघून एक दोन वेळां मराठ्यांवर निकराचे हल्ले करून त्यांनीं मराठ्यांच्या आघाडीचा मोर्चाहि काबीज केला. पण बाहेरून कुमक न पोहोंचल्यामुळें खंड भरून मेडत्यानें आपली सुटका करून घेतली. मेडत्यानंतर नागोर-अजमीरवरून मराठ्यांचा वरवंटा फिरला मारवाडचा प्रदेश उध्वस्त करीत लुटीनें लादलेलें शिंदे-होळकरांचें सैन्य एप्रिल सरतांसरतां माळव्यांत पेशव्यास सामील झालें.

---

१३ पे रो. १४ Elliot and Dawson १५ Elliot and Dawson, पे द. नि का. १३. ४९ १४. १४ ५६.

एकेच ठिकाणीं शत्रूस आपलें सैन्य जमवितां येऊं नये म्हणून जुजबी फौज देऊन ' बुंदेल्याकडील पैक्याचा निर्वाह करणें, तिकडील तालुकियाचा धंदा उरकून तिकडेच राहणें ' अशी कामगिरी नेमून देऊन बाजी भिवरावची रवानगी बुंदेलखंडाकडे करण्यात आली होती. स्वतः पेशवा जंगी सामानानिशीं निघाला आहे हें कळल्यापासून सर्वजण आपापल्या ठायीं भिऊनच होते दतिया, ओडसे या प्रांतें बाजी भिवराव पोहोंचतो तों " दोन्ही स्थळांतून बोलीचाली करावयास भले माणूस लष्करांत आले. त्याचें म्हणणें पडलें कीं, सालगुदस्ता आपणावरी कसाला झाला आणि पैकाहि द्यावा लागला, याकरितां कांहीं रयात करावी म्हणून फार रदबदल केली. त्यांच्याशीं बोली करून गुदस्तापेक्षां कांहीं जास्त खंडणी ठरवून मुदती करून दिल्या." दोन्ही संस्थानानीं सलुखानें बाकीचा निर्गम करून देतांच भदावराकडे बाजी भिवरावानें मोर्चा फिरविला. भदावरशीं बोलणें चाललें असतां सुकलोरा, गुजरोला, पछोर, उचाट व जाठवाडा येथील जमीनदारांकडून खंडणीच्या प्रयोजनास माणसें येऊन बोलीचाली होऊन खंडणीचे करार झाले. भदावर-करानें फारसे आडेवेढे न घेतां नमतें घेतलें. अशा रीतीनें सोंपविलेली काम-गिरी अदथ्या महिन्यांत सपवून बाजी भिवरावानें पेशव्यास लिहून कळविलें, " या उपर पुढें जावयास जागा नाहीं. आज आमचा मुक्काम कन्हेरगड प्रा। दतिया नजीक सिंध नदी एथें आहे. येथें भदावराचाहि मेढा आहे व हिरदेसाहजीचाहि आहे. याच प्रांतें फार दिवस राहतां येत नाहीं. कौली मुलुख खराब होईल. पुढें यमुनापार जावे तर मार्गांत पाणी नाहीं कुच्याचें पाणी आहे या पुढें काय मनसबा योजला आहे आज्ञा केली पाहिजे."[१६] (२०. १. २६) खंडणीचे वायदे ठरले तरी खंडणी वसूल होतांहोतां फेब्रुवारी महिना आला. मुलुखगिरीच्या दिवसांत शत्रूच्या प्रदेशावर गुदराण चालवावयाची हा मराठी फौजेचा शिरस्ता. बुंदेलखडच्या संस्थानिकांनीं खंडणीचा निर्गम करून द्यावयाचें कबूल केल्यामुळें या कौली मुलुखावर मराठा फौजांस हात मारतां येईना

फौजेचें पोट कसें निभवावें या विचारांत बाजी भिवराव असतां पेशव्याकडून सूचना आली कीं, यमुना उतरून काल्पीपलीकडील मुलूख मारावा. पेशव्यानें सुच-विलेल्या मार्गांत एक अडचण होती ती म्हणजे काल्पीजवळील यमुनेचे उतार बुंदे-ल्यांचे मुलखांत असल्यामुळें त्यांच्या संमतीशिवाय रेटरेकरास या मुलखांतून कूच करतां येईना. बुंदेल्याकडे वकिलीच्या प्रयोजनानिमित्त गोविंद बल्लाळ याची पूर्वी पासून नेमणूक होती, त्याच्या मार्फत रेटरेकरानें बुंदेल्यांसी राजकारण केलें कीं, दोन्ही फौजानीं मिळून यमुना उतरावी, दुआबांत शिरावें, व काल्पीपलीकडील मुलूख

---

१६ पे द ?. का. १४. ५?.

मारावा. बुंदेल्यांस ही सूचना मनापासून पसंत पडली. ज्याच्याशीं बुंदेल्याचें आजन्म हाडवैर त्या मोगल सुभ्याच्या अमलाखालीं काल्पीपलीकडील मुलूख असतां मराठ्यांच्या साहाय्यानें शत्रूस हैराणगत करण्याची संधि बुंदेले वायां जाऊं देतील हें संभवनीय नव्हतें याच वेळीं मराठ्यांच्या सुदवानें गाझीपरच्या जमीदाराचा लेक रूपराय बापाच्या मृत्यूचा सूड उगविण्याकरितां साहाय्य मिळाल्यास पहावें म्हणून बुंदेल्यांकडे आला होता त्याची व गोविंद बल्लाळाची भेट होतांच मराठ्यांस सामील होण्याचें त्यानें कबूल केलें. बुंदेले पाच हजार, गाझीपूरचा रूपराय व बाजी भिवराव या त्रिवर्गांनीं आग्र्याच्या रोखें कूच केलें. ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर दोन हजार पठाणांची तुकडी असून किल्लाहि अभेद्य होता. वेढा घालून बसल्यास ठाणें कित्येक महिने दाद देणार नाहीं हें जाणून ग्वाल्हेर सोडून बाजी भिवराव वर सरकला. गनिमांच्या हालचालींवर दरबारचें लक्ष होतें. दुआबांत उतरण्यापूर्वीं गनिमाना शह देण्याकरतां महमदखान बंगषाची दिल्लीहून रवानगी झाली १४-१-३६ ला बंगष धोलपुरास पोहोंचला आणि चमेल उतरून मराठ्यांची वाट धरून बसला एकदम शत्रूच्या अंगावर चालून न जातां चमेल व कुवारी या नद्यांच्या चिमट्यामध्यें बेहडांत सभोंवतें भिताड घालून तोफा जोडून चमेलीच्या रेताडांत लष्कर आवळून तो राहिला. बाजी भिवराव नुराबादेचे सराईवर बंगषापासून १७ मैलांवर येऊन पोहोंचला. आश्रयाची जागा सोडून बंगष पुढें येईल म्हणून बाजी भिवराव दहा बारा रोज तेथेंच मुक्काम करून राहिला परंतु बंगषनें खळी धरली ती सोडली नाहीं. बंगषला बाहेर काढावा म्हणून मोंगलाच्या तळाभोंवतीं मराठे राऊत घिरट्या घालू लागले.[१८] दोनतीन तुकड्या यमुनापार होऊन त्यांनीं इटावा कानपूर या प्रदेशांत लुटालूट आरंभिली इतकें होतें तों इकडे पेशव्याचीं दिल्ली दरबारशीं सलुखाची बोलणीं लागलीं व दरबारची खात्री पटावी म्हणून "मुलूक उपद्रव करूं नये, यमुना न उतरणें "[१९] अशा अर्थाचीं पेशव्याचीं पत्रें बाजी भिवरावास रवाना झालीं. बंगषाकडून भला माणूस येतांच त्याच्या विद्यमानें ठराव होऊन पेशव्याच्या आज्ञेनुरूप मराठी फौजा परत फिरल्या. अशा रीतीनें बुंदेलखंडची मोहीम समेटानें आटपून बाजी भिवरावनें दक्षिणेस कूच केलें. वैशाख सरतां " राऊ स्वामीचा मुक्काम उजनीकडे होता तिकडे दर्शनास यावयाची आज्ञा जाहली " त्यावरून सडे फौजेनसी दोन अडीच हजार फौज घेऊन रायाकडे गेले.

मध्यतरींच्या काळांत वर म्हटल्याप्रमाणें दिल्लीदरबारशीं जयसिंग व खानडौरान यांच्या मध्यस्थीनें समेटाच्या वाटाघाटी चालू होत्या. धोंडो महादेव वकील याजजवळ मतालबाची याद देऊन बादशाहाकडे पाठविण्यांत आली. या यादी अन्वयें

१७ पे. द. नि. का. १४. ५२. १८ पे. द. नि. का. १४. ५५. १९ पे. द. नि. का. १४. ५६.

'हिंदुस्थानांत येक वतनी जागा द्यावी, पेशव्यास व पेशव्याच्या सरदारांस मनसबा व जाहगिरी द्याव्या, बादशाहाशीं भेट होऊन तह कायम व्हावा, दक्षणची सरदेशपांडेगिरी पेशव्यास मिळावी व खर्चास द्यावें" अशा मागण्या करण्यांत आल्या व यांपैकीं बहुतेक बादशाहाकडून मजूर होऊन आल्या. आपल्या मागणीस तावडतोब मंजुरी मिळाल्याचें पाहातां आपण फारच थोड्यावर संतुष्ट झालो ही चूक लक्षांत येऊन कीं काय धोंडोपंताबरोबर दुसरी याद पाठविण्यांत आली. यांत दोन मुख्य कलमें असून पहिल्या अन्वयें पेशव्यानें स्वारीचा खर्च म्हणून तेरा लाख रुपये मागितले व "माळव्याची सुभेदारी व दरोबस्त सुभा बादशाही किल्ले व कदीम राजे व इनामदार व रोजीदार वगैरेसह आम्हास जागीर द्यावा " अशी मागणी वाढविली. धोंडोपंताच्या पाठोपाठ बाबूराव मल्हार याची रवानगी करून सूचना करण्यांत आली कीं, " चिमणाजीपंत, बाजीराव यांचे भाऊ सरकार चाकरींत येकनिष्ठ आहेत, सरकारकामाविषीं बाजीराव यासीं बहुता प्रकारें समजावितात, सबब दोन लक्ष रुपये चिमणाजीपंत यांस सरकारांतून द्यावे." बादशहाकडून बाजीरावानें ओडसा, भदावर, चदेरी, नरवर, सिपरी, रामपुरा, आमझरे, कोटा दतिया, खेची, सेवडा व बुंदी या माळव्यांतील वतनदार संस्थानिकांकडून दहा लक्ष खंडणी सालोसाल वसूल करण्याचा हक्क मिळविला. दिल्ली दरबारची समेट करण्याची उत्कट इच्छा पाहून बाजीरावानें फिरून जी नवीन याद लिहून दिली तिचीं कलमें बितपशीलवार.

१ सुभे माळवा दरोबस्त राज्याचे तालुक्यासहित आम्हांस जाहागीर व सुभेदारी आमचे नांवें द्यावी

१ धार महमदखान व इजतखान यास काढून द्यावयाविसी सरकारांतून कुमक व्हावी व त्याच्या तालुक्याची जमीदारी आम्हांस द्यावी.

१ किल्ले मांडवगड, धार व रायसेन, प्रांत माळवा कुटुंब ठेवावयासी पंत प्रधान यासी द्यावा

१ चमलचे किनाऱ्यापावेतों जहागीर राव पंतप्रधान यास द्यावी जे समई तिकडील राजे रुजू होऊन नजर देतील तेव्हां त्याच्या वतनी महालास उपद्रव होणार नाहीं

१ राव पंतप्रधान यास कर्जदारीची वोढ बहुत, सबब पन्नास लाख रुपये तूर्त बंगाल्यावर देवावे

१ प्रयाग, काशी, गया व मथुरा पेशव्यास जहागिरीदाखल मिळावे

१ आग्र्यास यावे व राव पंतप्रधान यांची भेट अमीरखान व राजे जयसिंग यांचे विद्यमानें व्हावी. भेट जाहाल्यावर निरोपहि द्यावा.

१ सरदेसपांडेगिरी राव पंतप्रधान यांस वतनी करून द्यावी.

१ दक्षणेंत कित्येक राव पंतप्रधान यास इनाम देऊन सनदा करून द्याव्या. याशिवाय दक्षणच्या सहा सुभ्यांपैकीं पन्नास लक्षाची जहागीर व जो खजिना दक्षणचा, पेशव्याच्या कोसीस केल्यानें रुजू येईल, त्यापैकीं अर्धा सरकारांत व अर्धा पेशव्यास, सिवनेरचा किल्ला व कित्येक गांव वतनी व चंदावराचें राज्य शाहु राजे यांस द्यावें असेहि जादा मुद्दे घुसडण्यांत आले.[२०]

दर क्षणाला वाढत चाललेल्या पेशव्याच्या मागण्या ऐकून बादशाहा तर थकच झाला. दोन्ही पक्षांला समेट हवा असतो तेव्हां सामोपचाराच्या भाषेचा उपयोग; पेशव्याच्या मागण्या सर्वस्वीं कबूल करणें म्हणजे स्वतः निर्माल्यवत् होऊन निम्याहून अधिक राज्य पेशव्याच्या स्वाधीन करण्यासारखेंच होतें. तहाच्या अटींप्रमाणें दक्षिणचे सहा सुभे, माळवा, बुंदेलखंड, बंगाल पेशव्याच्या हातीं जाणार; या घातकी अटी मान्य करण्याऐवजीं मराठ्यांना काबूंत आणण्याचे भगीरथ प्रयत्न करण्याचेंच दरबारांत ठरलें व समेट फिसकटला

---

२० पे. द नि. का. १५, पृष्ठ ९२–९६.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.
ता.

## प्रकरण [illegible] वें

# दिल्लीवर चढाई

## ( १७३६–१७३७ )

" उज्जन प्रांतें आल्यावर तिकडून बाजी भिवराव यांची फौजहि आली. कट फार जमा जाहले. खर्चाचा मोठा गवगवा झाला. दिल्लीकडून खर्चास कांहीं न आल्यामुळें मोठी कुचंबणा झाली. यास्तव राजश्री राऊसाहेब लष्करसुद्धा देशास गेले. येथें तुम्हासी बोली केली होती कीं माळव्यांत छावणी करतो. आम्ही व मल्हारबा व त्रिवर्ग पवार याप्रमाणें फौज दहा पंधरा हजारापर्यंत राहिलो, खर्चाची पोख्ती बेगमी करून पाठविणें व पंचविसाच्या सनदा बोलीप्रमाणें पाठविणें व सुभ्याची सनद घेणें. कोणत्या गोष्टीची बाकी न ठेवणें. ते ठेवतील तर त्यास भारी पडेल."[1] या मजकुराचें जरबेचें पत्र माळव्यांतील छावणींतून राणोजी शिंद्यानें आपला दिल्ली येथील वकील महादेवभट हिंगणे यास ८ जून १७३६ ला रवाना केलें.

पेशवा व सवाई जयसिंगांची ४ मार्चला भेट झाली पेशव्याचें मनोगत दरबारास कळवून पेशव्याच्या नावें सुभेदारीचीं फर्मानें मिळविण्याकरतां सवाई दिल्लीस गेला व समेटाचीं बोलणीं सुरू झालीं. पेशव्याचे एक एक मुद्दे मान्य करावे तर त्याच्या वकिलानें जुनी याद बदलून नवीन लिहून द्यावी या वाटाघाटींत दोन तीन महिने कांहीं निष्पन्न न होतां लोटले. वाढतां वाढतां पेशव्याच्या मागण्या इतक्या बेसुमार वाढल्या कीं या भरमसाट मागण्यांस मान्यता दाखविणें दिल्ली दरबारास अशक्यप्रायच होऊन बसलें. पेशवा सैन्यानिशीं माळव्यांत होता तोंपर्यंत मात्र त्या सुचविलेल्या अटींवर तहास आपली तयारी नाहीं हें कळविण्याचें दिल्ली दरबारास धैर्य झालें नाहीं. वैशाख सपत आला व मृगाच्या सुरुवातीस मराठ्यांची धाड दक्षिणेस निघून जाईपर्यंत वाटाघाटीच्या मिषानें कशीबशी वेळ मारून न्यावयाचें दिल्ली दरबारनें ठरविलें दरबारच्या अपेक्षेप्रमाणें तहाची चर्चा अर्धवट टाकून पेशवा दक्षिणेंत निघाला, पण आपलें काम तडीस नेण्याकरतां त्यानें शिंदे, होळकर व पवार या आपल्या सरदारां-करवीं माळव्यांत छावणी करवली.

---

१ राजवाडे खंड ६ नं. ९५, ९६, ९७. हीं पत्रें राजवाड्यांनीं १७३४ चीं धरलीं आहेत व इतरानींहि तेंच साल मान्य केलें आहे. पण आंतील मजकुरावरून हीं तिन्ही पत्रें १७३६ चीं आहेत याबद्दल शंका वाटत नाहीं. १७३४ त पेशवा खानदेश-पलीकडे गेला नाहीं.

तहाला दरबार नाखूष व पेशवा दक्षिणेंत निघून गेल्याचें कळलें. आतां सहा महिने तरी मराठ्यांची हालचाल होण्याची भीति नव्हती. राणोजी शिंदे पैक्याची वाट पाहून थकला. त्यानें दोन आठवड्यांनीं पुन: जासूद पाठऊन कळविलें (२२-६-१७३६), "दोन महिने झाले. खर्च तर अनिवार, पोट चालावयास पाहिजे. (तहात ठरल्याप्रमाणे) तमाम गिरासियांचा बंदोबस्त केला, पठारीस ठाणें बसविलें, लालगडवाला लुटला, चोर देशांतरास गेले, रयतीस कौल दिला, प्रस्तुत सोनदेवाडियांत छावणी केली अगर परगणियांत आहों. कराराप्रमाणें सनदा व खर्च व सुभ्याची सनद सर्व गोष्टी करून पाठविणें " राणोजी शिंद्यानें इतकीं निकडीचीं पत्रें पाठविलीं तेव्हां फौजेच्या खर्चास बादशाही खजिन्यांतून एक लाख रक्कम मंजूर झाली व राहिलेल्या रकमेची भरपाई करण्याचें अभिवचन देण्यांत आलें. राणोजीनें चिडून वकिलांस लिहिलें कीं, " खर्चास काय करावें? त्यास अजून इतबार न येच तर या सलुखाचें काय ध्यावें? अवघा पैका बोलीप्रमाणें घेणें. येथील बंदोबस्ताचें काम चाली लावावें लागतें. तरी सुभ्याची सनद व कुमकेचीं पत्रें, समेत तोफखाना, सवाईजी व राणाजी, व बुंदी कोटा, नरवर, ओडसे, दतिया, भदावर, वगैरे घेणें याबद्दल सुभियाची सनद व कुमकेची तरतूद करून अर्धा खर्च व यादी दारतीचें कुल फर्मान घेऊन येणें." सप्टेंबरांत महादेवभट पादशहाकडून फर्मानें घेऊन शिंद्याच्या छावणींत दाखल झाला.

महादेवभटानें फर्मानें आणलीं तीं नायब सुभेदारीचीं व दक्षिणेच्या सरदेशपांडेगिरीचीं; त्यांत पेशव्याच्या इतर मागण्या धुडकाऊन लावल्या होत्या. मोगलानें पेशव्यास चकविलें याकरतां त्याचें पारपत्य करणें प्राप्त झालें. पावसाळा सरतांच फौज जमवून पेशवा १७३६ च्या २२ नोव्हेंबराला[२] उत्तरेची वाट चालूं लागला. शिंदे, होळकर, पवार माळव्यांत छावणी करून होते त्यांच्या भिलसा येथें जानेवारींत भेटी होऊन मोहिमेचा कार्यक्रम निश्चित करण्यांत आला. गतवर्षीं समेटावर चालून बादशाहानें मराठ्यांच्या मागण्यांना शेवटपर्यंत अनुमोदन दिलें नाहीं. तेव्हां सवाई जयसिंग व खानडौरान यांच्या मध्यस्थीपेक्षां स्वत:च्या सैन्याच्या जोरावर आपले हेतू पार पाडण्याचें पेशव्यानें ठरविलें. माळव्यातील जीं जीं ठाणीं हट्टीपणानें मराठ्यांचा अंमल कबूल करीत नव्हतीं त्यांना वठणीवर आणण्याचें निश्चित झालें. पहिला हल्ला भिलशावर झाला. भिलशाच्या पाठोपाठ चंदेरी वगैरे रोहिल्यांच्या जिल्ह्यांतील ठाणीं एकामागून एक सर करीत, पेशवा बुंदेलखडांत उतरला. ओडशा, दतिया, नरवर येथील मामला उरकून भदावरच्या मुलखावर पेशव्यानें चाल केली. भदावरच्या राजाजवळ जय्यत तयारीनें असलेलें पायदळ, घोडदळ व पन्नास हत्ती होते; शिवाय अलाहाबादचा सुभा सादतखान आपल्या कुमकेस येत आहे अशी खात्रीची

२ पे द नि. का. २२. ३४०, ३४१.

बातमी आल्यामुळें सलुखाचें बोलणें झिडकारून राजा फौज घेऊन बाहेर पडला व लढाईस सुरुवात झाली.[३] भदावरच्या राजघराण्यांत भाऊबंदकी होती त्या भाऊबंदकीनें या वेळीं उचल खाल्ली. अनुरुद्धसिंगाशीं वैर असलेला एक भाऊ मराठ्यास सामील झाला. त्याच्या सांगण्यावरून पेशव्यानें सैन्याचे दोन विभाग केले. एक विभाग राजाच्या मुख्य सैन्याच्या तोंडावर ठेवून दुसऱ्या फौजेनें वळसा घेऊन गोहदच्या बाजूनें अटेर शहरांत प्रवेश केला. शहराचें संरक्षण करण्याकरतां राजा मागें हटला व किल्ल्याच्या आश्रयाला गेला. "किल्ल्यास वेढा देऊन पेशव्यानें एथवर बतंग केलें कीं, राजा सहकुटुंब शरण आला. २० लाख खंडणी व १० हत्ती देण्याचें कबूल केल्यावरून राजास जीवदान देण्यांत आलें." [४]

बाजीराव दक्षिणेंतून निघाला, रोहिल्यांचा जिल्हा काबीज करून ओडशा भदावरपर्यंत पेशव्याची फौज येऊन पोहोंचली, अटेर मराठ्यांनीं मारली ह्या बातम्या ऐकून दिल्ली दरबारास मराठ्याच्या प्रतिकारार्थ हातपाय हालविणें भाग होतें बादशहाकडून अभयसिंग, जयसिंग, सादतखान यांस फाजा घेऊन दिल्लीस येण्याबद्दल फर्मानें पाठविण्यांत आलीं. यावरून जयसिंग पंधरा हजार फौज व तोफखाना घेऊन डेरेदाखल झाला.[५] अभयसिंगानेंहि दहापंधरा हजार फौजेनिशीं कूच केलें. सादतखान यमुनानजीक पोहोंचल्याची बातमी जासुदानें आणली. फौजेच्या दहशतीनें मोगलाकडून आपल्यास फायदेशीर तह घडवून आणण्याच्या विचारानें पेशवा मोहिमेवर निघाला होता. त्यास मोगलांचीं सैन्यें एकत्र होत चाललीं हा प्रकार अनिष्ट वाटला. या सर्व फौजांस एक होण्यास संधी न मिळावी म्हणून बाजीरावानें सटवोजी जाधव, बाजी भिवराव, अडारूचा जमीनदार, मल्हारजी होळकर आदिकरून सरदारांना पांचसात हजारांनिशीं यमुना पार केलें. ही तुकडी दुआबांत शिरून शत्रूचा प्रदेश उध्वस्त करीत आग्र्याचे मार्गें चालूं लागली. फिरोझाबाद, इतिमादपूर लुटून जलेसर येथें मराठे पोहोंचले असतां सादतखानाचे फौजेनें त्यांस गांठलें दिवस उजाडतो तों मोगल मराठ्याची दृष्टादृष्ट झाली. रात्रंदिवस कूच करून इटाव्याहून ८५ मैलाचें अंतर झपाट्यानें कापून सादतखान साठ हजार सैन्यानिशीं मराठ्याचे पाठोपाठ आला. आघाडीस त्याचा पुतण्या मनसूर अलीखान चालत असून त्याजपाशी १२ हजारांची तुकडी होती [६]

आपल्यावर हल्ला करणारें सैन्य आपल्यापेक्षां कमती आहे या विचारानें मराठ्यांनीं नेहमींच्या सरावाप्रमाणें मोगलांस वेढण्यास सुरुवात केली. मनसूर अलीखानाची तुकडी हीच मोगलाची सारी फौज अशा गैरसमजुतीनें मराठ्यांनीं हल्ला

---

३ पे. द नि का. १५ ४७ ४ पे द. नि. का. १५. १८. ५ पे. द. नि. का १५. १८. ६ Elliot & Dowson, p. 59

चढविला. मनसूर अलीखान लढाई देत, सादतखानाचें पन्नास हजारावर सैन्य पिछाडीस होतें त्या बाजूस हटला. मराठे आपल्या तावडींत आले आहेत हें दृष्टीस पडतांच मोगलांनीं जोरानें चाल केली. " मराठयांची फौज कोती, युद्ध न होतां मोगलांची दाटी देखोन मराठे पळून यमुना तीरास आले. उतार सांपडला नाहीं यामुळें कित्येक राऊत बुडाले व कित्येक पळून लष्करास आले."[७] या युद्धाचा वृत्तान्त फुगवून आपण मोठी लढाई मारली असें बहुत शोखीचें वर्तमान सादत-खानानें बादशहास कळविलें; पण वास्तविक ही लढाई म्हणजे मराठी सैन्याच्या लहानशा तुकडीशीं झालेली चकमक होय. आपल्या पांचपट भारी शत्रुसैन्य आहे हें लक्षांत येतांच मराठे राउतांनी " वाट फुटेना जाणोन यमुनेंत घोडी घातली तेव्हां मोगलांनी दाटी करून ऐशीं माणूस मारलें. से दोनसें जखमी झाले. पाचसे माणूस व घोडी लहान थोर, यारदी दोन चारशें नेली. नदींत कत्येक माणसें व घोडी बुडाली."[८] वरकड फौज सुरक्षित पेशव्याजवळ येऊन पोहोंचली. मोगलांच्या नेह-मींच्या ढिलाईच्या स्वभावावरून सादतखान सर्व सैन्यासह इतक्या थोडक्या वेळांत ८५ मैलांची मजल मारील ही कल्पना नसल्यामुळें मराठे सादतखानासंबंधीं बेफिकीर राहिले आपली चूक दृष्टीस पडतांच त्यांनीं पाय काढता घेतला. मराठ्यांचें खरें नुकसान झालें तें उतार न सांपडल्यामुळें. बहुतेक सैन्य सुरक्षित परतीरीं आलें. कांहीं राऊत मात्र या पळापळींत मारले गेले.

निजामच्या दरबारीं सविस्तर हकीकतीचें सावकारी पत्र आलें. त्यांत " मजकूर श्रीमंत राजश्री यजमान स्वामी आगरेयानजीक आठ कोस फौजेसह वर्तमान आहेत. राजश्री पिलाजी जाधवराऊ व मलारजी होळकर व राणोजी शिंदे व हुजरात येसिसी फौज दहा बारा हजार निवडोन यमुनेपार हत्तीवर जीन घालून घोडी तरोन पार गेले आणि दोन शहरें उत्तम लुटलीं. तेथून सादतखान चौ पाचा कोसावर सनिधच होते. त्यास फौजेचें वर्तमान श्रुत जालें कीं गनीम समीप आले. त्याउपरी त्याकडील मशारनिलेचा भाचा मनसूर अलीखान पंधरा हजार बल्की वीस हजार फौजेनसीं याजवर आले. त्यास मराठी फौज तमाम बेफाम होती, परंतु सरदार सावध होऊन कोणी जीन ठेविलें, कोणी ठेवीत होते, सों मोंगलासी गांठ पडली युद्ध उत्तम रीतीनें जालें. तांब्राचे दात खटे केले. युद्धांत माणूस उभयपक्षीं हजार बाराशें पडिले कोणी जखमी कोणी ठार झाले. मागती सरदार तमाम सावरोन फौजेसमेत येमुना उतरोन श्रीमंताजवळ आले. त्या उपरी बुनगे निवडून बुंधेल्याचे पांचशे स्वार बराबर देऊन माळव्यात लाविले. सुरजेस दाखल जाले. श्रीमंत स्वारी सडी फौज पनास हजारा-नसीं आगरेयानजीक आठा कोसांवर आहेत. सलाबत तांब्रावर गालब आहे.

---

७ पे द नि. का. १५. २७. ८ पे. द. नि. का. १५. १७.

जयसिंग अभेसिंग वगैरे राजपूत आग्रेयानजीक आले आहेत. खानदौरा सादतखान वगैरे आग्र्यास दाखल जाले ऐसे वर्तमान आहे. मुख्य गोष्टी येमुनापारची लढाई दग्याची झाली. परंतु श्रीनें तमाम सरदार व मातबर माणूस तेवढें सलाबत माघारे आणिलें. लहान सहान लुटारे जाया झाले."

मराठे नदी उतरून पेशव्यास येऊन मिळाले. त्यांच्या पाठोपाठ नावांचा पूल बांधून सामानानिशीं आग्र्यानजीक सादतखान उतरला व वजीर, मीरबक्षी यांची फौज आली कीं, मराठ्यांच्या पाठलागास सुरुवात करावयाची असा बेत करून तो आग्र्यावर राहिला दुआबांत धुमाकूळ माजवून शत्रूचें लक्ष दुसरीकडे वेधून ठेवण्याचा पेशव्याचा पहिला प्रयत्न सपशेल फसला तेव्हां नवीन डावपेंच आखणें जरूर झालें सैन्य सावरून बाजीराव आग्र्याच्या मुलखांतून अलीकडे सरला व त्यानें जड सामान बाजारबुणगे बुंदेलखंडांत रवाना केलें. पेशव्याच्या हालचालीचें मर्म लक्षांत न आल्यामुळें 'मराठी फाजानीं सलाबत खाल्ली, मराठ्यांचा शह मोंगली फौजावर बसत नाहीं' अशा सूमका उठल्या माळवा बुंदेलखंड महालातील जमीनदारानीं उचल खाल्ली व ते सर्वजण तरतेंबुडतें पाहूं लागले.

सादतखानास सामील होण्याकरतां वजीर कमरुद्दीनखान व मीरबक्षी खानडौरान यांच्या हाताखालीं फौजा रवाना झाल्याची बातमी पेशव्याकडे होतीच या सर्व फौजा एकत्र होण्यापूर्वीं सादतखानाच्या सैन्याचा फन्ना उडविला तर मोंगल दरबारची धडपड तावडतोब बंद होईल हें बाजीरावास दिसत होतें, पण हें व्हावें कसें? "सादतखानानें आग्र्याचा आश्रा केलेला; तेथें जाऊन युद्ध करावें तरी तो आश्रिचाचा असतां मोडेल न मोडेल कळतच आहे. जरी गभीर यमुनेच्या संगमी दिल धरून राहावें तरी ते जागा जबून, कोतरखळ्या फार, खानडौरान व बंगष वगैरे दिल्लीहून आग्र्यास येत होते व एक झाल्यास मनसबा भारी पडेल, याकरतां संगमीं राहाणें उत्तम नव्हे. दुसरे सादतखानानी पादशाहास व अमिरास लिहून पाठविलें मराठ्यांची फौज यमुना उतरून आली होती ती बुडविली दोन हजार स्वार मारले व दोन हजार नदींत बुडाले. मल्हारजी होळकर व बुळे कामास आले. बाजीराव याची धाड आली होती तिची गत हे झाली. त्याचे फौजेंत बाकी राहिली नाहीं. आपण यमुना उतरून मराठे बुडवून चंबेलपार करतो. पादशाहानी खुशाली करून सादतखानास वस्त्रें व मोत्यांची माळ व शिरपांव पाठविला. मोंगली कारभार करावे थोडे, लिहावे फार, पादशाहास सत्य कळणें जरूर जाणून दोन विचार केले. सादतखानास बुडवावे किंवा दिल्लीस जाऊन पुरे जाळावे. सादतखान आग्रा सोडीनासे देखोन पेशव्यानें दिल्लीस जावयाचा निश्चय केला."

मोंगलांचीं दोन मोठालीं सैन्यें दिल्लीहून निघून आग्र्याच्या दिशेनें कूच करीत होतीं. दिल्लीच्या आसपास या फौजा फिरकत असतां राजधानीवर चालून जाणें

म्हणजे अचाट साहस होतें. यशस्वी झाल्यास बादशाहाकडून मराठ्यांच्या अटी ताबड-तोब मान्य होतील हें उघडच होतें. पण मार्गातील अडचणी केवळ दुर्लंघनीय होत्या. कच्च्या दिलाचा सेनापति असता तर त्यानें या वेळीं माघार घेतली असती आणि ऐन प्रसंगीं पिछेहाट झाली म्हणजे माळवा बुंदेलखंडांत प्रस्थापित होत चाललेल्या मराठी सत्तेस जबरदस्त धक्का बसला असता. सादतखानानें मराठी सैन्याचा पाडाव केला इत्यादि बातम्या चहूंकडे फैलावतांच ठिकठिकाणच्या जमीनदारांनीं दुंडी आरं-भिली. गेल्या पधरा वर्षांच्या स्वाऱ्या यशस्वी झाल्यामुळें मोगल सन्यांत एक प्रकारचें भय, शैथिल्य उत्पन्न होऊन मराठे अजिंक्य आहेत ही कल्पना दृढ होत चालल होती आपण जिकडे जाऊं तिकडे यश प्राप्त होणार या आत्मविश्वासानें बेडरपणें मराठ्यांनीं उत्तरेकडे हदोस मांडला. आतांपर्यंत त्यांच्याविरुद्ध रवाना झालेले सेनापती नुसत्या दहशतीनेंच कच खाऊन माघारा गेले. यशासारखा यशदाता नाहीं. जय-अपजय हा संख्याबल, तोफखाना, सेनापतीचे कुशल डावपेंच यांवर जितका अवलंबून असतो तितकाच सैन्यांतील लोकांचा हुरूप कायम टिकविण्यावर अवलंबून असतो. मोंगल सैन्यावर मात न करतां माघार घेतली तर मोंगल आपल्या पाठीवर येणार हें जाणून पेशव्यानें कल्पनातीत धाडस करून दाखविण्याचें ठरविलें हें धाडस उत्तम रीतीनें पार पाडण्याकरितां शत्रुसैन्याच्या हालचालींची खिनबातमी ठेवून स्वतःच्या हालचाली मात्र अत्यंत गुप्त ठेवणें जरूर होतें बहिरबुणगे व तोफांचें लटांबर बरोबर असल्यास वेगानें कूच करण्याच्या मार्गांत अडथळा होईल म्हणून त्यांची रवानगी बुंदेलखंडांत करण्यांत आली[१] व स्वतः पेशवा इतक्या निसूटपणें दिल्लीवर चालून गेला कीं, आपल्याजवळून मराठ्यांची फौज कूच करीत आहे हें खुद्द वजिरास कळलें नाहीं. आग्र्यासंनिधच्या मोंगल सेनापतींची हीच गत त्यांची अद्याप समजूत होती कीं, मराठ्यांनीं सलाबत खादली, आतां फक्त त्यांना चमेलपार घालवून द्यावयाचें म्हणजे आपली कामगिरी झाली. मोंगल सैन्यें हमरस्त्यानें आग्र्या-जवळून येत चालली होतीं. दिल्लीवर चालून जावयास एकच मार्ग मोकळा होता व तो म्हणजे या सैन्यास बगल देऊन पश्चिमेच्या बाजूनें कूच करावयाचें हा. दिल्लीपासून आग्रा सवाशें मैल व आग्र्यापासून कांहीं मल खालीं पेशव्याचा मुक्काम होता. दिल्ली गाठण्याकरितां राजरस्ता सोडून मेवातच्या डोंगरी मुलखांतून मोंगल सैन्यास सुगावा न देतां झपाट्यानें मराठ्यांनीं २०० मलांचें कूच आरंभिलें

पेशव्याच्या हालचाली पेशव्याच्या शब्दांतच देणें योग्य होईल. तो लिहितो, "पुरें जाळावे व मराठे आहेत असें बादशहास दाखवावें असा विचार करून २६ जिल्कादीं ( १८-३-१७३७ ) कूच करून पादशाही रस्ता सोडून लांब लांब

१ पे द. नि का. १५ २४, ३८.

मजला मारून बदनसिंग चुडामण जाट यांचे मुलखांतून मेवातियाचे सरहद्दीने डोंगर किनाऱ्यानें चाललो. खानडौरान व बंगष आग्न्यास गेले. यांची व सादतखानाची भेट छ २ जिल्हेजीं ( २३ ३. ३७ ) झाली. धोंडोपंत खानडौरापाशीं होते. त्यास सादतखानानें खानडौरास सांगून पाठविलें की, बाजीरावाची फौज मोडली ते खासा चमेल उतरून गेले आतां त्यांची खुशामत करण्याची जरूर नाहीं वकिलास निरोप द्यावा. त्यावरून धोंडो गोविंद यांसीं निरोप दिला. आम्हाजवळ आले जवळून कमरदीखान याची फौज गेली पण आम्ही त्यासी गाठ न घातली वीस वीस कोसांच्या मजला मारून छ ७ जिल्हेजी ( २८ ३.१७३७ ) दिल्लीस बारापुला व कालिकेचे देऊळ उजवे टाकून कुशबंदी नजीक शहर एथें मुकाम केला. पुरे जाळून खाक करावें तर दिल्ली महास्थळ. पातशहा बरबाद झाल्यास फायदा नाहीं. दुसरे पादशहाचे व खानडौरानचे चित्तांत सलुख राखावयाचा आहे. मोगल त्यास सलुख करूं देत नाहीं व अमर्यादा केल्यास राजकारणाचा दोरा तुटतो. याकरतां आगी लावावयाचे तहकूब करून पातशाहास व राजे बखतमल यास पत्रें पाठविलीं शहरांतून दोन हत्ती व घोडी, उटे आलीं होतीं तीं सांपडली लष्करचे लोकांनीं शहरचे लोक भवानीचे यात्रेस बाहेर आले होते त्यास झाबडाझांबड केलें दुसरे दिवशीं बुधवारीं पातशाहाचे आज्ञेनें राजे बखतमल यांणीं उत्तर पाठविलें कीं धोंडोपंतास पाठविणें. त्यावरून मशारनिल्हेस पाठवाव तरा आम्हीं शहराजवळ आलो. दिल्लींत गलबला झाला यास्तव ( धोंडोपंतास दगा होईल या भीतीनें ) पाठविलें नाहीं उत्तर पाठविलें भला मजुरा व स्वार पाठवून देणें मशारनिल्हेस पाठवून देतो. आम्हीं शहरानजीक राहिल्यानें शहरास उपसर्ग लागेल या करतां कूच करून झीलच्या तलावाचर जातो म्हणून उत्तर पाठवून आम्ही कूच केलें. "[१०]

दोन प्रचंड फौजा पाठविल्या असूनहि मराठे दिल्लीनजीक येऊन पोहोंचले यावरून मराठ्यांनीं आपल्या सैन्याचा फन्ना उडविला, आतां दिल्ली सोडून यमुनापार तरी व्हावें किंवा पेशवा सांगेल त्या अटी कबूल करून तह करावा हे दोनच मार्ग बादशहास उरले. दरबारांत तर अप्रबुद्ध, अविचारी, पोरकट सरदारांचा भरणा प्रत्येकानें आपापल्या मगदुराप्रमाणें मार्ग सुचविला. शेवटीं तोफखान्याचा मुख्य मीर आतष सादुद्दीन याच्या म्हणण्याप्रमाणें दिल्ली लढविण्याचें ठरलें. खुद्द दिल्लींत दहा हजार स्वार व वीस हजार हशम व बराच तोफखाना होता. किल्ल्याच्या संरक्षणार्थ तोफखाना व तीन हजार लोक ठेवून राहिलेल्या सैन्यानें मराठ्यांवर चालून जावें असें निश्चित झालें. अमीरखानाकडे या सैन्याचें आधिपत्य असून त्याच्या मदतीस सादुद्दीननें आपला तोफखाना दिला. अमीरखानच्या हाताखालीं आघरखान

---

१० ब्रं. च. २७.

मुबारीकखान, हसनखान कोका इत्यादि सरदार असून अवेरच्या पलटणांतील राजा शिवसिंग पाचशें व राजा अजमेरसिंग तीनशें लोकांनिशी सामील झाले. किल्ला व बादशहाचे संरक्षणाचें काम सादुद्दीन खाजकडे सोंपविण्यांत आलें.[११]

रात्र पडतांच अमीरखान सैन्यानिशीं मिस्रीखानच्या फाटकांतून बाहेर पडला. तेथें आघरखान, मुबारीकखान अमीरखानास येऊन मिळाले. तिघांनीं विचार करून युद्धाचे बेत ठरविले व त्यांस अनुसरून मराठ्यांच्या तोंडावर शहरानजीक तल्कटोऱ्यालगत खंदक खणून भोंवतीं आराबा मांडून मोगल सैन्य मराठ्यांचा हल्ला येण्याची वाट पाहात आवळून बसलें. इतकी तयारी होते तो दिवस उजाडला. पण शत्रूचा ठावठिकाणा नव्हता. मोगल सभोंवताले आराबा पसरून बसल्यामुळें मराठी पथकास थडक देतां येईना वजीर कमरुद्दीन फौज घेऊन त्वरेनें परत येत आहे अशा बातम्या मराठ्यांच्या लष्करांत दरक्षणीं पोहोंचत होत्या. दिल्लीवर दौड मारल्याचें साहस निरर्थक होणार असा समय प्राप्त झाला असतां एक अनपेक्षित घटना घडून आल्यामुळें मराठी राउतांना मोंगल सैन्यास आपल्या भाल्याचें पाणी पाजण्याची संधि प्राप्त झाली.

मोंगल सैन्यांत अलीकडे मोठमोठ्या मानाच्या पण जबाबदारीच्या जागा अनुभव-श्रेष्ठांना न देतां कुलश्रेष्ठांना देण्याचा प्रघात पडला होता. रस्त्यांत होणाऱ्या कला-गतींपेक्षां जास्त युद्धाचें ज्ञान नाहीं, अशा पोरसवदा अमीरउमरावांच्या नातलगांना मोठमोठ्या मनसबा बहाल करण्यात आल्या होत्या व असल्या वाचाळ आत्मप्रौढी गाजविणाऱ्या कित्येक वीरांचा मोगल सैन्यांत भरणा झाला होता. मराठे अंगावर चालून येत नाहींत, त्यांनीं दशहत खाल्ली आहे, अशा वेळीं जोरानें हल्ला चढविल्यास हे दख्ख-नचे भुरटे दहा दिशांनीं पळत सुटतील अशा घमेंडींत मीर हसनखान कोका व त्या-बरोबरचे दुसरे उमराव आपल्या फौजेनिशीं आरोळ्या देत मराठ्यांवर चालून गेले. त्यांना तोफांच्या माऱ्यापलीकडे ओढण्याकरतां सटवोजी जाधव मागें सरला, तसा मोगली स्वारांना जास्तच चेव चढला. त्यांना तिन्ही बाजूनीं घेरून मोगल पूर्णपणें आपल्या तावडींत आले आहेत असें दिसतांच बाजीरावानें चाल केली आणि शेतकरी कणसें कापतो त्याप्रमाणें मोंगलांच्या फौजेची कत्तल सुरू झाली.[१२]

"राजश्री सटवोजी जाधव पुढे गेले व त्यांची मोगलांची गांठ पडली झटापट होत होती मशारनिल्हेनीं आम्हास सांगोन पाठविलें त्याजवरून राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे व राजश्री तुकोजी पवार व जिवाजी पवार व यशवंतराव पवार व मानाजी पायगुडे व गोविंद हरि पाठविले. त्याचें याचें झुज होऊन मोगल मोडिले. राजे शिवसिंग वगैरे दहाबारा दरबारी ठार झाले. नबाब मीरहसनखान

---

११ Irvine. १२ ब्र. च २७; सियारुल् मुताखरीन्.

कोका जखमी झाला. दिगरबंदे चौकी पादशाहाचे अडीच तीनशें मेले, चारशें माणूस जखमी झाले रोज अफझूखान व अमीरखान व मुजफरखान वगैरे शहरांत पळून गेले. दोन हजार घोडा पाडाव झाला. पांच सहा हजार पळोन गेले राजेश्री राणोजी शिंदे याजकडील इंद्राजी कदम यासी बोटास गोळी लागून दोन बोटें उडून गेलीं. वरकड नामांकित माणूस फार कोणी ठार झालें नाहीं. घोडे, माणूस जखमी झालें म्हणून झीलच्या तळावर मुक्काम केला."[१३]

मोंगल सैन्याची पळापळ सुरू झाली निम्याहून अधिक लोक गारद झाले ही बातमी कळतांच शहरवासियांचा तर थरकापच उडाला. सर्व शहरभर विषण्णतेचें व भीतीचें वातावरण पसरलें. मध्यरात्रीपासून बादशाहा दिवाण-इ-खासमध्यें मोठ्या काळजींत दरबारच्या लोकांशीं वाटाघाट करीत बसला होता जखमी व गारद झाल्याचे मुर्दे शहरांत येऊं लागताच शहर फुटण्यास सुरुवात झाली. मालछा[१४] टेकडीजवळ छावणी असलेल्या गनिमाच्या सैन्यास आतां शहरांत प्रवेश करण्यास कोणाचाच प्रतिबंध राहिला नाहीं

पण बाजीरावाचें उद्दिष्ट सिद्धीस गेलें होतें. " मराठ्यांची धाड होती ती परतली त्याचे फौजेंत काहीं बाकी राहिली नाहीं. मराठे बुडवून चमेली पार करतों, " इत्यादि वायफट गप्पा सादतखानानें लिहून पाठविल्या त्या पेशव्यानें मिथ्या करून दाखविल्या मराठे आहेत, ज्या तुराणी पक्षाच्या सामर्थ्यावर विसंबून बादशहानें समेट फिरविला, त्या तुराणी पक्षाचें सामर्थ्य मराठ्यांपासून दिल्लीचें संरक्षण करण्यास असमर्थ आहे हें बादशहास पटवून देण्याकरितां पेशव्यानें राजधानीवर कूच केलें बाजीरावानें केलेलें हें साहस उत्तम रीतीनें यशस्वी होऊन राजधानीचें शहर मराठ्यांच्या तलवारीस बळी पडणार असा सर्वांचा अंदाज झाला पण पेशव्यास हजारों निरपराधी पौरजनांची कत्तल उडवून चंगीझखान किंवा तैमूरसारखा मनुष्य-जातीचा संहारक असा दुर्लौकिक मिळवावयाचा नव्हता. " दिल्ली पुरातन जागा, पादशहाचे व खानडौराचे चित्तांत सलूख करावयाचा आहे मोगल त्यांस सलूख करून देत नाहींत. एवढ्याचकरितां राजधानीनजीक येऊन पेशवा उपस्थित झाला " मराठ्यांच्या प्रभावाची चुणुक पादशाहास आपल्या अटी कबूल करावयास लावील हा पेशव्याचा कयास फारसा चुकीचा नव्हता. विजेसारखा दिल्लीनजीक चमकून विद्युल्लतेप्रमाणेंच बाजीराव अंतर्धान पावला.

बाजीरावास दिल्ली सोडून तांतडीनें निघून जाण्यास दुसरेंहि बलवत्तर कारण होतें आग्र्याच्या रोखें वजीर कमरुद्दीनखान कूच करीत असतां मराठे दिल्लीवर चालून

---

१३ ब्र. च. २७. १४ शहरतटापासून ४ मैल, राजवाड्यापासून ८ मैल.

गेले ही बातमी त्यास कमानपहारी[१५] येथें कळली तसा राजधानीच्या रक्षणार्थ तो टाकोटाक धावून निघाला. वजिराची फौज जवळ येत चालली हें वृत्त जासुदांनीं आणलें. त्याबरोबर एकहि क्षण न गमावितां पेशव्यानें मागें हटण्याचें ठरविलें बुधवारीं दुपारींच मराठ्यांनीं तळ सोडला संध्याकाळच्या सुमारास सोळा मैलांचें कूच करून मराठे राऊत बादशहापुराजवळ येतात तों वजिराची फौ त्याच्या नजरेस पडली. दिल्लीस एक लढाई देऊन त्यानंतर १६ मैलांची मजल मारल्यामुळें मराठे अगदी थकून गेले होते. होतां होईल तों मोगल सैन्यास टाळा देऊन निघून जाणें त्यांना श्रेयस्कर होतें दिवसभर कडक उन्हांत डोंगराळ प्रदेशांतून कूच झाल्यामुळें वजिरासहि युद्धाची खुमखुमी नव्हती. शिवाय त्याचा तोफखाना जिनसी व जिमीशिमी फौज मागाहून येत होती. वजिराच्या आघाडीच्या तुकडीशी झटापट होऊन एक हत्ती पवार यांजकडे आला व कांहीं घोडीं लष्करच्या लोकांनीं घेतलीं. दोन्ही पक्षांकडील पांचपंचवीस जखमी होताच अंधारांत डावीकडे सरकून चहूं कोसांवर पेशव्यानें मुकाम केला.[१६]

पण या सर्व हालचालींचा जनक सादतखान या वेळीं काय करीत होता? यमुना उतरून १६ मार्चला सादतखान आग्र्याजवळ येऊन पोहोंचल्याचें मागें लिहिलें आहे. तेथें २३ मार्चला खानडौरानचें आगमन होऊन मराठ्यांची खुशामत करण्याचें कारण नाहीं म्हणून सादतखानाच्या सांगण्यावरून पेशव्याच्या वकिलास निरोप देण्यांत आला व पुढील मसलतीच्या तजविजीस सादतखान व खानडौरान लागले. प्राप्त झालेल्या विजयानें बेहोष होऊन मोगल सेनापती पेशव्याच्या हालचालींसंबंधीं बेसावध राहिले दुआबांतील मराठ्यांची फौज बुडविल्यामुळें बाजीराव मागें हटल्याची बातमी मोगलांकडे होतीच. त्यांत वर्तमान आलें कीं तोफखाना व बुणगे पेशव्यानें बुंदेलखंडाकडे लावून दिलें आहे. साहजिकच या उमरावांची समजत झाली कीं, मराठ्यांचा रेच उतरला, मराठे परत चालले. या आनंदोत्सवाप्रीत्यर्थ खानडौराननें सादतखानास जियाफतीस बोलाविलें. २९ मार्चच्या संध्याकाळीं मुसलमान उमराव खान्यास बसले असतां जासुदानीं वृत्त आणलें कीं, पेशव्याचें लष्कर दिल्लीजवळ जाऊन पोहोंचलें व मराठे दिल्ली जाळणार. ही खबर ऐकतांच मोगल सैन्यांत एकच गोंधळ उडाला. तावडतोब छावणी मोडून दिल्लीरोखें सादतखान व खानडौरान पंचवीस हजार फौजेनिशीं निघाले. मंगळवारीं होडलास मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं आलावर्दीच्या नाल्यावर त्यांचा मुक्काम झाला. गुरुवारीं प्रातःकाळीं खानडौरा व सादतखान, वजीर, बंगष सारे एक होणार तों पेशवा केव्हांच मोगलांच्या टप्प्याबाहेर रेवाडीकोटपुतळीपर्यंत जाऊन पोहोंचला होता.

---

१५ Elliot and Dowson. कमानपहारी दिल्लीपासून ६०-६५ मैल. १६ ब्र. च. २७.

सुरुवातीपासून समेट करण्यास बादशाहा उत्सुक असतां समेटाची भाषा झिडकारून युद्धाचें आव्हान देण्यांत सादतखानानें पुढाकार घेतला होता. जयसिंग व पेशवा समानधर्मी, पेशव्यास मिळून पादशाहीचें अहित करू पाहणाऱ्या या जयसिंगास बादशाहानें विश्वासांत घेऊं नये, त्याजकडील आग्रे माळवा मजकडे द्यावे म्हणजे मराठ्यांचा मी तात्काळ बदोबस्त करतों, अशा वल्गना कित्येक वेळां सादतखानानें दरबारांत केल्या होत्या. पेशवा उत्तरेस निघाला आहे, सर्वांनीं आपापल्या जागीं तयारीनें राहावें, पण प्रसंग निकरावर जाऊं देऊं नये,[१७] अशी ताकीद असतां बादशाही हुकुमाची वाट न पाहता सादतखानानें मराठ्याच्या दुआबांतील तुकडीवर हल्ला चढविला. या हल्ल्यांत सुलभ यश प्राप्त झाल्यामुळें मराठ्यांच्या सामर्थ्याचा चुकीचा अंदाज करून घेऊन सादतखानानें आपल्या पराक्रमाचें रसभरित वर्णन बादशाहास लिहिलें. हें सर्व खरें भासून बादशाहानें खानास मानाचा खिलत पाठवून मोठा गौरव केला बरोबर चवदा दिवसांनीं ज्या बाजीरावास चंमेलपार करण्याची प्रतिज्ञा सादतखानानें केली होती, तोच दिल्लीवर चालून येतो हें गौडबंगाल पाहून बादशाहा भांबावून गेला. सादतखानावर विसंबून राहिल्यामुळें आपण कोणत्या घोर संकटात सापडलों होतों याची नीट कल्पना आल्यामुळें बादशाहानें सादतखानाची भेट घेण्याचें नाकारलें. इतक्यांत वर्तमान आलें कीं, मराठे पुनः दुआबांत शिरले आहेत [१८] ही बातमी कळतांच आपल्या मुलखाच्या संरक्षणार्थ सादतखान निघून गेला बंगषास आग्र्याच्या संरक्षणार्थ पाठविण्यांत येऊन अभयसिंगास रजा देण्यांत आली ऐन उन्हाळा कडकला असल्यामुळें बजावली इतकी कामगिरी कमालीची झाली असें समजून खानडौरान व वजीर आपल्या हवेलींत गेले.

सवाई जैसिंगाची तिसरीच तऱ्हा होती बादशाहाकडून फर्मान येतांच पंधरा हजार फौज व तोफखाना घेऊन जयसिंग जयपूर दिल्लीच्या मार्गावर रेंगाळत होता. दिल्लीहून परतलेलें मराठे सैन्य रेवाडी, कोटपुतळी, मनोहरपूर, लालसोट[१९] या मार्गें चाललें असतां मराठ्यास थोपवून धरण्याचें जैसिंग मनात आणता तर इतकें सैन्य पुरेसें होतें. एकतर मराठे सडे असून गेले पंधरा दिवस अविश्रांत श्रम केल्यामुळें त्यांच्यात लढण्याची ताकद उरली नव्हती जयसिंगाजवळ भरपूर सामग्री असून गरज लागेल तेव्हां हाकेसरशी हजारों रजपूताच्या रूपानें ती त्याच्या साह्यास धाऊन येणारी होती. स्वगृहापासून मराठे दूर गेले असून युद्धारंभाच्या पायापासूनहि (line of operations) त्यांचा संबंध पार तुटला होता. सारांश, जयसिंग ठासून एव्हां युद्धास उभा राहता तर मराठ्यांची धडगत नव्हती पण जयसिंगाच्या अंतःकरणांत मोंगल सिंहासनाबद्दल आदर उरला नव्हता.

---

१७ Elliot and Dowson ( तारीख-इ-हिंदी ); पे. द. नि. का. १५.
१८ पे. द. नि. का. १५. २०, २२, २४. १९ अ. च.

मोंगलापेक्षां मराठ्यांकडे त्याचा जास्त ओढा. मराठ्यांच्या साहाय्यानें दिल्ली दरबारांत आपलें वर्चस्व कायम ठेवण्याकडे त्याची दृष्टि व त्यास अनुसरून त्यानें आपलें धोरण ठेवलें होतें. बादशाही मुलखापैकीं मराठ्यांनी माळवा घेतला काय किंवा बुंदेलखंड काबीज केलें काय याची त्याला कदर नव्हती १७३२ पासून मराठ्यांस माळव्याची खंडणी देऊन त्यानें संतुष्ट राखलें होतें, आणि गेल्या वर्षीं तर त्यानें पेशव्याची माळव्यावर नायब सुभा म्हणून नेमणूक केली. स्वतःचा मुलूख सुरक्षित राहावा याची त्याला विवंचना. इकडे बादशाही उमराव मोठमोठीं सैन्यें घेऊन राजधानीच्या संरक्षणार्थ धाऊन जातात, तेव्हां साम्राज्याचा आधार समजला जाणारा हा पुढारी वेंकाजीरामामार्फत सलुखाच्या गोष्टी बोलतो. वेंकाजीराम ता. ७ एप्रिल १७३७ ला जैसिंगाच्या लष्करांतून लिहितो—" भाऊपणा राखिला येसे सवाईजीस भासून परम संतोष मानला आपणांस बोलावून बहुत संतोषाच्या गोष्टी सांगितल्या जे, राजश्री आपणासी भाऊपणा आणि माया बहुत राखितात. स्वामींचे आपण सेवक आहोत, मुलुख त्यांचा आपण त्यांचे. "[२०] सवाईजीपासून कोणत्याहि प्रकारचा उपसर्ग न लागतां पेशवा भदावर प्रांतें जाऊन पोहोंचला.

मराठ्यांचें पारपत्य करावयाचें ह्या निश्चयानें सादतखान पन्नास हजार, खानडौरा पंचवीस हजार, अभयसिंग पंधरा हजार, कमरुद्दीखान वीस हजार यांप्रमाणें मोगलाचें लाखावर सैन्य जमा झालें होतें. या सैन्याजवळ उत्कृष्ट तोफखाना व भरपूर खजिना होता. पण कुशल सेनानायकाच्या अभावीं ही सर्व तयारी कवडीमोल ठरली. कुशल डावपेंच खेळून केवळ साऱ्या दहा दिवसांत मेवातच्या डोंगराळ मुलखांतून २०० मैलांची दौड मारून पेशव्यानें मोगलांवर मात केली मोगलांच्या तांडया फौजेशीं युद्धाची वेळ न आणतां केवळ चपळाईच्या धांवपळीनें त्यास हैराणगत करून सोडलें. १७३७ची मोहीम म्हणजे पेशव्याच्या युद्धकौशल्याची अजब करामत होय. सेनानायकास आवश्यक असणारें साहस, शत्रूची चूक लक्षात आणून त्याचा भरपूर फायदा घेण्याची समयज्ञता, परस्पर सामर्थ्याचा अचूक अंदाज घेऊन शत्रुसामर्थ्य विभागणें इत्यादि गुण आपल्या अंगीं असल्याचें पेशव्यानें या वेळीं दाखविलें.

असो. याप्रमाणें " मोगल्यांची गुंज फुटली. " सादतखान आपल्या प्रांतास निघून गेला. अभयसिंगास रजा देण्यांत आली बादशहाजवळ मराठ्यांस विरोधी कमरुद्दीनखान काय तो राहिला; पण जयसिंग व खानडौरान यांच्या दुकलीपुढें वजिराचें बादशहाजवळ वजन पडण्यासारखें नव्हतें उलट खानडौराननें पेशव्यास खर्चादाखल तेरा लाखाची रक्कम पाठविली. दिल्ली दरबारांतील वातावरण निवळत जाऊन तें पेशव्याच्या माळव्याच्या मागणीस अत्यंत अनुकूल बनत चाललें.

---

२० पे. द. का १५, २३.

# प्रकरण सहावें

# भोपाळचें युद्ध व निजामाचा पाडाव

( १७३७–१७३८ )

मोगलांची जूट फुटून पेशव्यास माळव्याच्या सनदा प्राप्त होणार असा समय आला असतां एका अनपेक्षित घटनेमुळें कांहीं काळ पेशव्याचा माळव्यांतील अंमल समूळ उठतो कीं काय असा भास झाला. ही घटना म्हणजे निजामाचें बादशहाच्या साहाय्यार्थ उत्तरेकडे प्रयाण निजाम व दिल्ली दरबार एकत्र होऊन त्यांनीं मराठ्यांचा प्रतिकार करण्याचें योजिलें; पण पेशव्याच्या शौर्यधडाडीपुढें हा प्रतिकार निष्फळ ठरून माळवा कायमचा मराठ्यांस प्राप्त झाला.

१७२९ त बुंदेलखंडांत मराठी सत्तेचा शिरकाव झाला बुंदेले मराठ्यांचे स्नेही होऊन अनेक लढायांत त्यांनीं मराठ्यांस मोगलांविरुद्ध साहाय्य केलें. त्याचप्रमाणें गेलीं पंधरा वर्षें माळव्यांत मराठ्यांनीं धुमाकूळ मांडलेला आणि आतां माळवा पूर्णपणें मराठ्यांच्या पचनीं पडणार व आपले हातपाय चोहों बाजूनीं जखडले जाणार हें स्वस्थ पाहात बसणें निजामास आत्मघातकीपणाचें होतें. मराठेनिजामांचें वैर आजकालचें नसून कित्येक वर्षें दोघांमध्यें द्वेषाग्नि धुमसत होता दोघेहि समबल असल्यामुळें तिसऱ्याच्या मदतीशिवाय आपल्या प्रतिपक्षास उखडणें एकालाहि शक्य नव्हतें १७१५ त दक्षिणच्या सुभ्यावर असतांना निजामानें मराठ्यांविरुद्ध जोराचा उठाव करून मराठ्यांस रेटावयास आरंभ केला पण मध्यंतरीं निजाम बदलून हुसेनअलीची नेमणूक झाल्यामुळें मराठ्यांचा बचाव झाला पादशहावर सलाबत राखण्याकरतां सय्यदबंधूंस साहाय्यकाची आवश्यकता होती. मराठ्यांच्या मदतीची आशा असल्यामुळें हुसेनअलीनें त्यांच्याशीं समेटाचें धोरण राखलें व शाहूच्या मागण्या मान्य करून ही मदत मिळविली १७२० मध्यें निजाम पुन. दक्षिणेंत उतरला. स्वत चें आसन स्थिर नसल्यामुळें या वेळीं मराठ्यांची कुरापत काढण्याचें धैर्य त्यास झालें नाहीं. दिलावरखान व आलमअली यांचा पाडाव करून कर्नाटकची मोहीम आटपून निजाम वर येतो तों दिल्लीच्या कारभारांत उलथापालथ होऊन आपले विरोधी सय्यदबंधू यांचा समूळ नाश झाल्याचें त्यास समजलें. वजिरीवर नेमणूक झाल्यामुळें दक्षणच्या सुभ्याचीं सूत्रें आपल्या दुय्यम अधिकाऱ्याच्या हातीं देऊन निजामानें उत्तरेस प्रयाण केलें.

ही वजिरी निजामास फार दिवस लाभली नाहीं. बादशहाजवळ हलकट लोकांचें वर्चस्व असून बादशहास आपला विश्वास नाहीं असें दिसतांच त्यानें दक्षिणेंत स्वतंत्र कारभार करावयाच्या हेतूनें दिल्ली सोडली व वजिरीस रामराम ठोकला. दरबारांत निजामाचा द्वेष करणारे थोडे नव्हते. त्यांनीं बादशहाकडून दक्षणचा नायब सुभा मुबारीजखान यास हुकूम काढले कीं, निजामास थोपवून त्याचा निकाल लावावा.

शेजारीं दक्षणच्या सुभेदारीकरितां बादशाहाचे दोन उमराव झुंजत होते, अशा वेळीं कांहीं न करतां मजा पहात बसणें मराठ्यांस इष्ट नव्हतें. शत्रुपक्षाला मराठ्यांचें साहाय्य मिळण्याआधींच जादा मुलूख व १७१८तील चौथसरदेशमुखींच्या हक्कांची लालूच दाखवून निजामानें त्यांना स्वपक्षास मिळवून घेतलें व या संयुक्त सैन्यानें १७२४ च्या ऑक्टोबरांत मुबारीजखानाचा पाडाव केला. अशा रीतीनें वेळीं अवेळीं ज्या सत्तेनें मराठ्यांना सतावून सोडलें त्या सत्तेचा जन्म मराठ्यांच्या हातानें झाला. एकमेकांचें मनोगत जाणण्यांत दोन वर्षें निघून गेलीं. दरम्यान मराठेनिजामांनीं कर्नाटकांत संयुक्त स्वारी काढली. पण विशेष लाभ न होतांच मराठ्यांस परतावें लागलें. दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या चौथसरदेशमुखींच्या नावाखालीं मराठ्यांनीं आपल्या मुलखांत धुमाकूळ माजवावा याचें निजामास मोठें वैषम्य वाटे. सरदेशमुखींच्या हक्कांबद्दल निश्चित टापू देण्यास निजाम तयार असता आपल्या अनिरुद्ध संचारास आळा बसेल, म्हणून बाजीराव पेशव्यानें ही मसलत फेंटाळून लावली. तेव्हां निजामानें युद्धाची तयारी चालविली. आपल्या खऱ्या हेतूचा थांग लागूं न देतां मराठ्यांचा खरा अधिपति शाहू कीं संभाजी असा वाद उपस्थित करून मराठे सरदारांचा बुद्धिभेद करण्याचा नबाबानें प्रयत्न केला. बाजीरावाची तडफ व शौर्य यांच्यामुळें निजामानें अति कौशल्यानें रचलेला डाव फुकट गेला. १७२८च्या फेब्रुवारींत पालखेड येथें नबाबास कोंडून मुंगीशेवगांवच्या तहानें त्याच्याकडून दक्षिणच्या चौथसरदेशमुखींची पुनः एकदां कबुली पेशव्यानें वदविली मुंगीशेवगांवचा तह कायमचा टिकणारा नसून क्षणिक विराम होता. या तहानें वादग्रस्त मुद्दे निकालांत निघाले नाहींत निजाममराठ्यांचे संबंधच इतके अस्वाभाविक होते कीं, एकमेकामध्यें स्नेहभाव चिरकाल उत्पन्न होणें म्हणजे शशशृंगाचा उद्भव किंवा वालुकेपासून तैलनिष्पत्ति या कोटींतील ती गोष्ट होती.

पालखेडावर पाडाव झाला म्हणून स्वस्थ बसणारा गडी निजाम नव्हता. यापुढें उघड वैर न दाखवतां साधेल त्या मार्गानें मराठ्यांचें सामर्थ्य खच्ची करावयाचें धोरण त्यानें ठेवलें. या धोरणास अनुसरून १७३० पासून पेशवेसेनापतींची गुजराथबद्दल मोठी चुरस लागून राहिली, तेव्हां पेशव्याविरुद्ध सेनापतीस उचलून धरणें निजामास इष्ट वाटलें. सेनापतिनिजामांचें संगनमत होऊन दोन्ही सैन्यांचा मिलाफ झाल्यास आपणांस आवरणार नाहीं हें ओळखून पेशव्यानें लगट करून सेनापतीवर हल्ला चढविला व त्यास भारतीर्थी पाठविलें (१७३१) मराठ्यांस नामोहरम करण्याची निजामाची मसलत पुन. एकदां नासली. इतकेंच नव्हे तर त्यामुळें पेशव्याचें मराठे दरबारांत वर्चस्व अतोनात वाढलें त्यानंतर आपल्या मुलखाचें संरक्षण करण्याचा वेगळाच मार्ग धूर्त निजामानें शोधून काढला. आपल्या प्रदेशावरील मराठ्यांचें लक्ष कमी व्हावें म्हणून

बाजीरावास निजामानें १७३२च्या डिसेंबरांत भेटीस बोलावून पेशव्यानें उत्तरेकडे लक्ष द्यावें, उत्तरेकडच्या अफाट प्रदेशांत पेशव्याच्या पराक्रमास वाटेल तितका वाव मिळून मराठ्यांस अपरंपार द्रव्यप्राप्ति होईल असा सल्ला दिला व दक्षिणेंत आपण कोणतेंहि कुचोद्य करणार नाहीं अशी हमी दिली. बाजीराव उत्तरेकडच्या राजकारणांत गुरफटला गेला म्हणजे साहजिकच त्याचें आपल्या प्रदेशावरील लक्ष कमी होईल हा तर निजामाचा प्रमुख हेतु. त्याबरोबर उत्तरेकडे मुलुखगिरी करीत असता तद्देशीय सत्ताधीशाशी त्याचा झगडा होऊन मराठ्यांच्या दवेलीस थप्पड बसेल असाहि त्याचा अदाज असल्यास नवल नाहीं. पण बादशाही डळमळीत झालेली, तिच्या हातून मराठे आटोपण्याचें कसें होणार ? दरबारांत सुस्तावलेल्या सरदाराचा भरणा असल्यामुळें युद्धसामग्री, द्रव्यबल, मनुष्यबल, यांत मोगल वरचढ असूनहि मराठ्यांचें पाऊल दररोज पुढें पडत चाललें. उत्तरेकडून मराठ्यांच्या चढाईस पायबंद बसेल या कल्पनेनें निजामानें १७३२ त बाजीरावाशीं सल्ला केला पण दुसऱ्याकरितां तयार केलेल्या जाळ्यांत निजाम स्वत च सापडला. उत्तरेस मार खाऊन मराठे परतले म्हणजे आपण त्यांचा सावकाश समाचार घेऊं अशी सुखस्वप्नें निजामाला पडत असतां इकडे पेशव्यानें खुद्द दिल्लीवर चाल केली व सर्व साम्राज्य हालवून सोडलें.

१७३३–३४ व १७३४–३५ या दोन वर्षांत पेशव्याच्या वतीनें त्याचे सरदार होळकर, शिंदे, पिलाजी जाधवराव यांनी माळवा बुंदेलखंडांत धुमाकूळ घातला. त्याचे उद्योग हाणून पाडण्यास निजामानें शक्य तोंवर यत्न केलेच. १७३५च्या उन्हाळ्यांत पांच हजार स्वार, जेजाला, बाणाचे उंट, कमरुद्दीखानाचे मदतीस पाठवून कमरुद्दीखानास पिलाजी जाधवानें उपसर्ग लावूं नये, म्हणून सुचविण्यास त्यानें कमी केलें नाहीं [१] १७३५च्या नोव्हेंबरांत खुद्द पेशव्याचें उत्तरेस प्रयाण झाल्याचें समजल्यापासून निजामाचें धाबें दणाणलें व पेशव्याच्या हालचालीवर त्यानें सक्त नजर ठेविली. पेशवा जयसिंगास भेटला, जयसिंगामार्फत बादशहाशीं बोलणें सुरू केलें, या बातम्या निजामाच्या दरबारांत पोहोंचत होत्या व त्यांबद्दल त्याची अहोरात्र चर्चा चाले. आपण जो डाव दिल्लीच्याविरुद्ध मराठ्यांशीं खेळलों तोच दिल्लीचे मुत्सद्दी आपल्याविरुद्ध उलटवितील याची निजामाला भीति होती आणि ती भीति खरीहि ठरली. बाजीरावानें ज्या भरमसाट मागण्या १७३६ त केल्या, त्यांत निजामाच्या हितास बाध आणणारी दक्षिणच्या सरदेशपांडेगिरीची बाब दिल्लीच्या मुत्सद्यानीं ताबडतोब मान्य केली.

पण १७३६तील तहाचीं बोलणीं अर्धवटच राहिलीं. निजामानेंहि कर्नाटकची मोहीम करून पुढील युद्धाकरितां द्रव्याची तरतूद केली. आपल्या मागण्यांच्या पाठीशीं शस्त्राचा जोर असल्याशिवाय दिल्लीकडून त्या मान्य होणार नाहीत हें ओळखून

१ भा इ. स म. त्रै. १२.४.

१७३६ च्या हिवाळ्यांत पेशव्यानें पन्नास हजार सैन्यानिशीं उत्तरेकडे चाल केली या वर्षी पेशव्याचें धोरण चढाईचें असून त्यानें भराभर भेलसा, चंदेरी, भदावर हीं ठाणीं सर करून काल्पी गांठली व सादतखानाच्या हालचाली बंद पाडण्यासाठीं खुद्द दिल्लीवर झडप घालून बादशहास भेडसाविलें पेशव्याचें सामर्थ्य खच्ची होण्याऐवजीं उलट बादशाही भक्षण करून पेशवा आपलेंहि जीवित साशंक करणार असें निजामास दिसतांच निजामानें फौजेची कलमजारी सुरू केली. पेशव्याचे प्रगतीस वेळींच पायबंद बसला नाहीं तर मोंगली सत्ता रसातळाला जाऊन स्वतःवर तोच प्रसंग ओढवणार हें पाहून बादशहाशीं संगनमत करून एकजुटीनें पेशव्याचा प्रतिकार करण्याचें त्यानें ठरविलें

सैन्य जमवून बुऱ्हाणपुरावर निजाम मुक्काम देऊन बसला असतां मार्चच्या २१ तारखेस ( १७३७ ) वर्तमान आलें कीं, "सादतखान व राव यांचें युद्ध झालें. गनिमानें शोखी बहुत केली होती त्यास तंबी पोहचविली. दहापाच मातबर सरदार, सिपाई लोक दोनसें, धरून नेले. च्यार पाच हजार घोडीं नेलीं. यमुनेंत लोक बहुतेक बुडाले"[२] "मोगलांचा उत्कर्ष ऐकून नवाबास आवेश चढला. नर्मदेपावेतों जाऊन तिकडील भावगर्भ पुरता मनास आणून जर आपले अटसटियांत गोष्ट आली तर वेळास न चुकावें, खामखां गळा पडावें"[३] असा विचार निजामानें ठरविला व एप्रिलच्या ८ तारखेस "आराबा टाकून सडे फौजेनिशीं* हांडियाच्या घाटें रेवा उतरावयासी गेले" मराठ्यांपासून उपद्रव होऊं नये म्हणून खानदेशांत अबदुल रहिमखान व अनरुलखान पांच हजार स्वारांनिशीं, नसरतजंग लेक औरंगाबादेस पांच हजार स्वारांनिसीं, विजापूर बीड पाथरीच्या प्रदेशावर चंद्रसेन, वऱ्हाडांत रघूजी भोसल्याच्या तोंडावर शुजायतखान असा कडेकोट बंदोबस्त करून निजामानें दक्षिण सोडली. आपल्या हेतूचा संशय येऊं नये म्हणून छत्रपतीस व पेशव्यास "स्नेहवादें कितेक प्रकारें लिहिलें कीं, आपलें शिरीं यागीपणाचा* शह आहे तो खावंदाजवळ फेडावा, म्हणून बादशहाचे भेटीस जात आहों तुमचाआमचा भाऊपणा आहे त्यांत खता† नाहीं"[४] निजामास आतांच उपरति का झाली हें सर्वांनीं जाणलें. देवजी सोमवंशी यांनीं आपल्या पत्रांत चिमाजीआपास सूचना केली कीं, निजामाच्या लिहिण्यावर विश्वास ठेवाल तर फसाल. निजाम उत्तरेकडे चालला आहे त्याला भय आहे कीं, राजश्री पंतप्रधान दिल्लीस जाऊन सार्वभौमाची भेट घेतात, भेटींत सुभ्याची घालमेल होऊन दक्षिणेंत दुसरा सुभा नेमला जाईल मग आपली गत काय होईल? वास्तव तमाम उमरावास व दिल्लीश्वरास पत्रें पाठविलीं कीं दर्शनास येतों. सरकारचा

२ पे. द. नि. का. १५. १७. ३ पे. द. नि. का. १५. २१. * बडखोरीचा. † संशय. ४ पे. द. नि. का. १५. २६.

खजाना आहे, आपण तेथें आल्यावर गनीम मारावयास काय हरकत? निजाम मदतीस आल्यास गनिमास नशियत पोहोंचून आपली सुटका होईल या विचारानें सार्वभौमानें पेशव्याशीं होत असलेला समेट झिडकारून नबाबास मानरोटी पाठविली. बादशाहाकडून इषारा येतांच नबाब तातडीनें दिल्लीचा मार्ग चालूं लागला.

तापी उतरून ता. १९ एप्रिलला नबाब भाऊगडास[५] पोहोंचला. नबाबास सारख्या बातम्या पोहोंचत होत्या कीं, " सादतखान शेर होऊन आगरियासनिध पूल बांधून अलीकडे उतरला, तमाम फौजा येके ठायीं झाल्या."[६] निजामास उज्जनीस पोहोंचण्याची घाई लागली. सर्वांनीं मिळून मराठ्यास ठेचगा देऊन नर्मदापार लावावें हा निजामाचा बेत. निजामास दक्षिणेंतच रोखून ठेवण्यास पेशव्यानें चिमाजीआपास कळविलें. पण स्वतः चिमाजी पोर्तुगीजांशीं चाललेल्या झटापटींत साष्टीजवळ गुंतल्यामुळें त्याचा नाइलाज झाला. एकटा आवजी कवडे काय तो खानदेशांत फौजबंद होता. त्यावर निजामाचा सरदार जमालुद्दीन खान दहा हजार स्वारांनिशीं चालून जाऊन त्यानें कवड्यास हुसकाऊन दिलें व निजामाची उत्तरेची वाट मोकळी करण्यांत आली.

दिल्ली दरबार मराठ्यांनीं उडवून दिलेल्या कहरानें रंजीस आलेला. स्वस्थ बसावें तर मराठे दिल्लीवर चालून येतात, मराठ्यावर फौजा रवाना कराव्या तर त्यांची गनिमाशीं गांठ कोठें पडते? अशात निजामाचीं पत्रें येताच दरबारास हुरूप आला. पेशव्याचा बातमीदार वेंकाजीराम लिहितो, " निजामन्मुलुक बहुत दिवस कृत्रिम बुद्धीनें बसले आहेत. पत्रें वरचेवर खेळवितात. त्यास आतां डेरादाखल होऊन चालले. पातशाहाच्या चित्तांत कीं, कधीं झालें नाहीं तें झालें. आतां निजामन्मुलुक आलियावरी युद्ध तरही करावें अगर येखादी मसलत करावी कीं कांहीं बंदोबस्त होईल. खानदवरा, महमदखान बंगष आपलें वर्तमान आगरियास येतात म्हणून ऐकून आगरियास चालले. मागें खानदवरा पलवलेवर होडलेवर आले आहेत. कमर्दीखानहि मागें एक मजल येत आहेत. निजामन्मुलुकहि येणार. कमरदीखान शरीरसमंधी होणार पातशहाची लिहिल्यावरी लिहिली जातात यास्तव येतात. आवघे आगरियांत संगम होईल "[७] पेशव्याशीं सलूख करावयास वजीद झालेल्या दरबारानें निजाम बऱ्हाणपूर सोडून नर्मदा उतरून चार मजली पुढें आला हें खात्रीचें वर्तमान ऐकून तहाचीं बोलणीं सोडून दिलीं. वकिलानें पेशव्यास लिहिलें कीं, राजे बखतमलजीस खताचा जाब मागितला तर अनमान करतात. म्हणतात कीं, "या दिवसांत खतपत्र मुफसल लिहिणें मुनासिब नाहीं. आतां नकारपूर्वकाचा बहाना यास जाहला आहे. जोंपावेतों नकारपूर्वक येत नाहीं तोंपावेतों कांहीं कामकाज होत नाहीं."

---

५ बऱ्हाणपुरापासून ३५ मैल. ६ पे द नि. का. १५. २७. ७ पे. द नि. का. १५. २१.

मेच्या सुरुवातीस निजाम सिरोंज येथें पोहोंचला. निजामाचें माळव्यात आगमन होतांच भोपाळकर यारमहमद निजामास जाऊन मिळाला व पेशव्यास कबूल केलेले खंडणीचे हप्ते देण्याची टाळाटाळ करूं लागला. सर्व जमीदार निजामास भेटोन त्यांनीं मुलखांत फितवा आरंभिला. सर्वांचा धरबंद सुटला. कमावीसदार ठाणीं सोडून चालल्याचीं पत्रें पेशव्यास मिळतांच त्यानें भदावरच्या मुलखांतून तातडीनें दक्षिणेकडे कूच आरंभिलें.

दिल्लीचें वातावरण समेटास अनुकूल झालें असतां निजामाच्या उठावणीनें तहाची वाटाघाट फिसकटली. 'आता नवाबपूर्वकाचा बहाणा झाला आहे, तो येत नाहीं तोंपर्यंत कामकाज होत नाहीं.' 'नबाबाच्या येण्यामुळें मसलत नासली' असें दिल्ली जयपूर येथील वकिलांनीं पेशव्यास लिहून कळविलें. दिल्लीवर दौड मारून आपल्या सामर्थ्याचा प्रभाव बादशहाला दाखवून पेशवा परतला तो आग्रा भदावराकडे वळला. तेथून दिल्लीशीं समेटाचें बोलणें करावयाचें ही त्याची पहिली योजना. पण निजाम दक्षिणेंतून वर येत चालला तेव्हां पेशव्यास उत्तरेकडे राहणें धोक्याचें ठरलें असतें. ताबडतोब माघारें फिरून निजामाच्या रोखें पेशव्यानें कूच आरंभिलें. येथपर्यंत पेशव्याच्या हालचाली योग्य, निर्दोष अशाच झाल्या. निजाम मोगल एकत्र झाल्यास शत्रुपक्ष आपल्यास वरचढ होईल हें पेशव्यास उघड दिसत होतें. निजामाच्या हालचालीचा रोंख आपल्याविरुद्ध आहे यासंबंधीं पेशव्याजवळ भरपूर पुरावा होता. मुखवचनेंकरून निजामानें भाऊपणाच्या गोष्टी सांगितल्या तरी त्या गोष्टींत तथ्यता नाहीं हें उमगण्याइतकें शहाणपण पेशव्याजवळ होतें हें खास. निजामन्मुलुक पांचसहा हजार मराठे व इतर पधरा हजार अशी जेमतेम वीस हजार भरेल इतकी फौज घेऊन दिल्लीस जलद पोहोंचावयाचें असल्यामुळें आराबा मागें लावून, सड्या फौजेनिशीं निघाला होता. सादतखानानें पेशव्यावर संपादिलेला विजय पोकळ ठरून मराठे दिल्लीवर चालून गेले व पुरें जाळण्याची त्यांनी वेळ आणली होती, मोगल सैन्याची गुंज फुटली, हें वृत्त मार्गांत निजामास सिरोंज[८] येथें पोहोंचलें. एका बाजूनें बादशहाचें सैन्य व दुसऱ्या बाजूनें आपलें सैन्य या अडकित्यांत पेशव्यास भरडून काढूं अशा विचारानें दिल्लीस निघालेल्या निजामाची परिस्थिति अत्यंत चिंताजनक झाली. आग्रा अद्याप २२५ मैल दूर व दक्षिणेंतून बराच वर आल्यामुळें निजामाचा पायाशीं संबंध तुटलेला. स्वतः निजामाजवळ फौजेची कोताई असून चैत्रवैशाखाच्या रखरखणाऱ्या उन्हांत पेशव्याच्या मागें धांवण्याची ताकद दिल्लीच्या सैन्यात उरली नव्हती. निजामाबद्दल सावध राहावें, अंतर्यामीं त्याचा कावा वेगळा आहे, असा पेशव्यास त्याच्या वकिलांकडून वारंवार

---

८ सिरोंज आग्र्यापासून २२५ मैल व बऱ्हाणपुरापासून २१५ मैल.

सूचना मिळाल्या होत्या. खुद्द निजामसुद्धां भयव्याकुळ होऊन पेशव्याचें आगमन कोणे मार्गी होतें हें पहात बसला भदावरांतून ससैन्य परतलेला पेशवा एकाकी सांपडलेल्या निजामास गांठून बुडविणार असा सर्वांचा तर्क असतां, पेशव्यास काय भुरळ पडली कोण जाणे! नवाबाचे मतलब समजून घेण्याकरितां त्याच्या भेटीस पेशव्यानें पिलाजी जाधवास रवाना केलें २६ मेला पेशव्याची आज्ञा घेऊन पिलाजी निघाला, तो २८ला सिरोंज येथें निजामाच्या मुक्कामावर जाऊन पोहोंचला. "नवाबाची भेट जाहली बहुत आदर करून खुशवक्त झाले. कित्येक ममतेच्या विचाराच्या गोष्टी सांगितल्या "[९] कचांत सांपडलेला निजाम मगरुरीच्या गोष्टी सांगणार कोणाच्या जोरावर? त्यानें पेशव्यास देण्याकरितां म्हणून सिरपाव व घोडीं दिल्हीं व पूर्वीप्रमाणें स्नेहवादाच्या कित्येक गोष्टी सांगून पिलाजी जाधवाच्या संमतीनें ११ सफर ( ३१ मे १७३७ )ला सिरोंजचा मुक्काम हलवून काळापाणी, शहाडौरा, बुढाडोंगर, या मार्गें निजाम दिल्लीकडे रवाना झाला.[१०] आपल्या आशयाचा त्रास येऊं नये म्हणून बरोबरचें मराठे सैन्य दक्षिणेस परत लावून दिलें.[११]

निजाम झकेटेंत आला असतां त्यास गांठून गर्दीस मिळविणें हें पेशव्यांचें आद्य कर्तव्य होतें तसें कांहीं न करितां निजामाच्या अंतःकरणाचा थांग लागण्याकरितां पेशव्यानें पिलाजी जाधवास पाठविलें. वृद्ध निजामाचा बाजीरावास परिचय पूर्वीच झाला होता; याचपूर्वी अनेकदां निजामाच्या कपटनीतिचा प्रभाव पेशव्यानें पाहिला होता बादशहाच्या हुकुमास धाब्यावर बसवून ज्यानें दक्षिणेंत स्वतंत्र सुभा स्थापन केला तो निजाम बादशाहीच्या पडत्या काळांत आपल्यावरील बंडखोरीचा डाग धुवून काढण्याकरतां दिल्लीस चालला आहे याच्यावर विश्वास तरी कसा बसावा? पण पेशव्यानें मात्र त्यास सुखें उत्तरेस जाऊं दिलें. शत्रुसैन्याची विभागणी करून एक एक फौजेस गांठून फन्ना उडविणें हा युद्धनीतींतील एक कौशल्याचा डाव समजला जातो. बाजीरावाच्या या वेळच्या वर्तनाचा नीटसा बोध होत नाहीं मोगलांचीं दोन प्रचंड सैन्यें तोंडावर असतां दिल्लीवर जाण्यास जो कचरला नाहीं तो बाजीराव निराधार सांपडलेल्या निजामास निसटून जाण्याची परवानगी देतो ही गोष्ट त्याच्या युद्धनीतिविशारदपणास कमीपणा आणते. प्राप्त झालेली सोन्यासारखी संधि गमावल्यामुळें पेशव्यास पुढील वर्षाची प्रचंड मोहीम हातीं घ्यावी लागली.

पेशव्यातर्फे असें समर्थन करितां येईल कीं, १७३२ पासून निजाम स्नेही झाल्यामुळें निजामासंबंधी पेशव्यास शंका घेण्याचें कारण नव्हतें. पेशव्यास खात्री पटावी म्हणून निजामानें आपल्या सैन्यांतील कांहीं भाग दक्षिणेस रवाना केला.

---

९ पे द नि. का १५ ४८. १० पे द नि. का. १५ ४५. ४९.
११ पे. द नि. का १५. ४५.

पण हें समर्थन लंगडें ठरतें दिल्ली दरबारांत सैन्याची, सामग्रीची वाण नसून कर्तबगार व्यक्तीची होती. निजामाच्या आगमनानें दरबारास हुरूप चढून मराठ्याविरुद्ध त्यांनीं पुन्हा हालचाली सुरू केल्या.

निजाम दिल्लीनजीक पोहोंचतांच त्याचें मोठ्या सन्मानानें स्वागत करण्यात आलें. त्यास राहण्यासाठीं सादुल्लाखानाचा भव्य वाडा देण्यांत आला व त्याच्या कोणत्याहि सुखसोयींत कमतरता न पडूं देण्याविषयीं खुद्द बादशहानें दक्षता राखली. जुलै ३ तारखेस दरबारांत बादशहाची भेट होऊन निजामास गौरवपर असफजाह ही मोठ्या सन्मानाची पदवी देण्यांत आली. निजामाचें शहाणपण, अनुभव व कर्तबगारी यांजवर आतां दरबारची सारी भिस्त असून मराठ्यांच्या छळापासून साम्राज्यास मुक्त करण्याकरितां परमेश्वरानें हा तारक पाठविला, निजामाच्या सल्ल्यानें आपण वागलों तरच आपली धडगत अशी बादशहाची दृढ भावना झाल्यामुळें निजाम सुचवील ते उपाय अंमलांत आणण्याची बादशहानें तयारी दाखविली. गेल्या पंधरावीस वर्षांत मराठी सत्तेची बेसुमार वाढ झाली होती. गुजराथ, माळवा, बुंदेलखंड या प्रातांतून मोगलांचा अमल उठवून लावून मराठे आग्र्यानजीक येऊन ठेपले. जयसिंग, खानडौरान यांच्या मिळमिळीत समेटाच्या धोरणानें मराठ्यांना अप्रत्यक्षरीत्या उत्तेजनच मिळत गेलें. यापुढें आग्रा व माळवा जयसिंगाच्या हातीं ठेवणें म्हणजे हे दोन्ही प्रांत मराठ्यास बहाल करण्यासारखें होतें. पेशव्याच्या अप्रतिहत गतीला पायबंद घालील असा छातीचा सरदार दरबारांत उरला नाहीं. तेव्हां "निजामानें कुल येख्तियार आपल्या नांवें करून घेतला व पातशहासी करार केला कीं, पांच सुभे देणें व करोड रुपये देणें, हरिभक्तास रेवापार होऊं देत नाहीं.[१२]" पातशहानीं निजामाच्या म्हणण्यास मान्यता दर्शवून माळवा, आग्रा या प्रांतांच्या सुभेदारीवर निजामाचा पुत्र गाजीउद्दीन याची ३–८–१७३७ ला नेमणूक केली. आग्रा प्रांत खुद्द जयसिंगाकडे असून नायब सुभेदार म्हणून माळव्याचा कारभार गेल्या वर्षापासून बाजीराव पहात होता आपल्या पुत्राच्या नांवें माळवा करून घेतला म्हणजे पर्यायेंकरून पेशव्यास निजामानें युद्धाचें आव्हानच दिलें.

पावसाळा सरतांच तीस हजार उत्कृष्ट सैन्य व तोलदार तोफखाना घेऊन निजाम माळव्याच्या रोखें परत वाट चालूं लागला. चंबळच्या मार्गें धोलपूर ग्वालेरवरून यावें तों कोतरखळ्या फार म्हणून निजामानें आग्र्यानजीक यमुना उतरली व नदीच्या डाव्या किनाऱ्यानें कूच करून काल्पीच्या उतारास परत ती नदी ओलांडली व बुंदेलखंडांतून माळव्यावर चढाई केली. बुंदेलखंडांतून कूच करण्यांत मार्गाची सुगमता हा तर निजामाचा एक उद्देश होताच, त्याबरोबर मराठ्यांस नेहमीं

---

१२ पे. द. नि का. १५ ५३.

सामील होऊन बादशाही मुलखावर हल्ला चढविणाऱ्या बुंदेल्यांचा भेद करून त्याचें साहाय्य पेशव्यास मिळूं नये हाहि तितकाच महत्त्वाचा हेतु होता आणि तो अंशात. तरी सिद्धीस गेला दतियेकर, वोडसेकर, छत्रसालचा मुलगा सभासिंग व आहीर हे आपल्या फौजांनिशीं येऊन निजामास सामील झाले निजामाची फौज वाढत जाऊन "सत्तर हजार तमाम भारी चांगली, व सवाशे हातनाला, व जेजालाचे व बाणाचे व सुतरनालाचे उंट तीन हजार "[१३] इतकी प्रचंड फौज जमा झाली. ता. १२ नोव्हेंबर १७३७ला धामोणी येथें निजामाचा मुक्काम झाला. धामोणीवरून सिरोंज या मार्गें कूच करीत डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत तो भोपाळनजीक पोहोंचला. माळव्यांतील मराठ्याचीं ठाणीं सर करावयाचीं, दक्षिणेंतील फौज वर बोलावून दोन्ही सैन्यें एकत्र झालीं म्हणजे पेशव्याशीं मुकाबिला घ्यावयाचा अशी निजामानें योजना केली.

पण निजामाच्या योजनेप्रमाणें पेशवा थोडाच वागणार होता ? निजामबादशाहांच्या अंतस्थ कारस्थानाचा सुगावा लागतांच बाजीरावानेंहि फौजेची कलमजारी सुरू केली. वसईची मोहीम तात्पुरती अर्धवट टाकून सर्व सैन्य एकत्र होताच, खरगोणावरून पुनाशाजवळ[१४] ८० हजार फौजेनिशीं नर्मदापार होऊन बाजीरावानें माळव्याचा मार्ग धरला. दक्षिणेंतून फौजांनीं जलदीनें येऊन सामील व्हावें असे निजामानें सक्तीचे हुकूम सोडले व या हुकमान्वयें नासरजंगानें फौज उभारण्यास सुरुवात केली. दक्षिणेंतील सैन्य निजामास सामील झाल्यास शत्रुपक्ष आपणास भारी होईल हें जाणून बाजीरावानें आपली पिछाडी रक्षणाचें काम चिमाजी आप्पावर सोपविलें.[१५] तापीवर वरणगांवानजीक राहून चिमाजीनेंहि ही कामगिरी उत्तम रीतीनें बजावली.

दक्षिणेंतील सैन्य सामील झाल्यावर मराठ्यांशीं लढाई घ्यावयाची अशी निजामाची योजना असतां बांधून जाऊन पेशव्यानें निजामास गाठलें. 'पेशवा मुकाबिल्यास येत आहे हें समजतांच नबाब सलाबत खाऊन भोपाळ किल्ल्याच्या आश्रयास गेला व तळें पाठीशीं, नाला पुढें, देऊन राहिला पेशव्यानें त्याच दिवशीं छ ३ ( १५ १२ १७३७ ) रमजानीं चालून घेतलें. नबाबानीं सवाईचे पुत्र व बुंदेले सभासिंग व जाट व रजवाडियांच्या फौजा व तोफखाना ऐसा एक तोंडी झुंजाची जागा होती ती वाट बांधून उभे राहिले. आपण खासा पाठीवर उभा राहिला. मराठी फौजा राणोजी शिंदे, पिलाजी जाधव, सयाजी गुजर व किरकोळ पथकें रजपुतांचे फौजेवर उठलीं. तोफांची एक रंजक खाऊन मराठे राऊत शत्रूशीं जाऊन भिडले. रजपुतांचें दीडशें माणूस ठार झालें, व पांचसातशें जखमी झालें. तोफांच्या माऱ्यामुळें व नाला आडवा आल्यामुळें

---

१३ पे द. नि. का. १५. ५६ ५८. ५९. १४ प्र च. १२४. १५ प्र. च.

मराठ्यांस निजामाच्या सैन्याशीं लगट करतां येईना. तेव्हां नबाबाच्या गोटापासून दोन बाणाच्या टप्प्यावर बसून मराठ्यांनीं शत्रुसैन्यास वेढण्यास सुरुवात केली

मराठ्यांच्या हालचाली अत्यंत त्वरेनें झाल्यामुळें निजाम हतबल झाला. बुणगे सर्व शहरांत पाठवून सैन्यानिशीं त्यानें किल्ल्याचा आश्रा केला पण इतक्या मोठ्या सैन्यास पुरेसें धान्य भोपाळांत कोठून सापडणार ? बाहेरुन मराठ्यांनीं सर्व मार्ग रोखून कहीकाबाड बंद केली; 'धान्य तें महर्ग होत चाललें. चौ दिवसांत रुपयाचें पीठ चार शेर झालें. हत्तीघोड्यांस वैरण अगदीं नाहीं. एक दिवस झाडाच्या साली व लव्हाळे चारले आतां ते कांहींच' नाहीं. रजपूत बुंदेले निजामाबरोबर येऊन पस्ताव्यांत पडले. पळून जावें तर बुणगे शहरांत अडकले, युद्धास बाहेर निघावें तर नबाबाकडून साहाय्य होईल याची खात्री नाहीं " नबाबाचा इतबार त्यांस नाहीं व त्यांचा इतबार नबाबास नाहीं " नुसत्या उपासमारीनें नबाबाच्या सैन्यास हैराणगत करुन मराठे स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं रात्रीचे दारुचे बाण चालविण्यास सुरुवात केली. आकाशांतून हे अग्निलोळ वेढलेल्या शत्रुसैन्यांत येऊन पडले कीं, माणसांची व जनावरांची एकच दाणादाण होऊन जाई. सारी रात्र गोटांत दंगे होऊन फौजा ताटकळून उभ्या राहूं लागल्या [१६]

आपल्या जिवावर ओढवलेल्या संकटाचें वर्तमान निजामानें पातशहास कळविलें व दक्षिणेंतून आपल्या पुत्रास सैन्य घेऊन अत्यंत निकडीन बोलाविलें. शाहजापूरचा फौजदार मीर मानीखान यानें निजामास कुमक पोहोंचविण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्याला प्राणास मुकावें लागलें.[१७] होळकर, पवार धाऊन त्यांनीं मीरमानीखास जिवंत पकडून ठार केलें दुसरा प्रयत्न सफदरजंग व कोट्याचा राव दुर्जनसाल यांनीं केला, पण त्यांनाहि कांहीं न करतां परतावें लागलें. इकडे बादशाहा मागील वर्षांची पेशव्याची करामत विसरला नव्हता. त्यानें निजामाबरोबर खजाना, मोठें सैन्य व उत्कृष्ट तोफखाना दिला होता. राहिलेली फौज निजामाकडे लावून पुन: स्वत:चा जीव धोक्यांत घालण्याची त्याची तयारी नव्हती " दिल्लीस फौजानिशीं बादशाहास अर्जी झाली. त्याणीं खानदौरास व कमरदीखान यांस फर्माविलें कीं तुम्ही कोठें जाणार ? आम्ही निघूं तेव्हां तुम्ही समागमें असावें. "

निजामास आतां दक्षणी फौजेचा काय तो भरवसा राहिला नासिरजंगाकडे दररोज पांचसात जोड्या रवाना होऊं लागल्या. आपल्या पिछाडीचें संरक्षण पेशव्यानें आपल्या भावावर सोंपविलें होतें. त्यानें चिमाजीला बजावून लिहिलें कीं, " यासमयीं जरी तिकडील फौजेस तुमचा शह बसोन आटकली तरी (भोपाळ येथील निजामाची) हे फौज बुडवावयास अशी दुसरी वेळ येणार नाहीं ते फौज येऊन सामील झाली तरी मदाव भारी होतील याजकरितां फौजास अटकाव होये ते करणें यासमयीं

---

१६ ग्रं न १७ पे द. नि. का १५ ५८

तुम्हास जी फौज मिळेल ती जमा करून भारी राहाणें. " दाभाडे, गायकवाड, बांडे, यांस बोलावून आणण्याविषयीं त्यानें चिमाजीस सूचना केली त्याचप्रमाणें खुद महाराजास विनंती करून फतेसिंग भोसले, शंभुसिंग जाधवराव, सरलष्कर, रघूजी भोसले यांच्या फौजा कुमकेस बोलाविल्या. समय मोठा आणीबाणीचा आहे हें जाणून शाहूनें आज्ञापत्रें रवाना केलीं कीं, " दक्षिणची फौज निजामास सामील होऊं न द्यावी यास्तव चिमणाजी बल्लाळ खानदेश प्रांतीं राहिले आहेत, त्यास टाकोटाक फौजेनिशी जाऊन सामील होणें, एक क्षणाचा उजूर न करणें "

नासिरजंगानें दक्षिणेंत नवें सैन्य उभारण्यास सुरवात केली. सुलतानजी निंबाळकर, जानोजी निंबाळकर, चंद्रसेन, अनरुल्लाखान, मीर मुल्लादुदाखान इत्यादिकांची मिळून बारापंधरा हजारपर्यंत फौज जमा होते तों वऱ्हाडांत तुमुल युद्ध होऊन रघूजी भोसल्यानें सुजायतखानास बुडविल्याची बातमी आली. पेशव्यास मिळावयाच्या उद्देशानें रघूजी निघाला असतां साळबरडी नजीक घाटतोंडें येथें पोख्त फौजबंदी करून एलिचपूरचा सुभा सुजायतखान आडवा चालोन आला; त्याचा समाचार घेणें जरूर झालें " युद्ध मोठें झालें तीन प्रहर लढाई झाली स्वतः रघूजी पायउतारा होऊन अडहत्याराची निकराची लढाई झाली. सुजायतखान वगैरे सरदार धरले गेले. फौज तमाम लुटली गेली. "[१८] हें वर्तमान नासिरजंगाकडे पोहोंचतांच उत्तरेस फौजा रवाना करण्याचा त्याच्यानें हिय्या होईना त्यानें खलबतास आपल्या सरदारांना बोलाविलें " खलबतांतील मजकूर कीं, वऱ्हाड प्रांतांत रघूजी भोसले याजजवळ पंधरा सोळा हजार फौज, त्याच्या पराभूशास सुजायतखान होते त्याची हे अवस्ता झाली. रघूजी भोसले प्रस्तुत निरोपद्रव* झाले. नासिरजंग बाहेर निघाल्यानें चिमाजी आप्पा, दमाजी गायकवाड, रघूजी भोसले अशी चाळीस हजार पावेतों फौज जमा होईल. नासिरजंगानें कूच केल्यास ही फौज कदाचित औरंगाबादेवर चालून येईल. बरें, रघूजी भोसल्यावर दुसरी फौज रवाना केली आणि त्या फौजेनें शिकस्त खाल्ली तर पुरताच बदनक्ष होईल. जरी असें कांहीं झाल नाहीं तरी रघूजीचें पारपत्य करण्यात काहीं दिवस तरी खर्च होणार आणि निजामाकडून तर मदतीसाठीं निरोपामागून निरोप येत होते." रघूजीच्या धास्तीनें शेवटपर्यंत नासिरजंग फुलंब्रीवर राहिल्यामुळें दक्षिणेंतील कुमक नबाबास पोहोंचली नाहीं.

इकडे निजामाला मराठ्यांची मिठी दिवसेंदिवस ज्यास्तच घट्ट बसत चालली. भोपाळासभोंवतीं चौकीबंदी झाली, दाणा महाग झाला, गवत तो न मिळेसें झालें. तेव्हां बोलीचालीचा सदर्भ मनांत आणून आनंदराव सुमंतास नबाबानें पेशव्याकडे (२६.१२ ३७) पाठविलें. बाजीरावानें आपला मतलब सांगोन सुमंताबरोबर बाबूराव मल्हार रवाना केले नबाबानें आज्ञा केली " प्रात काळीं राजश्री पिलाजी

१८. पे. द. नि. का. १५. ८२ * निरंकुश

जाधवराव व आणखी मातबर पाठविणें. येथीलहि माहीतगार देऊन बोलीचाली होईल." दुसऱ्या दिवशीं नवाबाकडून सय्यद लष्करखान, अबदुल खैरखान अनवरखान व सुमत लष्करापुढें टेकडी होती तेथें आले पेशव्यानें राजश्री बाजी भिवराव, पिलाजी जाधवराव, बाबूराव मल्हार पाठविले संभाषण झालें. निजामाच्या वकिलाचें बोलणें पडलें कीं, "निजामाची बेअब्रू होऊं नये नबाबाची अब्रू राखली तर तुमचे सर्व मतलब नबाब मान्य करतील." ही अट मान्य करून तळ मागें हटवून कोसाच्या अंतरें बंदगींत पेशवा राहिला. मराठ्याच्या तळावर निजामानें मुकाम केला व आपले वकील बोलणें चालू ठेवण्यास पाठविले. दुसऱ्या दिवशीं वेगळाच प्रकार मराठ्यांच्या नजरेस पडला. तहाचीं बोलणीं अर्धवट सोडून एकाएकीच कूचाचा नगारा करून निजामाचें सैन्य भुपाळचा रस्ता चालू लागलें. हें काय गौडबंगाल आहे याचा विचार करण्यात फार वेळ न घालवितां आवजी कवडे व पवार यांनीं नबाबाच्या दुमदारीस घाव घातला जाटाच्या व आवजी कवड्याच्या फौजेची एकच सरमिसळ झाली. कसेबसे दोन प्रहरापासून सायंकाळपावेतों अर्ध-कोस जमीन चालून निजामानें भोपाळ गाठलें फाटकाआंत पहिले बुणगे ठेविले होते त्याजवळ जाऊन अडचणींत राहिला. मराठ्यानीं पूर्वीपेक्षाहि जास्त कसोशीनें बंदोबस्त करून दाणागवत सर्व बंद केलें घोड्यावर व गोळीच्या टप्प्यावर मोर्चे लावून करोलाचा मार सुरू केला

बाहेरून कुमक येईना व दाणागला घासलकडी बंद झालेली. निजाम व निजामाची फौज सत्वहीन झाली. भुपाळात स्वस्थ बसल्यास आपल्यापुढें काय वाढून ठेवलें आहे हें निजामास स्पष्टच दिसत होतें. उपासमारीचा भयानक मृत्यु किंवा मराठे सांगतील त्या अटीवर अपमानकारक सलूख याशिवाय निजामास मार्ग उरला नाहीं. निर्वाणीचा उपाय म्हणून निजामानें "बुणगे कांहीं भुपाळांत व कांहीं इस्लामपुरांत टाकून मराठ्याची पकड सैल व्हावी म्हणून तहाचेंहि बोलणें लाऊन कूच आरंभिलें" पण मराठ्यांना नबाबाच्या फसवेगिरीचा पुरता अनुभव आलेला, त्यांनी नबाबाच्या सैन्याबरोबर चौतर्फा फौजा चालवून वेढा कायम ठेवला "एक रुपयास एक शेर धान्य झालें; तेंहि कोणास प्राप्त कोणास अप्राप्त. घोडी पळसाचा पाला खाऊं लागलीं. मोगल पठाणांनीं गाड्याचे बैल खादले. पण रजपुतास मात्र फाके पडूं लागले. सर्वांचें दुःख पाहून बहुतच काहिल होऊन सलुखाविशी नबाबानें त्वरा केली."[१९] आपल्या वकिलाच्या मध्यस्थीला भर म्हणून पेशव्याचा स्नेही सवाई जैसिंग याचा दिवाण आयामल यासहि रवाना केलें. शेवटीं दुराईसराई येथें ठराव झाला कीं "माळवा दरोबस्त द्यावा. पादशाही सनद दिल्लीस गेल्यावर करून द्यावी द्रव्याची बोली पहिली राजश्री धोंडो गोविंद याचे

१९ ब्र च. ३५.

विद्यमानची आहे त्याची रदबदल करून जें साधेल तें करून द्यावें. नर्मदा व चंबल यामधील राजेरजवाडियांपासून पैका कमपेस घेणें तो घ्यावा."[२०] अनन्यगतिक झाल्यामुळें निजामास तहास मान्यता दिल्याशिवाय सुटकाच नव्हती निमुटपणें छ २६ रमजानी ७. १. ३८ रोजीं "नबाबानीं माळवा दरोबस्त जहागीर सुभेदारीचे यादीवर दस्कत करून दिलें व द्रव्यहि साधेल ते पादशहांपासून करून देऊं"[२१] असें लिहून दिलें.

भोपाळचा विजय हा बाजीराव पेशव्याच्या कर्तृत्वाचा परमोच्च बिंदु होय "निजामन्मुल्क हतगर्व होऊन रायाचा व नबाबाचा सलुख झाला ही गोष्ट असामान्य झाली "[२२] माळवा साधेल तितका साधावा हा हेतु अंत:करणांत बाळगून कारकीर्दीच्या सुरुवातीपासून पेशव्यानें जो उद्योग आरंभिला, तो उत्तम रीतीनें सफल झालेला दृष्टीस पडण्याचें भाग्य त्यास लाभलें. १७२० पूर्वी नगर नासिक सातारा या चिमुकल्या टापूंत आत्मरक्षण कसें होईल याची अहर्निश चिंता बाळगून राहणाऱ्या मराठ्यांनीं आतां अखिल हिंदुस्थानभर थैमान घालण्यास सुरुवात केली. १७१८ मध्यें मराठ्यांनीं पहिल्या प्रथम नर्मदा ओलांडली, पण ते हुसेन अलीचे साहाय्यक म्हणून. १७२०त बाजीराव पेशवाईवर आल्यापासून या उत्तर हिंदच्या राजकारणाला रंग चढला. शाहूच्या दरबारांत थोडाफार जम बसतांच पेशव्यानें उत्तरेकडे भराऱ्या मारण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रांत उसळणाऱ्या चैतन्याची दाद नसल्यामुळें सुरवातीच्या स्वाऱ्यांकडे दिल्ली दरबारनें दुर्लक्ष केलें १७२८ च्या नोव्हेंबरात मात्र चिमाजीआप्पानें दयाबाहादर खासा दस्त केला व पेशव्यानें जैतपुरावर बंगाष नामोहरम करून पाठविलें तेव्हांपासून मोगल दरबारास या संकटाची खरी जाणीव आली पण दरबारात इतकी बजबजपुरी माजलेली कीं, शत्रुनिवारणाचे खरे उपाय न शोधतां शत्रूचें सामर्थ्यसंवर्धन करतील असले उपाय अंमलांत आणले गेले माळवा, आग्रा या प्रांतांवर पेशव्याचा केवळ हस्तक बनलेला सवाई जैसिंग याची नेमणूक झाली. १७३२-३६ या चार वर्षांच्या अमदानीत मराठ्यांच्या फौजा माळव्यात उतरल्या कीं, त्यांना जैसिंग नें चौथाई-दाखल मोठमोठ्या रकमा देऊन वाटेस लावावें हा क्रम सर्रास सुरू झाला. शिंदे, होळकर, पवार यांची माळव्यांत स्थापना करून माळवा क्रमाक्रमानें पेशव्यानें आपल्या अंमलाखालीं आणला. नाममात्र उरलासुरला अधिकार १७३६त नायब सुभेदारीवर बाजीरावास नेमून पादशहा गप्पबसला माळव्यांत भरभक्कम पाय रोवून मराठ्यांनीं पुढें चाल केली. मराठ्यांचें संकट घरालगत पोहोंचल्यानंतर मराठ्यांना नर्मदापार काढून लावण्याचे भगीरथ प्रयत्न १७३६च्या नोव्हेंबरापासून सुरू झाले पण अग्नीचा डोंब उठल्यानंतर पाण्याकरतां विहीर खणण्यास उद्युक्त

---

२० ब्र. च. २१ ब्र. च २२ ब्र. च.

व्हावें त्यांतीलच हा प्रकार होता. १७२७च्या मार्चांत दिल्लीपर्यंत धांड मारून पेशव्यानें मोगलांची त्रेधा उडविली, तर १७२८च्या जानेवारींत मोगल बादशाह व निजाम यांच्या संयुक्त सैन्यांचा पाडाव करून मराठे हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि सत्तेला वरचढ आहेत हें त्यानें सिद्ध केलें. भोपाळचा विजय उत्तरेंत स्थापन होत चाललेल्या मराठी साम्राज्याचा पहिला जाहीरनामा होय.

राजकीय परिणामाच्या दृष्टीनें भोपाळचा रणसंग्राम संस्मरणीय ठरतो त्याप्रमाणें या प्रसंगीं झालेल्या लष्करी हालचाली अभ्यसनीय आहेत. निजाम पेशवा यांचा सामना भोपाळ येथें कां झाला याचें उत्तर आतापर्यंतच्या विवेचनांत येऊन गेल्या-मुळें द्विरुक्तीचें कारण नाहीं माळव्यांत मराठ्यांची नुकतीच रुजलेली सत्ता उपटून टाकावयाची व पेशवा चालून आला तर त्याच्याशीं दोन हात करावयाचे असली दुहेरी जबाबदारी निजामानें पत्करली. उत्कृष्ट तोफखाना व तीसबत्तीस हजार सैन्य घेऊन बुंदेलखंडातील राजेरजवाड्यास सामील करून निजाम माळव्यांत उतरतो तोंच पेशवा भोपाळनजीक पोहोंचला निजामाच्या हालचालींचें मर्म जाणून पेशव्यानें दांडग्या सैन्याची जमवाजमव केली युद्धसामग्रीची कमतरता पेशव्यानें सख्याबलानें व गतिचापल्यानें भरून काढली. पेशव्यास कोठें गाठावयाचें, युद्ध कसें चालवा-वयाचें याबद्दल नवाबाचा निश्चय होण्यापूर्वी पेशव्यानें निजामास गाठलें निजाम हांडिया घाटाच्या रोखें कूच करीत होता व तेथें त्यानें दक्षिणेंतील सैन्यास पाचारण केलें होतें. दोन्ही फौजा एकत्र झाल्यानतर मराठ्यांशीं मुकाबिला घ्यावयाचा हा निजामाचा विचार. पण रघूजी भोसल्याच्या पराक्रमानें नबाबाची योजना सिद्धीस गेली नाहीं. सुजायतखानासारखा पराक्रमी सरदार मारून रघूजी भोसल्यानें वऱ्हा-डांत एकच दंगल माजवून दिल्यामुळें दक्षिणेंतील फौज दक्षिणेंतच राहिली विजयी झालेल्या रघूजीच्या तोंडावर सैन्य न ठेवतां उत्तरेकडे कूच करणें म्हणजे रघूजीस औरंगाबादेवर चाल करण्यास पाचारण देण्यासारखें होतें. त्याखेरीज तापीतीरावर दक्षिणच्या सैन्यास रोखून धरण्यास चिमाजी आप्पा सज्ज होऊन बसला होता. या दोघावर मात करून भोपाळास कुमक पोहोंचवील ही कामगिरी नासरजंगासारख्या नेमळट सेनापतीच्या हातून पार पडण्यासारखी नव्हती.

बाजीरावनिजामांची ३ रमजानी (१५–१२–१७३७)ला गांठ पडली, २३ दिवस युद्ध चालून २६ रमजान( ७–१–३८ )ला दातीं तृण घेऊन निजाम शरण आला. संख्येनें कमी असल्यामुळें निजाम कचकरला. उत्तरेकडून किंवा दक्षिणेंतून मदत आल्यानंतर मराठ्यांस भरडून काढू या अपेक्षेनें निजामानें स्वतःस भोपाळांत कोंडून घेतलें पुढें नाला, पिछाडीस तळें, अशी सोइस्कर जागा निवडून काढल्यामुळें धान्य सामग्रीची सोय झाली असती तर निजाम कित्येक महिने मराठ्यांस दाद देताना. तीसबत्तीस हजार सैन्य व बरोबरचे बुणगे यांना भोपाळांतील सामग्री किती दिवस

पुरणार? बाहेरून कहीकबाड आणण्याचे मार्ग मराठ्यांनीं बंद पाडले तेव्हां निजामाची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली. ज्या तोफांच्या माऱ्याखालीं मराठ्याना चिरडून टाकण्याची त्याची प्रतिज्ञा होती, त्या तोफांच्या टप्प्यांत मराठे येतात कशाला? त्यानीं बाणाच्या टप्यावर राहून नबाबाच्या सैन्यास चौगीद वेढलें. शेवटीं निर्वाणीचा उपाय म्हणून गोल बांधून निजामानें उत्तरेकडे प्रयाण करण्याचें मनांत आणलें. हा विचार निजामास सुरुवातीसच सुचता तर कदाचित् त्यास निभावून जातां आलें असतें. पण नबाबाचें सैन्य वेढल्यामुळें त्याचें दाणापाणी बंद झालें. नबाबानें माघार घेतली तरी मराठ्यांची मिठी सैल होईना मोठ्या कष्टानें तीन मैलाची मजल दिवसास होऊं लागली. जनावरांस खावयास नाहीं, शिपायाना मेलेल्या जनावरांच्या मांसावर गुजराण करण्याची वेळ आली. अशा परिस्थितींत मराठ्यांना शरण गेल्याशिवाय निजामास दुसरा मार्गच नव्हता.

भोपाळच्या लढाईचें पानपतच्या रणसंग्रामाशीं असलेलें विलक्षण साम्य अभ्यासकांच्या तावडतोब दृष्टोत्पत्तीस येतें. दक्षिणेकडून कुमक येईल या आशेनें, तोफखान्याच्या सामर्थ्यावर विसंबून, पानिपतावर स्वतःस कोंडून घेऊन मराठ्यांनीं आपला नाश करून घेतला. निजामहि याप्रमाणेंच कुमकेची वाट पहात राहून शेवटीं फसला. सैन्यास फाके पडूं लागले तेव्हां गोल बांधून सदाशिवरावभाऊनें दक्षिणेकडे कूच आरंभिलं. निजामानेंहि निर्वाणीचा उपाय म्हणून बुणगे मागें टाकून उत्तरेचा मार्ग धरला पानपतावर ऐन युद्धाच्या धुमश्चक्रींत मराठ्याच्या तोफांचे गोळे शत्रुच्या डोक्यावरून जाऊन तोफा निरुपयोगी ठरल्या; तर निजामास तोफा उपयोगात आणण्याची मराठ्यांनीं संधीच दिली नाहीं.

पण हें साम्य येथेंच संपतें. शरणागत नबाबाच्या वचनावर विश्वास ठेवून पेशव्यानें त्यास जाऊं दिलें. अहमदशाह अबदालीनें मात्र तहाची भाषा सोडून देऊन मराठ्यांचा पानपत येथें धुव्वा उडविला. विजयसंपादनांत सेनापतीचें कसब दिसतें तसेंच या विजयाचा पुरेपूर फायदा कसा घ्यावयाचा, हा जय अत्यंत परिणामकारक होऊन प्रतिपक्षास पुनः उठता येणार नाहीं इतकें निःसत्व करून कसें सोडावयाचें, हेंहि त्याला समजलें पाहिजे. निजाम काहील होऊन सुद्धां त्यास सफा न बुडवितां बाजीराव तहास तयार झाला हा कदाचित् नबाबाच्या तोफांचा प्रभाव असावा. बाजीरावानें भावास लिहिलेल्या पत्रांत याबद्दल कबुली दिली आहे. तो लिहितो—" हातभरी होऊन बुडवावयाच्या सायासास लागावे तर नबाबाची फौज तोफखाना व बंदोबस्त पाहतां अवघाच ध्यानात आला रोहिले, बुंधेले व रजवाडे व सवाईंची फौज व खेची व नरवर आदिकरून खासा नवाब देखील तीसपस्तीस हजार, यांखेरीज तोफखाना, तोहि कोणेप्रकारचा हें तुम्ही जाणतच आहा. सभोवता अराबा चालून तमाम फौजेनिशीं तोफखान्याचे पाठीं चालावें तर राऊत अगर पायीचे माणूस भिवावया गरज नाहीं.

बंदोबस्तीनें चालत उठावें तर घोडे माणूस बहुत खर्च होऊं लागले. जुजता दिसगत लागल्यास चार दिवस निघोन जातील हा अर्थ चित्तांत आणून सौरस्याचा प्रसंग संपादिला."[२२] दारुगोळ्याच्या वर्षावानें मराठी राउतांस मोगल सैन्याशीं लगट करतां येईना हें क्षणभर कबूल केलें तरी प्रश्न असा उपस्थित होतो कीं, उपासमार झालेल्या नबाबाच्या सैन्यानें—विशेषत. गोलंदाजांनीं—आणखी किती दिवस टिकाव धरला असता ? मोगलांच्या छावणींतील सामग्री पार संपून गेली होती. दक्षिणेंतून निजामास कुमक मिळण्याचा जो कांहीं थोडाफार संभव होता तो सुजायतखानाचा पाडाव झाल्यामुळें नाहींसा झाला रघूजीनें नुकताच मोठा जय संपादन केलेला, तो औरंगाबादेवर केव्हां चालून येईल याचा नेम नव्हता. शिवाय तापीतीरावर राहून चिमाजी सैन्य जमवीत होता. या दोन्ही सैन्यांस न जुमानतां बापास मदत पोहोंचविण्याचें धाडस नासिरजंग करील हें संभवत नव्हतें दक्षिणेंतून नबाबास कुमक येत नाहीं हें निश्चित झालें व तीच दरबारची स्थिति. आणखी थोडा वेळ कळ सोसता तर दक्षिण निर्वेध करण्याचा पेशव्याचा संकल्प उत्तम रीतीनें सिद्धीस गेला असता. नबाबाची सर्व युद्धसामग्री व खजीना पेशव्याच्या हातीं लागून ज्या कर्जाच्या पायीं पेशव्याचें कपाळ छिनत चाललें होतें त्याचा थोडाफार तरी परिहार करतां आला असता द्रव्याची बोली पहिली धोंडो गोविंद याच्या विद्यमानाची होती त्याची रदबदल करून पादशाहाजवळून जें साधेल तें द्रव्य साधून देण्याचें निजामानें कबूल केलें. पण ही कबुली कागदावरच राहिली माळव्याच्या सुभेदारीच्या सनदांचीहि हीच गत. बाजीरावाच्या हयातींत शेवटपर्यंत बादशाही फर्मानें आलीं नाहींत. तीं पुढें बाळाजी बाजीरावास प्राप्त झालीं. एकंदरींत निजामास सफळ बुडविण्याची संधि मिळूनसुद्धां तिचा पेशव्यास भरपूर फायदा घेतां आला नाहीं असेंच खेदानें म्हणावें लागतें.

असो. याप्रमाणें केवळ तेवीस दिवसांत पेशव्यानें निजामास नामोहरम करून हस्ननाबुरास पाठविलें. वेढा चालू असतां ज्या राजेरजवाड्यांनीं निजामास साह्य केलें त्यांना शिक्षा देणें क्रमप्राप्त होतें. प्रथम कोट्यावर मराठ्यांनीं चाल केली. "कुली परगणा लुटून नेस्तनाबूत केला. कोटेकर महाराव पळून गडगांगरूणीस गेला व तेथून त्यानें मलुखाची याचना केली. खंडणी रुपये दहा लक्ष द्यावे असा करार झाला."[२३] कोट्याकडून अहिराचे मुलकांत मराठे उतरले आहीर बाहेर काढून ठाणीं घेतलीं. कुरवाई सर करून पेशवा दक्षिणेंत निघून गेला व जुलैच्या १५ तारखेस पुण्यास पोहोंचला उत्तरेंतील त्याची ही शेवटची व अत्यंत महत्त्वाची मोहीम होय.

---

२२ पे द. नि का १५ ८५. ६८ ६९.

स्थळ प्रत

## प्रकरण [illegible] वें

# नादिरशहाची स्वारी व तिचे मराठी राजकारणावर परिणाम

निजामानें कबूल केलेल्या तहास दरबाराकडून फक्त मान्यता तेवढी मिळा-वयाची राहिली. वास्तविक पाहतां सरहद्दीचे प्रांत मध्यबिंदूस जोडणारीं बंधनें जरी शिथिल होत चाललीं होतीं तरी मोगल साम्राज्याचा गाभा अद्याप शाबूत होता. मोगलांचें सैन्य, मोगलांचा द्रव्यसंचय इतका अफाट होता व मोगल साम्राज्याच्या नांवाचा दरारा इतका विलक्षण होता कीं, कल्पनाशक्ति असलेला कर्तृत्ववान् नेता मिळाल्यास मराठ्यांच्या हालचाली बंद पाडणें मोगलांस कठीण नव्हतें. साम्राज्यावर होणाऱ्या मराठ्यांच्या स्वाऱ्या गजराजाच्या टणक कातडीवर होणाऱ्या प्रहाराप्रमाणें होत अजूनहि कित्येक वर्षे मराठ्यांशीं झगडल्याशिवाय मोगल निकालांत निघण्याचा संभव नव्हता पण अचानक रीत्या दिल्लीवर भयंकर आपत्ति कोसळून मराठ्यांच्या विरोधी पक्षाचा संहार झाला. १७३९च्या जानेवारींत नादिरशहाच्या रूपानें प्रलयच अवतरला व मोगल बादशाहीचीं शकलें उडालीं. एकादा भव्य, सुंदर राजवाडा जीर्ण होऊन त्याच्या तटांत एकादें वडपिंपळाचें रोप रुजलें गेलें की, भेगा पडूं लागतात, ऊन वारा पाऊस यांच्या माऱ्यानें या भेगा विस्तृत होत जाऊन कालांतरानें ही इमारत जमीनदोस्त होणार अशी आपण मनाशीं खूणगांठ बांधतों, इतक्यात आकाशांतून वीज कोसळून किंवा धरणीकंपाच्या धक्क्यानें गदगदा हालून ती इमारत छिन्नविच्छिन्न होऊन जावी त्याप्रमाणें मोगली सत्ता भग्न पावली मोगलांचें राज्य मृत्युपंथास लागलें होतें; पण इतक्या लवकर अप्रतिष्ठा होऊन त्यास भयानक रीतीनें मृत्यु येईल अशी कल्पना कोणासच नव्हती

नादिरशहाचा उदय एकाकीं झाला गरीब आईबापांच्या पोटीं जन्मास आल्या-मुळें त्याचें लहानपण अत्यंत हालांत गेलें. एकदां तर उझबेक लुटारूंनीं त्याला पळ-वून नेलें तेथून सुटून तो परत आला व त्या अंदाधुंदीच्या काळांत वाटमारीसारखा दुसरा फायदेशीर धंदा नसल्यामुळें त्यानें तोच धंदा सुरू केला. दरोडे, खून यांच्याच साहाय्यानें तो कलतचा किल्लेदार झाला व स्वपराक्रमानें वाढत वाढत १७३६ स इराणचा पातशाह बनला. सफवी राजाच्या अमदानींत तुर्क अरबांनीं लुबाडलेले प्रांत त्यांजपासून जिंकून घेऊन तो अफगाण बंडखोरांकडे वळला. दक्षिण अफगाणिस्तान इराण्यांच्या ताब्यांत असून काबूल पेशावर हा उत्तरेकडील भाग मोगलाच्या अंकित होता

१७३७ त कंदाहारास नादिरशहाचा वेढा बसला तेव्हां कितीएक बंडखोरांच्या टोळ्या काबूलकडे पळून जाऊं लागल्या. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं नादिरनें काबूलच्या मोंगल सुभेदारास निरोप धाडले. सैन्यच ठिकाणावर नाहीं तर काबूलचा सुभा या बंडखोरांना शासन कसें करणार ? पठाण लष्करांना चारण्याकरतां दिल्लीकडे द्रव्याची याचना करण्यापलीकडे त्यानें कांहींच केलें नाहीं आणि ती दरबारांतील खानडौरान वगैरे उमरावांनीं धुडकावून लावली. स्वत. नादिरशहानें आपली गाऱ्हाणीं दरबारच्या कानीं घालण्याकरतां वकील रवाना केले, त्याच्याशी सरळ जाबसाल न करतां दरबारच्या मुत्सद्यांनीं त्यांना वर्षभर नुसते घोळवीत ठेवलें. शेवटीं निकरावर येऊन आपल्या वकिलास परत बोलावण्यासाठीं नादिरनें दूत पाठविले. या दूतांचा जलालाबादच्या ठाणेदारानें खून केला, तेव्हां त्याचा सूड उगविण्याकरतां नादिरशहा सैन्यानिशीं हिंदुस्थानची वाट चालूं लागला

वर सांगितलेली सबब खोटी नव्हती तरी हिंदुस्थानावर चालून येण्यास नादिरशहास खरें कारण, आनंदराम मुखलिसनें म्हटल्याप्रमाणें, पातशाहीची विपन्नावस्था हें होय. बादशाहा राजधानींतील विलास सोडून जावयास नाखूष, दरबारांत खुषमस्कऱ्यांचा भरणा, राज्याच्या संरक्षणास आवश्यक असणारें सैन्य विस्कळित व निष्ठाहीन झालेलें, जमाबंदींत गोंधळ, प्रांतांत काय चाललें याची राजधानींत खबर नाहीं अशी परिस्थिति पाहून कोणत्याहि परक्या राजाच्या तोंडाला पाणी सुटावें मग नादिरशहासारख्या महापराक्रमी सेनानीचें हिंदुस्थानाकडे लक्ष वेधलें यांत नवल नाहीं.

१७३८ च्या जून महिन्यांत काबूल सर केल्यानंतर आपल्या पाठीमागें सर्व व्यवस्था करून ५५००० निवडक कझलबाशांनिशीं नादिरशहानें हिंदुस्थानकडे तोंड फिरविलें. १४ नोव्हेंबरला खैबर खिंडींत पठाणांना अचानक गाठून त्यानें हिंदुस्थानचें प्रवेशद्वार हस्तगत करून घेतलें. ताबडतोब चार दिवसांनी तो पेशावरास पोहोंचला. नद्यांच्या उताराबद्दल माहिती मिळवून त्यानें पुढचा मार्ग धरला. लाहोरच्या सैन्यास बगल देऊन १० जानेवारीस लाहोरपासून पांच मैलांवर दक्षिणेस त्याचा मुक्काम झाला लाहोरच्या सुभेदारानें शहर लढविण्याचा प्रयत्न केला. पण नादिरच्या धडाक्यापुढें लाहोरच्या सैन्यास फार वेळ टिकाव धरवेना. १२ जानेवारीस कोटाच्या किल्ल्या घेऊन सुभेदार झकेरियाखान नादिरशहास शरण गेला व वीस लाख खंडणी कबूल करून त्यानें शहराचा बचाव करून घेतला.

मुक्काम लाहोर येथें असतां मोंगल बादशहानें युद्धाची तयारी चालविली आहे, असें खात्रीलायक वर्तमान आलें तेव्हां नादिरशहानें पिछाडीकडील डोंगरांतील मार्ग, नद्यांचे उतार यांच्या बंदोबस्तासाठीं ठिकठिकाणीं तुकड्या ठेवून ता २६-१-१७३९ला लाहोर सोडलें.

काबूलचा पाडाव झाल्याची बातमी दिल्ली येथें गेल्या जुलैंत पोहोंचली होती तरी दरबारांत सामसूम दरबारांतील हिंदुस्थानी व तुराणी पक्ष एकमेकांला हाणून पाडण्याच्या चुरसींत मग्न असतां, खैबरखिंडींतून नादिरशहा हिंदुस्थानांत घुसल्याचें वर्तमान थडकलें, तेव्हां कोठें फौजाची जिगादास्त सुरू झाली. रजपूत राजेरजवाड्यांना व मराठ्यांना तातडीनें बादशहाच्या साहाय्यास येण्याविषयीं पाचारण करण्यात आलें. रघूजी भोसल्यावर निघालेल्या पेशव्यास खानदेशांत हें फर्मान पोहोंचलें, तेव्हां " तोहमास्पकुलीखान सार्वभौमावर आला आहे, यासमई पाच्छाची कुमक केल्यास राज्याचा लौकिक आहे. त्याचे कुमकेस जावयाकरतां माळव्यांतील फौजा शिंदे, होळकर, पवार ऐसें पाठविणें[1] " असें बाजीरावानें चिमाजीआप्पास वसईस लिहून कळविलें व कोकणांतील सैन्याच्या आगमनाची वाट पाहात तो बऱ्हाणपुरावर राहिला

जमतां जमतां पाऊण लाखावर मोंगलांचें सैन्य जमा झालें. वजीर कमरुद्दीन, बक्षी खानडौरान व असफजाह निजामन्मुलक यांच्या आधिपत्याखालीं ता. १०-१-३९ ला ही प्रचंड सेना दिल्लींतून बाहेर पडली ता २७ला पादशाह पानपताजवळ सैन्यांत येऊन दाखल झाला लाहोर शत्रूच्या हातीं गेलेलें म्हणून पुढें न जातां युद्धाच्या सोयीसाठीं कर्नालचें भव्य मैदान निवडून मोंगलांनीं छावणी केली व इराण्यांची दिल्लीकडे जाण्याची वाट ते रोखून बसले. तीस हजार सैन्यानिशीं अयोध्या प्रांतांतून लांब लांब मजली मारून सादतखान बादशाहाच्या सैन्यास सामील होण्यास निघाला होता, त्यास जलद मिळतां यावें हाहि येथें छावणी करण्याचा एक उद्देश होता

इराणी व मोगल यांच्या झगड्याचा निकाल काय लागतो याकडे सर्व हिंदुस्थानचें लक्ष लागून राहिलें. रोजच्या रोज बातमीपत्रें येऊं लागलीं ता १३-२-३९ च्या कर्नाल येथील युद्धाचा वृत्तांत तत्कालीन पत्रांत भरपूर मिळतो तीं पत्रें संक्षेपेंकरून दिल्यास अस्थानीं होणार नाहीं. बाजीरावाकडे महमदशाच्या पाडावाची बातमी येतांच त्यानें ती बातमी सविस्तर आपल्या भावास कळविली तो लिहितो, "उत्तरेकडील वर्तमान तरी तोहमास्तकुलीखान लाहूर घेऊन पुढें आला. दिल्लीहून महमदशाह पादशहा अमीरसहवर्तमान चाळीस पन्नास कोस पुढें गेले होते, येकदोन लढाया सामान्यच झाल्या. त्यावर तोहमास्तकुलीखान याची कजलबासांची फौज, सादतखानाचे बुनगेखजिना येत होता, त्यांवर चालोन आली. सादतखान अगोदर पातशाही मेटीस आले होते, त्यास फौजेचें वर्तमान कळताच सादतखान व खानदौरा त्यावर गेले. लढाई मोठी मातबर झाली ते समई सादतखान यास जिवत धरून नेलें. खानदवरा त्याचे येक भाऊ व लेक समेत मृत्यु पावले. उमदे उमदे लोक बहुत पडले आणखी

---

१ ब्र च.

लष्करचे माणूस पांचसात हजार रणीं पडले. ऐसे युद्ध जाहल्यावरी दिल्लीचे फौजेनें धास्त घेतली. त्याचा जोरा बहुत पाहून निजामन्मुलुक यांणी सख्याचा सदर्भ लाऊन आपण जाऊन भेटले. पातशहास धरून द्यावें व आपलें बरें करून घ्यावें हें दुष्ट बुद्धि चित्तांत आणून पातशाहासहि तोहमास्तकुलीखानाचे डेरियास घेऊन जाऊन भेट केली दुसरे दिवशीं तोहमास्तकुलीखान महमदशाह पातशहाच्या डेरियास आले. तेच समयीं महमदशहास कैद केलें निजामन्मुलुक व कमरदीखान यासहि कैद केलें कुल पातशाहाचे व अमीरांचे कारखाने जप्त केले. सादतखान याबराबरी आपली फौज देऊन दिल्लीस पाठविले. तेथें आपली द्वाही फिरविली. मागाहून आपणहि दिल्लीस दाखल झाले. दिल्लीची पातशाही एकाएकीच बुडाली. या उपरी दक्षिणेस चाल करणार. मोठें अरिष्ट आहे. याची अगोदर तरतूद व पैरवी करावी आणि मातबर फौज जमा करून हिंदुस्थानची फौज सामील करून [illegible] लढाई घालून तिकडच गुतवाव, इकडे पराक्रम होऊ देऊं नये, याकरितां या गोष्टीची तरतूद करणें ती करीतच आहो. बऱ्हाणपुरींच मुकाम आहे."[२] नादिरशाहाची द्वाही फिरविली गेली, गजसिका चालला, पातशाहगर्दी झाली याच्या पाठोपाठ दिल्ली येथें झालेल्या भयंकर कत्तलीची वार्ता दक्षिणेंत येऊन पोहोंचली व सर्व हिंदुस्थान नादिरशहाच्या नांवाने चळचळ कापू लागलें पेशव्याचें सैन्य वसईवर अडकून बसल्यामुळें त्यास पुढें जाणें धोक्याचें वाटलें. बाजीरावानें पुनः तातडीनें निरोप पाठविला, "आम्ही अत:पर बऱ्हाणपुरापुढें जात नाहीं. बऱ्हाणपुराजवळच मुकाम करून राहून खानदेश प्रांताचा बंदोबस्त करतो वसईचा प्रसंग उरकून आपण लौकर घाटावरी यावें. पागेचीं पथकें घाटावर आम्हांकडे पाठवावीं जागा जागा परगणियांत ठेऊन बंदोबस्त केला जाईल. चहूं दिवसीं वर्तमान पावते करणें. आपा 'परराज्य राहिलें तरी सर्वांवरी आहे' त्यास फार विचार मनांत न आणतां इकडील कार्याची पैरवी मनांत आणून कर्तव्य तें करावें "[३]

[illegible] दाखल झाला, त्याच्या नावे गजासका चालू झाला, तेव्हां रजपूत, मराठे इत्यादि हिंदुसत्ताधीशांना विचार करणें प्राप्त आलें. रजपुताची सर्व भिस्त पेशव्यावर असून पेशव्याची फौज आपली फौज एकत्र करून, नादिरशहा अजमेरकडे आल्यास त्याला कसून विरोध करावयाच्या योजना मांडण्यांत आल्या हिंदुस्थान हादरलें पण मराठ्यांचा आत्मविश्वास, धीर, ढळला नाहीं. याचें प्रत्यंतर धोंडो गोविंदाच्या पत्रांत उत्तम मिळतें. तो पेशव्यास लिहितो, "तहमास्पकुलीस निजामाच्या नामर्दीनें यश आलें. आतां राहिले राजे. त्यात मातबर सवाईजी त्याचा विचार स्वामीस विदित आहे त्यांनीं तहमास्पकुलीस मुबारकीची अर्जदास्त

२ पे. द नि का. १५ ७५. ३. पे. द. नि. का १५ ७२

लिहिली. आपले सलुखाचे विचारांत आहे इकडे स्वामीसहि बोलावितील. जसा बनेल तसा प्रसंग सपादून घेतील, स्वामींचा प्रताप सर्वास विदित आहे. स्वामी माळव्यांत यावे अशी मसलत आहे. यावें तेव्हां बहुत खबरदारीनें मातबर फौजेनें यावें. तहमास्पकुली कांहीं देव नाहीं जे पृथ्वीस कापून काढील. जबरदस्ताशीं सलूख करील. परंतु स्वामींनें पैरवी करून यावें आतां सारे रजपूत व स्वामी एक जागा जालिया कांहीं निकाल पडेल "[४]

या सर्व मसलती जागच्या जागींच जिरल्या. वसईजवळ पोर्तुगीजमराठ्यांचें युद्ध निकरात आलें असून दोन्ही पक्ष मारू किंवा मरू या निर्धारानें लढत होते. ऐन भरांत आलेली मोहीम सोडून निघून जाण्याचें चिमाजीच्या मनांत येईना. वसईस फत्ते होऊन मराठी फौजा हिंदुस्थानांत जाण्यास निघतात तों नादिरशाह परत फिरल्याची बातमी आली. आता हिंदुस्थानांत जाण्याचें कारणहि उरलें नाहीं व मोहिमेचे दिवसहि संपत आले. बऱ्हाणपुरापलीकडे न जाता बाजीराव परतला व जुलैच्या २७ला पुण्यास पोहोचला.

१७३९ नंतर अवघ्या वीस वर्षांत मराठ्यांची सत्ता बुंदेलखंड, आग्रा, दुआब, पटणा, पंजाब व मुलतान या भागांत झपाट्यानें फैलावली हा नादिरशहाच्या स्वारीचा प्रभाव प्राणांतिक जखम झाल्यामुळें बादशाही इतकी क्षीण बनली कीं, मराठ्यांना प्रतिकार करण्याची तिच्यात ताकद उरली नाहीं पण एक सामनेवाला संपला, तरी त्याहीपेक्षां वस्ताद दुसरा आखाड्यांत उतरत आहे, त्याच्या बंदोबस्तास वेळींच लागण्याचें मराठ्यांच्या लक्षांत आलें नाहीं वायव्येकडील प्रवेशद्वार हस्तगत करून नादिरशहानें अफगाणिस्थानांतील अब्दुल टोळ्यांना हिंदुस्थानचा मार्ग दाखवून दिला व याच अफगाणांच्या अटकावामुळें मराठ्यांचा हिंदुपदपादशाहीचा डाव नासला.

---

## प्रकरण ८ वें

# बाजीरावाच्या कार्याचें समालोचन

१७२०च्या सुरुवातीपासून १७४०पर्यंत वीस वर्षें बाजीरावाच्या आधिपत्याखाली मराठ्यांनीं जो प्रचंड उद्योग चालविला त्याचें उद्दिष्ट व फलितार्थ काय हा प्रश्न साहजिकच मनांत उद्भवतो. तार्तरी, इराण व अफगाणिस्तान येथील आडदांड लोकाच्या झुंडींच्या झुंडींनीं हिंदुस्थानांत वायव्येकडून उतरावें, गावेंच्या गांवें उध्वस्त करीत दिल्लीपावेतों मुलुख बेचिराख करून परतावें हा क्रम हिंदुस्थानच्या इतिहासात कित्येक शतकें अबाधित चालला होता. या परकीयांपैकीं विशेष धाडसी पुरुषांनीं परत न फिरतां हिंदुस्थानात राहण्याचें ठरवून स्वतंत्र राज्यें प्रस्थापित करून या राज्याची मर्यादा पूर्वेस बंगाल, दक्षिणेस नर्मदा, क्वचित् प्रसंगीं कृष्णातुंगभद्रेपर्यंत नेऊन भिडवाव्या, या क्रांतीचीहि पुनरावृत्ति अनेक वेळां होऊन गेली. सबक्तगीन पंजाबापर्यंत येऊन पोहोंचला, तर महमुदानें पंजाब, राजपुताना, काठेवाड, कनोजपर्यंत स्वाऱ्या करून अपरंपार संपत्ति नेली. महमुदाच्या मागून आलेले पठाण तर स्थानिक होऊन राज्यकर्ते बनले. या पठाणांनाहि शह देणारे मोगल बादशहा होऊन गेले. पण या सर्वांचें आगमन वायव्येकडून झालेलें. दक्षिणेंतून उत्तर जिंकण्याचा मराठ्यांचा प्रयत्न एका दृष्टीनें अपूर्वच समजला पाहिजे.

हा प्रयत्न अपूर्व भासला तरी अद्भुत किंवा अतर्क्य खास नव्हे. मराठी सत्तेचा उगम व विकास म्हणजे आकाशांत एकाएकी धूमकेतु उद्भवून त्यानें झपाट्यानें अंतराळाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत धावत सुटावें, अशांतला एक प्रकार असा गैरसमज मुसलमान व इंग्रज इतिहासकार करून घेतात, तें केवळ सम्यग्ज्ञानाच्या अभावीं. ज्वालामुखीचा स्फोट होण्यापूर्वी अनेक शतकें पृथ्वीच्या भूगर्भांत उष्णता तापत असते, असें भूगर्भवेत्ते सांगतात. याच न्यायास अनुसरून मराठ्यांच्या उत्तरेकडील आक्रमणाचें बीज त्यांच्या सोळाव्यासतराव्या शतकांच्या इतिहासात शोधलें पाहिजे. देवगिरीचें राज्य अल्लाउद्दीन खिलजीनें जिंकून घेतल्यानंतर मुसलमानी सत्ता दक्षिणेंत प्रस्थापित झाली. १२०० पासून १३००पर्यंतच्या शंभर वर्षांच्या काळांत सर्व दख्खन यवनमय झाली. या यावनी अमलापासून आपली मुक्तता करण्यास मराठ्यांस तीनशें वर्षें लागलीं. या तीनशें वर्षांत बहामनी राज्याचीं शकलें होऊन ज्या शाह्या निर्माण झाल्या होत्या, त्यांत मराठे पुन्हा प्रामुख्यानें वावरू लागले. फौजात मराठे शिलेदारांचा भरणा होऊन दरबारांतहि मराठी मुत्सद्यांचें वर्चस्व असोनात वाढलें. विजापूरचा मुरार जगदेव, गोवळकोंड्याचे

आकण्णामादण्णा, सुलतानाच्या विश्वासांतले दिवाण असून त्यांच्या सल्ल्यानें सत्रे सूत्रें हलूं लागलीं अशा परिस्थितीत मुसलमानांची सेवा करण्यापेक्षां स्वत:च राजकीय सत्ता कां चालवू नये, असा प्रश्न दक्षिणेंतील हिंदूंच्या अंत:करणांत उद्भवणें स्वाभाविक होतें. गमावलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याचा समय सतराव्या शतकाच्या सुरुवातीस आला असता नवीनच एक संकट क्षितिजावर डोकावूं लागलें. या कृष्णमेघाची छाया आरंभीं जरी लहान भासली तरी आस्ते आस्ते या छायेनें सर्व आकाश भरून जाईल, हें मराठ्यांतील द्रष्ट्यांस कळून चुकलें. हें नवीन संकट म्हणजे मोगलांच्या उत्तरेकडून दक्षिणेंत सुरू झालेल्या स्वाऱ्या अकबरानें खानदेश जिंकून आंत तोंड घातलें. अकबरामागून जहांगीरशहाजहानांनीं वऱ्हाडअहमदनगरचीं राज्यें नामशेष केलीं. तेव्हां मोगलांच्या सर्वभक्षक चढाऊ धोरणास तोंड देण्याचा मराठ्यांनीं चंग बांधला शिवाजीच्या नेतृत्वाखालीं मराठे नवीन जोमानें व नवीन उल्हासानें भारले गेले व मराठी राष्ट्राचा उदय झाला शिवाजीनें मराठ्यांचें राष्ट्र संघटित केलें, याची साक्ष एकच गोष्ट देते आणि ती म्हणजे औरंगजेबाशीं घनघोर झगडा करून मराठ्यांनीं स्वातंत्र्य कायम टिकविलें. या प्राणांतिक झगड्यांत मराठ्यांचें राज्यतंत्र कोसळून पडलें तर मोगल साम्राज्याची जीवनशक्ति पार आटून गेली

अठराव्या शतकाच्या सुरुवातीस ही परिस्थिति दृष्टीस पडते मार खाऊन मोगलानीं महाराष्ट्रांतून पाय माघारा घेतला. मराठे विजयी झाले होते पण या विजयाचा पूर्ण फायदा घेण्याकरता त्यांना स्वत:च्या घराची घडी नीट घालण्याची जरूरी होती देशांतील अराजकता मोडून शांतता प्रस्थापित करावयाची, बेचिराख झालेल्या प्रदेशाची जोतपात करावयाची, उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊन देशाची संपत्ति वाढवावयाची, कोसळून पडलेलें राज्यतंत्र (Government) भरभक्कम पायावर उभारून राष्ट्रांत नवचलन्य उत्पन्न झालें होतें, त्याला योग्य दिशा दाखवावयाची, ही कामगिरी बजावणें राष्ट्रास अत्यावश्यक होतें अशा प्रसंगीं स्वकर्तव्याची जाणीव असणारा, जोमदार, सर्वांस काबूत ठेवून काम बजावून घेणारा, तडफेचा पुढारी राष्ट्रास हवा होता. देशभर पसरलेले कलहप्रिय सरदार, जहागीरदार व शिलेदार यांच्या स्वार्थप्रवण बुद्धीस मुरड घालून राजसत्ता भरभक्कम पायावर उभी करावयाची व त्यानंतर पाऊल पुढें टाकावयाचें हा या वेळीं खरा मुत्सद्देगिरीचा, दूरदर्शीपणाचा मार्ग होता. या वेळी सातारच्या गादीवर अधिष्ठित झालेल्या शिवाजीच्या वंशजाकडून हा मार्ग चोखळला जाण्याचा संभव नव्हता. मुळापासून दुबळ्या स्वभावाचा असल्यामुळें सर्व सरदारांवर वचक बसविणें शाहूस बनलें नाहीं व मोगल साम्राज्याबद्दल अंत:करणांत अवास्तव आदर वसत असल्यामुळें औरंगजेबाचा पाडाव करून मराठ्यांनीं संपादन केलेल्या विजयाचा राष्ट्रास पुरेपूर फायदा करून देतां आला नाहीं राष्ट्राच्या नडी, गरजा काय आहेत याचें या पुरुषास आकलन झालें नाहीं त्याच्या सुदैवानें

त्यास साहाय्यक मात्र मोठे धाडसी व कार्यक्षम मिळाले. हरएक अडचणींतून साम-दामदंडभेदांनीं मार्ग काढल्यामुळें शाहूमहाराजाची बाळाजी विश्वनाथावर बहाल मर्जी बसली व प्रधानपर्यंतावर सर्व कारभार सोंपवून या पुरुषानें आपलें आयुष्य शांतपणें साताऱ्यास घालविलें. साहजिकच राष्ट्राचें नेतृत्व शाहूस लाभलें नाहीं. तें नेतृत्व व त्याबरोबर राजसत्तेचे सर्व अधिकार हळू हळू न कळत पेशव्याच्या हातांत गेले पेशवे कांहीं झालें तरी महाराजांचे नोकर. राजसत्तेस असणारा नैतिक पाठिंबा पेशव्याच्या सत्तेस प्राप्त झाला नाहीं. सर्व राष्ट्रांस शिस्तीच्या लोहमय रज्जूंनीं जख-डणारा पुढारी न लाभल्यानें शिवाजीच्या मृत्यूनंतर एकतंत्री राजसत्ता भग्न पावली ती कायमचीच शिवाजीचें एकमुखी राज्य मोडून त्याऐवजीं अनेक बलाढ्य सरंजाम-दार, जहागीरदार यांच्या हातांत राजसत्ता विभागलेलें राष्ट्र निर्माण झालें शाहूचें अष्टप्रधानमंडळ शिवाजीच्या मंडळाचें अत्यंत विकृत स्वरूप होतें. साताऱ्याच्या आसपासचा टापू स्वतःकडे राखून, राहिलेलें सर्व स्वराज्य लहानमोठ्या सरदारांत जहागिरा म्हणून विभागण्यांत आलें. दक्षिणच्या सहा सुभ्यांतून चौथसरदेशमुखीचा वसूल गोळा करण्याचे हक्क बादशाही फर्मानानें प्राप्त झाले, त्यांचीहि वांटणी याच तत्वावर झाली. पेशव्याकडे बागलाण, खानदेश, माळवा, सेनापतीकडे गुजराथ, अहमदाबाद; फत्तेसिंगाकडे कर्नाटक, प्रतिनिधीस निराकांठचा प्रदेश; सरलष्कर यासी गंगथडी, अशीं कार्यक्षेत्रें नेमून देण्यात आलीं. पेशवा, सेनापति इत्यादि संज्ञा नांवाला राहिल्या. वास्तविक सर्वजण बलाढ्य सरंजामदार (Feudal barons) बनून आपल्या सामर्थ्याप्रमाणें फौजफांटा बाळगून आपल्या अंमलाच्या मर्यादा विस्तृत करण्याच्या मार्गास लागले. दसरा संपतांच या सरदारांनीं फौजा जमवून स्वारीस निघावें, चौथसरदेशमुखीच्या नावाखालीं मोगलाई अमलांतून सैन्यें फिरवावीं, जमा होईल तितका पैका जमा करून मृगसालाच्या आरंभीं परतावें हा क्रम सर्वांस सुरू झाला. राष्ट्रहितापेक्षां स्वतःचें हित कसें साधता येईल, या प्रवृत्तीचें संवर्धन या नवीन सरंजामी पद्धतीनें होऊं लागलें.

मोगल बादशाहीच्या कमकुवतपणानें तर या वृत्तीस ऊतच आला. बलिष्ठ मराठे सरदारांनीं चौथसरदेशमुखीच्या नांवें दाही दिशांना एकच दंगल उडवून दिली व आपल्या संस्थानांच्या मर्यादा वाढविण्यास सुरुवात केली. या कार्यसिद्धीकरतां लागणाऱ्या साधनाची महाराष्ट्रात या वेळीं अत्यंत विपुलता होती. मोगलांशी २५-३० वर्षें चाललेल्या घोर झगड्यांत हजारों सैनिक युद्धाचें शिक्षण घेऊन तयार झाले होते पोट भरण्याची व द्रव्यलाभाची आशा दिसताच वाटेल तेथें बिनधोकपणें उडी घेण्याची त्यांची तयारी होती. बादशाही फौजांना दमविलेल्या या सैनिकांना सेना-नायकाची कायती वाण होती आणि त्यांना इष्ट स्थळीं पोहोंचविणारा सेनानी मिळाला. बाजीराव जन्मानें ब्राह्मण असेल पण क्षात्रतेज त्याच्या रोमारोमांत

भरले होतें. सदर शिपाईगिरीत धुंद ' असें बखरकारानें त्याचें वर्णन केलें आहे पायांत धड बूट नाहीं, अंगात केवळ रकटे झालेले कोट ईजार, थंडीहिमापासून निवारण करण्यास तंबूडेऱ्यांचा पूर्ण अभाव अशा अर्धपोटी सैन्यासह आल्प्समधून धनधान्यांनीं समृद्ध असलेल्या इटालीच्या मैदानात उतरणारा नेपोलिअन व हजारों अर्धपोटीं अर्धनग्न राऊतांस घेऊन उत्तर दिग्विजयास निघालेला बाजीराव यांत विलक्षण साम्य दिसून येतें. दिवसाला ४० मैलांची मजल म्हणजे त्याला पोरखेळ वाटे मोहीमशीर राहून सैनिकांबरोबर काळ घालविणें हा त्याचा खरा आनंद. कष्टाची त्यानें कधींच पर्वा केली नाहीं वेळ पडल्यास नुसत्या कांदाभाकरीवर किंवा हुरड्यावरच तो भागवीत असे.

दक्षिणच्या सहा सुभ्याच्या चौथसरदेशमुखींचीं फर्मानें बाळाजी विश्वनाथानें मिळविलीं पण कागदी हुकुमानें परमुलखांतील वसूल होण्याचे ते दिवस नव्हते. फर्मानापाठीमागें शस्त्राचा जोर असेल तरच ठिकठिकाणच्या जमीदारांकडून काहीं पदरांत पडण्याचा संभव. मराठ्यांना सहज रीतीनें वसूल न देतां आणतां येतील तितके अडथळे मोगल अधिकाऱ्यांनीं आणावे ही वृत्ति ओळखून शाहूमहाराजांनीं आपल्या सरदारात दक्षिणच्या सुभ्याची वाटणी केली. सैन्य जमवून ही कामगिरी स्वतः महाराजांनीं पार पाडण्यास हरकत नव्हती, पण महाराज छत्रपति बादशहाच्या तोलाचे, क्षुद्र जमीदार सुभेदार यांच्या विरुद्ध मोहीम चालविणें त्यांच्या इभ्रतीला शोभण्यासारखें नव्हतें. म्हणून सरदारांना स्वतंत्र टापू आंखून देण्यांत आले व त्यांत प्रत्येकानें आपल्या मगदुराप्रमाणें धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली

पेशव्याच्या वाटणीस बागलाण खानदेशकडील मुलुख आला व खानदेश बागलाणातून फौज फिरवितां फिरवितां पेशव्यानें माळव्यांत प्रवेश केला. शाहूच्या अमदानीच्या सुरुवातीस मराठी साम्राज्याचा विस्तार कर्नाटकच्या बाजूस दक्षिणेस न होता उत्तरेस कां झाला या प्रश्नाचें समर्पक उत्तर या प्रदेशविभागणीच्या व्यवस्थेंत सांपडेल. अलोट धनलाभाच्या आशेनें बाजीरावासारखा धडाडीचा सेनानायक मिळतांच त्याच्या निशाणाखालीं सैनिक जमा होण्यास वेळ लागला नाहीं येवाजी सतकर, संताजी मोरे, राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, पवार बंधुत्रय उदाजी तुकोजी जिवाजी, घाटगे, घोरपडे, कदम, बांडे, भोसले, जाधव, चितळकर, रणदिवे, रणनवरे असे शेंकडों नामांकित पथके पेशव्यास सामील झाले. बागलाण खानदेशच्या भागातून चौथसरदेशमुखीचे हक्क गोळा करण्यास पेशव्यास वेळ लागला नाहीं. याच सैन्यानिशीं नर्मदा उतरून पेशव्यानें माळव्यांत प्रवेश केला. उत्तरेकडील कार्यक्षेत्र पेशव्याचा विभाग ठरल्यामुळें माळव्यांत काबीज केलेला प्रदेश आपल्या जहागीर-दाखल सर्वथैव आपल्या ताब्यांत राहणार, त्यांत इतरांचा वांटा नाहीं, यासंबंधीं निखालस खात्री असल्यामुळें प्रतिवर्षी उत्तरेस पेशव्याचें पाऊल पुढें पडत गेलें.

उलट भागानगर, कर्नाटक या दक्षिणेकडील प्रांतांची कामगिरी ज्यांच्या वांट्यास आली त्यांच्यांत पेशव्याचें कर्तृत्व, पेशव्याचा पराक्रम यांचा अभाव असल्यामुळें दक्षिणेस मराठी सत्तेचा प्रसार होण्यास कालावधि लागला दोनचार वर्षांनीं जुजबी फौजा पाठवून थोडथाफार वसुलावर संतुष्ट राहावें या वृत्तीनें फतेसिंग भोसले, प्रतिनिधि यांचें तेज कमी होत गेलें. पेशवा धडाडीनें माळवा, राजपुताना, बुंदेलखंड या भागांतील एका मागून एक प्रांत आक्रमण करीत असतां महाराजांजवळ राहून पेशव्याची नालस्ती करून स्वतःचा उत्कर्ष साधण्याचा प्रतिनिधिसुमतप्रभृतींचा प्रयत्न चाले. फौजफांटा बाळगून सामर्थ्यवान् झालेल्या पेशव्यास काबूंत आणण्याचा हा मार्ग खचित नव्हे. सैन्यें जमा करून पेशव्यास नवा मुलूख संपादन करता आला तसें यांना करण्यास कोणाची हरकत होती ? कोणीहि फौज उभारावी, मोहीम करून द्रव्य मुलुख साधावा, असे ते दिवस होते महाराजांजवळ राहून पेशव्याच्या उत्कर्षाबद्दल खंती दर्शवून पेशव्याचा उद्योग हाणून पाडूं असा जो या मंडळींचा ममज होता तो चुकीचा होता पेशव्यासारख्या डोईजड सरदारास हटकण्याचें सामर्थ्य महाराजांत उरलें नव्हतें. मुलगा मोठा झाल्यावर बाप त्यास टाकून बोलावयास भितो तशांतील हा प्रकार होता महाराजांचें आसन सर्वस्वीं पेशव्यानें स्थिर केलें, त्याच वेळीं महाराज पेशव्याच्या आहारीं गेले महाराजांत तडफ असती, उद्योग असता, करारीपणा असता, तर पेशव्यास दाबांत ठेवणें कठिण नव्हतें पण राज्यधुरा स्वतः वाहणें महाराजास बनलें नाहीं अठराव्या शतकांतील विस्तार पावणारें मराठ्यांचें साम्राज्य शाहू छत्रपतींचें राज्य नसून त्याच्या पेशव्याची वाढती जहागीर होती. वृक्षाचा आधार घेऊन जीव तगविणाऱ्या वेलीनें शेवटीं त्या वृक्षास पूर्णपणें वेष्टून टाकावें तद्वत् पेशव्यानें कालांतरानें छत्रपतीस ग्रासून टाकलें.

पण या मुद्याचा सध्यां जास्त विचार करण्याची जरूर नाहीं पेशव्याकरता योजिलेलें कार्यक्षेत्र उत्तरेस असल्यामुळें या बाजूस मराठी राज्याचा विस्तार झपाट्यानें झाला. बखरकारानें मात्र या प्रसंगास अनुलक्षून घातलेला संवाद बुद्धीला न पटण्यासारखा आहे. " कर्नाटकची मसलत आहे ती प्रतिनिधीनें संभाळावी हुजरात व मोठे सरदार यांतील कोणीतरी रवाना होऊन मसलत झाली म्हणजे सहज साध्य होईल. पादशाही कमजोर जाहली आहे, कांहीं जीव राहिला नाहीं, बखेडे बहुत आले आहेत, पादशाह आमचे कुमकेनें पादशाही रक्षावी असें इच्छून आहेत. " असे पेशव्याचे शब्द ऐकतांच महाराज बहुत संतुष्ट होऊन बोलिले, " बाळाजीपंतनानांच्या उदरीं तुम्ही जन्मला हें युक्त आहे तुम्हासारिखे कर्ते पदरीं असतां हिमालयापलीकडील दुसरे किन्नरखिंडीचें राज्य साधतां येईल मग या मसलतीचें काय अशक्य आहे ? तुम्ही हिंदुस्थान प्रांतीं जावें. इकडील सर्व सरदार व हुजरात व मानकरी फौज आहे तेव्हां निजामुल्मुल्क यानें शोखी केल्यास पाहतां येईल व कर्नाटक

प्रांतींहि फौज रवाना करून सोडतां येईल " पेशव्याचें आवेशपूर्ण भाषण व त्यावरील महाराजांचें तितकेच वीर्यशाली उत्तर यांनीं दरबारांतील मुत्सद्दी गप्प बसले असतील पण त्यांचें समाधान खचित झालें नसेल कर्नाटकचा प्रांत म्हणजे गोवळकोंडा, विजापूरचीं जुनीं राज्यें. दक्षिणेस येतांक्षणीच औरंगजेबानें धडाक्यासरशीं हीं दोन्ही राज्यें खालसा केलीं व मराठ्यांविरुद्ध मोहीम चालू केली जुनी राजवट जाऊन नवें राज्य आलें म्हणजे नवा अंमल दृढ होण्यास कांहीं काळ जावा लागतो. मराठ्यांशी चाललेल्या झगड्यामुळें या प्रदेशांत मोगलाचा अमल बसविण्यास अशी संधि आलीच नाहीं मोठालीं नाक्याचीं शहरें सोडलीं तर हा कर्नाटकाचा प्रदेश उघडा पडला व त्यांत नांवापुरतेंच मोगलाचें अधिराज्य मान्य केलेले अनेक पाळेगार गढीबंद होऊन राहिले. एकजूट नसल्यामुळें या क्षुद्र पाळेगारांचा पाडाव करणें मराठ्यांना सोपें होतें. कडपा, सिरे, सावनूर, बंकापूर व धारवाड या ठिकाणीं मोगल फौजदार होते, पण दिल्लीकडून मदत मिळण्याचा यत्किंचित् संभव नसता मराठ्यांविरुद्ध टिकाव धरण्याइतका त्यांचा जोर नव्हता. एकदरींत भौगोलिक सान्निध्य, विस्कळित झालेली राजकीय स्थिति या सर्व गोष्टी कर्नाटक काबीज करण्यास मराठ्यांना अत्यंत अनुकूल होत्या. पेशव्यासारखा धडाडीचा सरदार कर्नाटकच्या बाजूस उद्योग चालविता तर अल्पायासानें अल्पकाळांत कर्नाटक मराठी राज्यांत समाविष्ट झालें असतें. पण कर्नाटकची मसलत ज्यांच्याकडे सोंपविण्यात आली त्यांना कीर्तिलाभापेक्षां शरीरस्वास्थ्याची ज्यास्त काळजी होती कर्नाटकची मसलत फत्तेसिंगाच्या हातून आटपेना, तेव्हां प्रतिनिधीस सांगण्यांत आली प्रतिनिधीनंतर सात लाखाला बाबूजी नायकानें ही मामलत घेतली, पण त्यांत अदक्ष होऊन नायकास परतावें लागलें. इतकें होतें तों १७५० साल आलें शाहू छत्रपति कालवश होतांच सर्वांस बाजूस सारून आपल्या नांवें पेशव्यानें कर्नाटक करून घेतलें.

याच्या उलट स्थिति मोगली साम्राज्याच्या उत्तरेकडील प्रांताची होती मोगल साम्राज्य हें जुनाट वृक्षाप्रमाणें आंतून पोंखरून गेलें आहे, फांद्यांवरती कुऱ्हाड न चालविता बुंध्यावरच चालवावी म्हणजे अल्प प्रयासानें कार्य होईल या बाजीरावाच्या विचारसरणींत वस्तुस्थितीचा विपर्यास होता साम्राज्य घसरणीस लागलें म्हणजे प्रथम दूरच्या प्रांतांवरील पकड नाहींशी होते व असल्या भागाचे लचके तोडणें सोईचें पडतें बुंध्यावर घाव घालण्यांत बाजीरावानें घिसाडघाईच केली असें म्हणावें लागतें. एक तर मोगल साम्राज्यवृक्ष जुनाट झाला असला तरी तो बाल्यावस्थेंत असलेल्या मराठी राष्ट्रानें घाव घातल्यास उन्मळून पडेल इतका शुष्क, कुचका खात्रीनें झाला नव्हता. निजामासारख्या घरालगतच्या शत्रूचा बंदोबस्त करण्यापूर्वीच साम्राज्यावर हल्ला चढविणें मुलखगिरीस सोडून होतें. उत्तरेकडून निजामास पायबंद देण्याकरतां पेशवा उत्तरेंत शिरला या म्हणण्यांत हांशील नाहीं. निजामाबद्दल

दिल्ली दरबारला कधींहि आपुलकी वाटली नाहीं निजामाच्या भवितव्यतेबद्दल दिल्ली दरबारच्या मनात बेफिकिरीशिवाय दुसरी भावनाच नव्हती. बाजीराव उत्तरेस असला तरी निजामाच्या हालचालींसंबंधीं नेहमीं साशंक असे व शेवटीं निजामाच्या कारवाईमुळें माळव्याच्या सनदांची प्राप्ति लांबणीवर पडली भोपाळवर निजामाचा पाडाव झाला, पण त्याची शक्ति खच्ची झाली नाहीं मराठे शिलेदारांच्या पराक्रमास कर्नाटकांत भरपूर वाव मिळून कर्नाटकच्या द्रव्यनदीच्या पाण्यानें मराठी साम्राज्यवृक्ष जोरानें फोंफावला असता. दूरच्या प्रांतांवरील बादशाही नियंत्रण ढिलें होत चाललें तरी बादशाही हाताखालीं घेऊन सर्व हिंदुस्थानचा कारभार आवरण्याची ताकद मराठ्यांत येण्यास अवकाश होता. चलाख शिंगरास वाढ पुरती होण्यापूर्वींच गाडीस जोडावें अशांतला हा प्रकार झाला. खुद्द शाहूदरबारांत याबद्दल अनेक वेळां वाटाघाट चाले. अशाच एका प्रसंगाची हकीकत पुरंदरे पेशव्यास लिहून कळवितो–
"दक्षिण प्रांतीच्या मनसब्याची कल्पना आमच्या चित्तांत येऊन राजश्री गोविंदराव चिटणीस यासी सांगून महाराजांस हटकविलें. ते वेळेस राजश्री शाहूमहाराज बोलले कीं, विचार उत्तम आहे महाराजाच्या मनात आलें आहे कीं, स्वामीच्या (पेशव्याच्या) चित्तांत उत्तरेकडील भर भरला आहे तो मनसबा तुम्ही करालच व फौजा जातात याणीं मोगलाची व मुलकाची हद्द (?) घेतल्यामुळें हावभरी होतील आणि केवळ दिल्लीस ठेहा लावली म्हणजे कोणे वेळेस नाहीं कोणे वेळेस तरी अरिष्ट येईल. स्वामीस नका म्हणावें तरी फौजेस पोट भरावयास जागा नाहीं यामुळें आपण (पेशवा) कांहीं आइकणार नाहीं. यास्तव कर्नाटकप्रांत आपले स्वाधीन करावा म्हणजे तिकडील अरिष्ट वारेल व फौजहि मातबर पदरीं होईल असा विचार आहे. परंतु सामादिकास विचार पुसता काहीं दक्षिणप्रांत स्वामीच्या तालुका व्हावा हें कदापि सांगणार नाहींत तेव्हां केवळ खावंदानींच शुभाशुभ विचार करून साहेब येल्यारीनें करणें तें करावें, तेव्हांच होईल तरी होईल. यास्तव इतका प्रसंग बडोन मनसबा सिद्धीस जाईल न जाईल, परंतु स्वामीचे हस्त गालीब आहेत व राजश्रीच्या चित्तात तिकडील अरिष्टाचें भय याजमुळें कार्य जाहलें तरी होईल. अशास स्वामीच्या चित्तांत उत्तरेकडील मनसब्याच्या विचार पूर्ण आला असेल यास्तव या गोष्टीचा विचार ध्यानांत येणार नाहीं. तर उत्तर प्रांतीचा एक परगणा व दक्षिणेकडील एक गाव पैसा बराबर आहेत, फौजा तिकडे जातात, त्यास पैका मिळतो तो कळतच आहे व तो मुलूख मोंगलाचे तोंडीं आहे यास्तव दक्षिण प्रांतींचा तालुका स्वामीस जाहल्यास उत्तमच आहे. हा विचार स्वामीच्या चित्तांत न ये असा नाहीं. आधीं एथून होणेंच मुष्कील, कदाचित् एथील विचार घडून आला तर लक्ष प्रकारें करावा"

परिस्थिति तितकीशी अनुकूल नसता पेशव्यानें जें यश संपादन केलें, त्यांतच त्याच्या युद्धनीतिनैपुण्याची साक्ष आहे. पेशव्याच्या लढाईतील डावपेचाचे भरपूर

विवेचन आतापर्यंत होऊन गेलें आहे त्याची पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं. अठराव्या शतकांतील सुप्रसिद्ध इंग्रज इतिहासलेखक रॉबर्ट ऑर्म यानें एके ठिकाणीं मराठी लष्कराच्या हालचालींसंबंधीं काढलेले उद्गार अगदीं यथार्थ आहेत. तो लिहितो–

The strength of their armies consists in their numerous cavalry, which is more capable of resisting fatigue than any in India, large bodies of them having been known to march fifty miles in a day. They avoid general engagements and seem to have no other idea in making war but that of doing as much mischief as possible to the enemy's country This they effect by driving off cattle, destroying the harvest, burning the villages and by exercising such cruelties as make the people of the open country take flight on the first rumours of their approach. The rapidity of their motion leaves the prince with whom they wage war little chance of striking a decisive blow against them or even of attacking with effect any of their detachments Hence the expense of maintaining an army in the field against the Marathas with very little probability of ever fighting such an enemy, and the greater detriment arising from the devastations they commit generally induce the governments they attack to purchase their retreat with money".

मराठी लष्कराच्या अंतर्गत व्यवस्थेसंबंधीं दोन शब्द येथें सांगणें अनाठायीं होणार नाहीं. बाजीरावकालीन मराठ्यांचें सैन्य निर्भेळ देशी लोकांचें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं सैन्यांत मुख्यतः भरणा शिलेदारांचा असून यापैकीं फारच थोडे पेशव्याच्या खास पागेकडे होते. बहुधा मराठा राऊत नामांकित पथक्याच्या पदरीं राही व त्या पथक्यामार्फत राउतास पगार मिळे. दसरा झाल्यानंतर पेशवा मुहूर्तानें प्रस्थान ठेवी व जलद येऊन मिळण्यास ठिकठिकाणच्या शिलेदारास पत्रें रवाना होत राउतास दरमहा १० पासून १५ पर्यंत पगार मिळे व यांतच त्यास जनावराचें भागवावें लागे. पण शत्रुमुलकात शिरल्यापासून कहीकवाड दाणावैरण बाहेरच्या बाहेर मिळवण्याच्या मराठ्यांच्या पद्धतीनें या पगारांतून बचत झाल्यास नवल नाहीं सामान्य राउतांचें जनावर निराकांटचें, दिसण्यांत बेताच असे व किंमतहि १००-१५० च्या सुमारास असे. शिलेदारांचीं घोडीं मात्र अस्सल तुर्की अरबी असून ५००, ७०० पासून १२शें पर्यंत मोलाचीं असत. स्वतःची नसेल इतकी काळजी मराठा शिलेदार आपल्या जनावराची घेई. निकराच्या हल्ल्यांत घोडीं गारद झाल्यास पेशव्याकडून भरपाई मिळाल्याचे कित्येक उल्लेख रोजनिशींत आहेत. मराठ्यांचें अश्वारोहणाचें कसब पाहून इंग्रज ग्रंथकारांनीं आश्चर्य प्रगट केलें आहे.

भरधांव घोडा एकदम थाबवणें, गिरकी घेऊन जनावराचें तोंड वाटेल त्या दिशेला फिरविणें इत्यादि गोष्टी सरावाने मराठे शिलेदारांस सहज साधत. शिलेदाराजवळ क्वचित् प्रसगीं बंदूक असे. पण त्याचें आवडतें हत्यार म्हणजे लांब भाला व तलवार. भरधाव घोड्यानिशीं मराठी शिलेदार शत्रुसैन्यावर तुटून पडले ( Shock action ) म्हणजे त्यांच्या माऱ्यापुढें शत्रूचा टिकाव लागत नसे.

मराठी सैन्यांत हत्ती बाळगले तरी वैभवाची खूण म्हणून, मोहिमेवर लढाईच्या कामात त्याचा क्वचितच उपयोग झाला आहे. पानपतच्या शेवटच्या दिवशीं सदाशिवरावभाऊ व विश्वासराव गजारूढ झाले व हत्तीवरच जेजालाची गोळी लागून विश्वासराव ठार झाला. स्वत· बाजीरावानें सर्व मोहिमा घोड्यावरच चालविल्या. १७२८ च्या मोहिमेंत चिमाजीची स्त्री त्याच्याबरोबर होती व दोघांनीं नर्मदा क्षिप्रातीरीं दानें केलीं. त्याप्रमाणें १७३६ च्या मोहिमेंत काशीबाई नवऱ्याबरोबर उत्तरेस गेली. असले तुरळक प्रसग सोडले तर बाजीरावाच्या काळांत मराठ्यांनीं बायकामुलांचा लवाजमा बरोबर बाळगल्याचें दिसत नाहीं पालख्यांचा उपयोग जखमी माणसांस व स्त्रियांस वाहून नेण्याकरतां होई. सरदारी प्राप्त झाली म्हणजे सरदारांस जो मानमरातब होई त्यांत पालखीचा मान मोठा समजला जाई १७३६ त जयसिंग-बाजीरावाची भेट सन्मानानें झाली, तेव्हां जयसिंगाकडून मौल्यवान् पालख्या पेशव्यास प्राप्त झाल्या. भारबारदारीकरतां व सांडणीकरतां उंटाची योजना असे मोगलाप्रमाणें अवजड तोफखाना पेशव्यानें बाळगला नाहीं यांत नवल नाहीं. कारण जड तोफांमुळें मराठ्यांच्या अनिरुद्ध सचारास अडथळा झाला असता. जड तोफखाना गैरसोईचा पण हलका जलद हालचालींत जवळ बाळगतां येईल असा तोफखाना पेशव्याच्या मोहिमा यशस्वी होण्यास अत्यत जरूर होता. पेशव्याची मुख्य भिस्त राउत व त्यांच्या भाला-तलवारीवर. मोठमोठ्या दौडी मारून शत्रूस हैराणगत करावयाचें, आपल्या टाकेटकेंत शत्रू आला की त्याला वेढून दाणापाणी वैरण बंद करून त्याची उपासमार करावयाची हे बाजीरावाचे मुख्य डावपेंच होय उपासमारीनें बगपास जैतपूर सोडावें लागलें व याच अडचणींत सांपडल्यामुळें अत्यंत अपमानकारक अटी मान्य करून निजामानें भोपाळांतून निसटतें घेतलें. या दोन्हीहि युद्धांत तोफांच्या अभावीं पेशव्याच्या कौशल्याच्या हालचाली व्हाव्या तितक्या परिणामकारक ठरल्या नाहींत. निजामानें तर तात्पुरत्या वाटेल त्या मागण्या मान्य करून सैन्यानिशीं दिल्ली गाठताच मराठ्यांस बांधण्याच्या अक्षता दिल्या शत्रूस वेढून जलदीनें फडशा पाडला तरच शत्रूवर मात करतां येणें शक्य असतें विलंब लागल्यास शत्रूस कुमक येण्याचा संभव असल्यामुळें मारक तोफखाना जवळ उभारणें कोणत्याहि विजिगीषु सेनानीचें पहिलें कर्तव्य ठरतें तोफखाना जवळ नसल्यामुळें बाजीरावास प्राप्त झालेल्या संधीचा परिपूर्ण फायदा करून घेतां आला नाहीं. एकेच स्वारी करून नादिरशहा दिल्लीची अलोट

संपत्ति घेऊन देशास जातो, तर पंधरावीस वर्षें सतत मोहिमा चालवून कर्जापायीं कपाळ छिनत चाललें असें पेशव्याचें रडगाणें चालतें. योजिलेलें कार्य निखालस पार पाडण्याचें मराठ्यांच्या स्वभावास वावडें दिसतें. थोडेसे जास्त कष्ट पडतील म्हणून तो मार्ग टाळून सुलभ रीत्या यशप्राप्तीकडे दृष्टि ठेवल्यानें मराठ्यांच्या कामगिरीस टिकाऊपणा प्राप्त झाला नाहीं. सारखा शत्रूशी झुंजत असता बाबर जर तोफखाना उभारू शकतो तर पेशव्यास साधनें अनुकूल असता तोफखाना तयार करणें कठिण नव्हतें. कोंकणपट्टीच्या किनाऱ्यावर शंभरांवर वर्षें व्यापार करीत असलेल्या फिरंग्याजवळून शस्त्रास्त्रें करण्याची कला आत्मसात् करण्याचें पेशवा मनांत आणता तर त्याचे उद्देश तात्काल सिद्धीस जाते दारूगोळ्याच्या बाबतींत पेशव्यानें गर्हणीय दुर्लक्ष केलें असें म्हणणें प्राप्त होतें. फार दूरवर दृष्टि न पोंहोंचवितां आजचा प्रसंग साजरा करावयाचा या वृत्तीला बाजीराव अपवाद नव्हता चढाईचें धोरण स्वीकारून, गनिमी काव्यानें, सामर्थ्यानें वरचढ असलेल्या शत्रूवर मात करतां येते हें त्यानें सिद्ध केलें, तरी हॅनिबॉल, मार्लबरो, नेपोलिअन या नामांकित सेनानायकांच्या मालिकेंत त्याचें नांव न शोधतां तें दुय्यम दर्जाच्या सेनाग्रणींत शोधलें पाहिजे. प्राप्त झालेल्या साधनांचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणें हा गुण दुर्मिळ तर खराच, पण बिकट परिस्थितींत साधनें निर्माण करून परिस्थितीवर आरोहण करतो तो केव्हांहि थोर ठरतो. डोंगरमाथ्यावरील अवघड जागा निवडून तटबंदी घालून किल्ल्यांच्या आश्रयानें शिवाजीमहाराजांनीं विजापूर व मोगल बादशहा यांस दमवून महाराष्ट्रास स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें. बादशाहीचीं सूत्रें हातांत घेऊन स्वराज्याचे साम्राज्यांत परिवर्तनसमयीं नूतन साधनें निर्माण करून देणें बाजीरावास झेपलें नाहीं.

पण त्यानें बाजीरावाची योग्यता कमी होत नाहीं. तो पेशवेपदावर आला त्या वेळीं यादवीनें देश छिन्नविच्छिन्न झाला होता. त्याच्या मृत्युसमयीं मराठी राज्यानें साम्राज्याचा मार्ग आक्रमावयास सुरुवात केली होती. शिवाजी जर स्वराज्यसंस्थापक, तर बाजीरावास साम्राज्यसंस्थापक म्हणावयास हरकत नाहीं स्वकीयांचा विरोध, दरबारांतून मार्गांत वारंवार येणारे अडथळे, निजामाची कारवाई या सर्वांस पुरून माळवा-बुंदेलखंडांत या पुरुषानें मराठ्यांची सत्ता प्रस्थापित केली पानपतच्या पराजयानंतर पंजाब, आग्राबाद व दुआब यांतून मराठे मागें हटले, पण माळवा बुंदेलखडांत कायम राहिले; यांतच बाजीरावानें उभारलेल्या इमारतीच्या स्थैर्याची साक्ष आहे.

ग्रंथालय ठाणे
४९१८
ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ठाणें

# परिशिष्ट १

पेशवेदप्तरातून निवडलेले कागदपत्र भाग १३, १४, १५ यांतील पत्रांच्या तारखा बरोबर लावल्या गेल्या नाहींत. अभ्यास करण्यापूर्वी त्या तपासून घेतल्या पाहिजेत. अभ्यासकाला उपयोगी पडेल या समजुतीनें खाली दुरुस्त केलेल्या तारखांचा तक्ता जोडला आहे याशिवाय कित्येक तारखांपुढें असलेलीं प्रश्नार्थक चिन्हें अनावश्यक आहेत हें तात्काळ ध्यानांत येतें

### पे. द. नि. का. १३

| पत्र नं. | दुरुस्त केलेली तारीख |
|---|---|
| ३ | January १७२३ |
| ४ | ३–३–१७४१ |
| ११ | १७२६ |
| ४१ | २८–१–१७२९ |
| ४८ | १८–३–१७३६ |
| ४९ | ७–५–१७३६ |
| ५० | ७–५–१७३६ |

### पे. द नि. का. १४

| पत्र नं. | |
|---|---|
| १ | २१–२–१७३३ |
| २ | ५–३–१७३३ |
| ४ | १७३३ |
| ५ | जानेवारी १७३६ |
| १३ | ९–४–१७३४ |
| १४ | १–४–१७३६ |
| १६ | ७–१२–१७३३ |
| १७ | १९–१२–१७३३ |
| २७ | १२–४–१७३५ |
| ३० | ३०–५–१७३७ |
| ४१ | २४–११–१७३५ |
| ४४ | ७–१२–१७३३ |
| ४५ | २–२–१७३७ |
| ४८ | १९–८–१७३१ |
| ५५ | पौ ३–४–१७३६ |
| ५६ | ५–३–१७३६ |
| ५७ | २४–४–१७३५ |
| ५८ | २३–४–१७३६ |
| ५९ | ३०–५–१७३७ |

### पे. द. नि. का १४ (पुढें चालू)

| पत्र नं. | दुरुस्त केलेली तारीख |
|---|---|
| ६० | २–६–१७३७ |
| ६२ | १८–९–१७३६ |
| ६३ | ११–१–१७३७ |

### पे द नि. का. १५

| | |
|---|---|
| १ | २–५–१७३४ |
| २ | १९–१२–१७३३ |
| ४ | २४–१–१७३६ |
| ६ | ७–३–१७३३ |
| ७ | १४–१–१७३८ |
| ८ | सुमारें २४ जानेवारी १७३६ |
| ९ | ,, ,, ,, |
| १० | ,, ,, ,, |
| ११ | ,, ,, ,, |
| १२ | सुमारें ८–१–१७३६ |
| १३ | ,, ,, ,, |
| १४ | जानेवारी १७३६ |
| १५ | १८–१–१७३६ |
| १६ | १८–१–१७३६ |
| १७ | ३१–३–१७३७ |
| २१ | जानेवारी १७३६ |
| ४४ | २९–५–१७३७ |
| ४८ | २८–५–१७३७ |
| ४९ | १–६–१७३७ |
| ५० | सुमारें डिसेंबर १७३८ |
| ८२ | डिसेंबर १७३७ |
| ८९ | जानेवारी १७३६ |
| ९० | ,, ,, |
| ९१ | ,, ,, |
| ९३ | सुमारें ३–२–१७३७ |